



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

▪ अमरावती, रविवार २२ फेब्रुवारी २०२६ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठ १०+४





## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत

# 10 हजार कोटींचा महाघोटाळा

### अंबादास दानवेंचा राज्य सरकारवर गंभीर आरोप



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या राजकारणात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विविध मुद्यांवरून आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरू आहे. असं असतानाच शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी एक्सवर (ट्विटर) एक पोस्ट शेअर करत राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत.मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत १० हजार कोटींचा महाघोटाळा झाला असल्याचा गंभीर आरोप अंबादास दानवे यांनी केला आहे. या संदर्भात सखोल चौकशी होउन वसुली होणार का? असा सवालही अंबादास दानवे यांनी राज्य सरकारला विचारला आहे. त्यांच्या या पोस्टची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा होत आहे.

शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी पोस्टमध्ये म्हटलं की, महाराष्ट्राची महालुट! मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत १०,००० कोटींचा महा-घोटाळा झाला आहे. NOPL Green, NACOF, IIPL आणि ONIX सारख्या कंपन्यांनी चक्क बनावट बँक गॅरंटी देउन कंत्राटं लाटली? महावितरणचे अधिकारी आणि कंपन्यांचे संचालक (दिव्येश सावलिया, पी. सुरेश बाबू इ.) यांच्या संगनमताने शेतक-यांच्या नशिबी अंधार टाकण्याचा हा प्रयत्न (पान २ वर)

# अजितदादांना मोदी अन् शाहाच न्याय देऊ शकतात

◆ VSR नावाच्या कंपनीला खूप मोठ्या लोकांचा पाठिंबा

◆ मंत्री राममोहन नायडूंचा राजीनामा घ्या; रोहित पवारांचा दिल्लीत एल्गार





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यूनंतर यातील काही महत्त्वाचे मुद्दे मांडण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार आज पुन्हा एकदा नवी दिल्लीत एक पत्रकार परिषद घेत आहेत. रोहित पवारांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाविषयी केंद्रीय मंत्री राममोहन नायडू यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. रोहित पवारआजही एका सादरीकरणाद्वारे अजित पवारांच्या मृत्यूविषयी नवे पुरावे, तांत्रिक माहिती व तपासासाठी काही महत्त्वाचे खुलासे करत आहेत. यावेळी रोहित पवारांनी म्हटलं की, आम्ही मुंबईत एक छोटं प्रेसजेंटेशन केलं होतं. पण यात जितकं सखोल काम केलं तसं लक्षात आलं की, व्हीएसआर या कंपनीच्या पाठीशी खूप मोठे लोक आहेत. सत्ताधा-यांना पाठिंबा देणारे काही लोक या कंपनीच्या पाठीशी आहेत. या अपघातात व्हीएसआर जबाबदार आहे, तर त्यांना वाचवणे कटाचा भाग असू शकतो. नरेंद्र मोदी आणि अमित शाह फक्तहेच अजित पवारांना न्याय देउ शकतात असंही रोहित पवारांनी म्हटलं आहे

व्हीएसआर (VSR) नावाच्या कंपनीला खूप मोठ्या लोकांचा पाठिंबा असून यात सत्तेतील आणि राजकीय संबंध असलेले मोठे उद्योगपती सामील आहेत. हे एक राजकीय किंवा व्यावसायिक कटकारस्थान असू शकते आणि डीजीसीएचे मोठे अधिकारीही यामागे आहेत. अजित दादांना न्याय मिळवून देण्यासाठी या देशातील सर्वात शक्तिशाली व्यक्ती, म्हणजेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनीच या तपासात लक्ष दिले पाहिजे, कारण यात गुंतलेले इतर लोकही तितकेच प्रभावशाली आहेत. मी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनाही विनंती करतो की, त्यांनी हा विषय आपल्या हाती घ्यावा आणि नागरी उड्डाण मंत्र्यांचा राजीनामा मागण्यात आम्हाला साथ द्यावी, अशी मागणी देखील रोहित पवारांनी केली आहे. मंत्री राम नायडूंनी सुरुवातीलाच



लिअर जेटला क्लीन चीट देणारं स्टेटमेंट केलं. नंतर सूत्रांच्या हवाल्याने बातमी दिली की व्हीएसआर सोबत काही संबंध नाही. ज्यांनी व्हीएसआरला लोन दिलं ते तेलगू देसम पक्षाशी संबंधित आहेत, अशी माहिती देखील रोहित पवारांनी दिली आहे.

**रोहित पवारांनी त्यांना ट्रोल करणा-यांवर केलं भाष्य-** रोहित पवार यांनी नुकतेच या प्रकरणी त्यांच्यावर टीका करणा-या ट्रोलर्सचा खरपूस शब्दांत समाचार घेतला होता. (पान २ वर)

# अविमुक्तेश्वरानंद यांच्यावर मुलांच्या लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल होणार

◆ प्रयागराज न्यायालयाने दिला आदेश



**प्रयागराज/वृत्तसंस्था :** शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्या विरोधात अल्पवयीन मुलांच्या लैंगिक शोषणाची एफआयआर दाखल करण्याचे आदेश शनिवारी प्रयागराजच्या पॉक्सो कोर्टाने दिले. जगद्गुरु रामभद्राचार्य यांचे शिष्य आशुतोष ब्रह्मचारी महाराज यांनी कोर्टात २ मुलांना हजर करून हे आरोप केले होते. कॅमे-यासमोर कोर्टात मुलांचे जबाब नोंदवले गेले होते. स्पेशल जज पॉक्सो ॲक्ट विनोद कुमार चौरसिया यांच्या कोर्टाने प्रयागराज पोलिस आयुक्तांच्या चौकशी अहवालानंतर गुन्हा दाखल करण्याचे आदेश जारी केले. आम्ही दारोदार भटकत होतो. पोलिसांकडे जात होतो. आमचं कोणी ऐकत नव्हतं. त्यामुळे न्यायाच्या मंदिरात आलो. आज वाटलं की न्याय अजून जिवंत आहे. न्यायालयाने आम्हाला आज न्याय दिला आहे. मला आता स्पष्टपणे सांगायचं आहे की शिष्यांसोबत लैंगिक शोषण आणि समलैंगिक गुन्हा करण्यात आला. याची पुष्टी न्यायालयाने केली आहे. न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांचा उल्लेख केला. त्यात म्हटले आहे की, प्रत्येक प्रकरणात एफआयआर दाखल करणे बंधनकारक नाही. एफआयआर दाखल करण्याचा आदेश द्यायचा की तक्रारीवर कारवाई करायची हे ठरवण्यासाठी मॅजिस्ट्रेटने आपल्या विवेकबुद्धीचा वापर करावा. (पान २ वर)

# कृष्णा आंधळे आत्तापर्यंत तीनवेळा गावी येऊन गेला

### सरपंच संतोष देशमुखांचे बंधू धनंजय यांचा खळबळजनक दावा



**बीड/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे आतापर्यंत तीन वेळा त्याच्या गावी येउन गेल्याचा दावा दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केलाय. कृष्णा आंधळे गावी आल्याची माहिती त्यांनी सीआयडीला देखील दिल्याचं सांगितले. कृष्णा आंधळे मोबाईल वापरत नाही, मात्र त्याला जेलबंद कसे करायचे याचा विचार गरजेचा आहे. आमच्या कुटुंबाला या आरोपी पासून धोका आहे. हे आरोपी शैतानी वृत्तीचे असून कृष्णा आंधळेला अटक करून त्याची दिंड जिल्हाभरात काढावी, अशी मागणी धनंजय देशमुख यांनी केली. आज बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात देशमुख हत्या प्रकरणात सुनावणी पार पडली. याच सुनावणी वेळी धनंजय देशमुख यांनी माध्यमांना याबाबत माहिती दिलीय. दरम्यान, सुप्रीम कोर्टात येत्या २६ तारखेला वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर सुनावणी होणार आहे. याबाबत कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. आमचे म्हणणे आम्ही न्यायालयात देणार असल्याचं देशमुख यांनी यावेळी म्हटलं. मागील दीड वर्षांपासून देशमुख कुटुंब आजही न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचेही ते म्हणाले.

दरम्यान, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील पुढील सुनावणी ६ मार्च रोजी होणार आहे. आजच्या (२१ फेब्रुवारी) सुनावणीत आरोपी पक्षाला सर्व कागदपत्राची पूर्तता करा, अशा सूचना कोर्टाच्या वतीने सरकारी पक्षाला देण्यात आल्या आहेत. आरोपी क्रमांक तीन ते सात यांनी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम बदलण्यात यावे यासाठी केलेल्या अर्जावर सरकारी पक्षाकडून लेखी म्हणणे सादर केले जाणार असल्याची माहिती आहे. तसेच विष्णू चाटेच्या जेल बदलीच्या अर्जावर आज ऑर्डर येण्याची शक्यता आहे. तर आरोपी जयराम चाटेकडून वकील बदलला आहे. नवीन वकील एम के वाघीरकर यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती आहे.

**सरकारी पक्षाकडून एवढी घाई का?-** दरम्यान, कोर्टाकडून प्रतीक घुलेला विचारणा करण्यात आली कि, वकील लावायचा आहे का? यावर प्रतीक घुलेकडून उत्तर देण्यात आलं आणिपुढील दहा ते पंधरा दिवसात घरचे लोक वकील बघतील असं सांगण्यात आलंय. लॅपटॉपची क्लोन कॉफी मिळाली नाही, फॉरेन्सिकचा रिपोर्टही मिळाला नाही, पेन ड्राईव्ह मिळाला नाही. या सर्व गोष्टीची पूर्तता झाल्याशिवाय साक्षीदारांची लिस्ट स्वीकारू नये. असे म्हणत आरोपींच्या वकिलांची कोर्टाकडे विनंती केली आहे.

# भाजपा आमदाराला 5 लाखांची लाच घेताना रंगेहाथ पकडले



**अमरावती/वृत्तसंस्था :** भारतीय जनता पक्षाच्या एका आमदाराला पाच लाख रुपयांची लाच घेताना अटक करण्यात आली आहे. कर्नाटक लोकायुक्त पोलिसांनी ही मोठी कारवाई केली असून आमदारच अशा प्रकारे लाच घेताना आढळून आल्याने राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. कर्नाटकमधील शिरहट्टी विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे आमदार चंद्रू लामाणी यांना कर्नाटक लोकायुक्त अधिका-यांनी ५ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडलं आहे. चंद्रू लामाणी यांनी एका कंत्राटदाराकडे तब्बल ११ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. या कारवाईबाबत कर्नाटक लोकायुक्तच्या अधिका-यांनी सांगितलं की, सापळा रचून आमदार चंद्रू लामाणी यांना पकडण्यात आलं आहे. त्यानंतर लामाणी यांची प्राथमिक चौकशी करण्यात आल्यानंतर त्यांना औपचारिकरित्या अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात त्यांच्यासह त्यांच्या दोन सहाय्यकांनाही ताब्यात घेण्यात आलं असून त्यांचीही चौकशी सुरू आहे. लोकायुक्त अधिका-यांच्या म्हणण्यानुसार, कर्नाटकच्या गडग जिल्ह्यातील एका लघुसिंचन विभागाच्या प्रकल्पाशी संबंधित एका कंत्राटदाराकडे या आमदाराने तब्बल ११ लाख रुपयांची लाच मागितली होती. त्यानंतर संबंधित कंत्राटदाराने गडग येथील लोकायुक्त अधिका-यांशी संपर्क साधत तक्रार दाखल केली होती. तक्रार दाखल होताच लोकायुक्त अधिका-यांनी तक्रारीची पडताळणी केली आणि लोकायुक्तच्या (पान २ वर)




### पाळीव कुत्रा पाळणारे अरेरावी करतात

**महानगरपालिका क्षेत्रात कुत्रा पाळणे हे मोठेपणा समजतात मात्र त्याच्या विष्ठेची विल्हेवाट कुठे लावावी याची ते सोय करीत नाही. सकाळी दुपारी व संध्याकाळी हातात कुत्र्याची दोरी घेवून भर रस्त्यावर हातात मोबाईल घेऊन फिरत असतात. यातच महिला जर कुत्र्यासोबत असेल तर तो कुत्रा तिला कंट्रोल होत नाही. तो लहान मुलाना, रस्त्यावरून ये-जा करणा-या नागरीकांवर भुंकतो किंवा त्यांना चावतो. वेळेवर कुठल्या दवाखान्यात रेबीजची व्यवस्था असेलच असे नाही. १० दिवसाआधीच आर्वी येथील एक ७ वर्षीय चिमुकला याची शिकार झालेला आहे. या पाळीव कुत्रा पाळणा-या कुटुंबावर महानगरपालिकेने चौपट कर लावावा किंवा शौचालयाची व्यवस्था करावी अशी मागणी जोर धरत आहे.**

# पाळीव कुत्र्याच्या चाव्याने 6 वर्षीय मुलगा जखमी

### मालकाकडून पीडित कुटुंबालाच उलट धमकी



**मुंबई/प्रतिनिधी :** येथे एका सहा वर्षांच्या मुलाला पाळीव कुत्रा चावल्याने चिमुरडा जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. कुत्रा चावल्यानंतरही त्याची मालकीण समृद्धी (२०) आणि तिचे वडील संजीत विश्वकर्मा (५२) यांनी जखमी मुलाच्या नातेवाईकांनाच धमकी दिली. या प्रकरणी जयेश गुप्ता यांनी बाप-लेकी विरुद्ध गुन्हा दाखल केल्याची माहिती वर्तकनगर पोलिसांनी शनिवारी दिली. लोकमान्यनगर पाडा क्रमांक तीन मधील राधाकृष्ण मंदिरजवळ हा प्रकार १९ फेब्रुवारीला सकाळच्या सुमारास घडला. समृद्धी आणि संजीत यांनी त्यांच्या पाळीव कुत्र्याला घरात आणि बाहेर सुरक्षितरित्या न ठेवता, घराबाहेर ठेवले. तो कुत्रा जयेश गुप्ता (२८) यांच्या सहा वर्षीय पुतण्याला (रुद्र) चावला. यात तो जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल केले. तरीही संजीत यांनी गुप्ता यांना उलट धमकी दिली. शिवाय, मुलांना घरी बसवा, नाहीतर अंगावर कुत्रा सोडू, अशीही धमकी आणि आरेरावीची भाषा विश्वकर्मा यांनी केल्याचा आरोप आहे. एक महिन्यापूर्वीही हाच कुत्रा गुप्ता यांच्या अंगावर धावून गेला होता. यावेळी त्याने चावा घेउनही त्याची दखल घेण्याऐवजी उलट धमकी दिल्याचे गुप्ता यांनी म्हटल्याचे पोलिसांनी सांगितले.

### सोसायटीत खेळणा-या मुलावर 3 ते 4 कुत्र्यांची झडप

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनला असून किरकटवाडी परिसरातील चैत्रांगण सोसायटीत एका लहान मुलावर भटक्या कुत्र्यांनी अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेचो सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोसायटीच्या आवारात खेळत असलेल्या चिमुरड्याकडे अचानक ३-४ भटके कुत्रे धावत आले. त्यानंतर त्यांनी काही क्षणांत मुलावर झडप घालत चावा घेण्याचा प्रयत्न केला. घाबरलेल्या मुलाने आरडाओरड केल्यावर आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेत त्याला वाचवले. सुदैवाने मुलगा किरकोळ जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.



# नगरसेवकांच्या तक्रारींवर २४ तासांत आयुक्तांची पाहणी

## -विविध विभागांना तातडीच्या उपाययोजनांचे आदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील स्वच्छता व पायाभूत सुविधांबाबत स्थानिक नगरसेवकांनी काल उपस्थित केलेल्या तक्रारींची तात्काळ दखल घेत महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज (दि.२१) अंबादेवी रोड, शीलांगण रोड, पन्हालाल नगर व देसाई लेआउट परिसराची क्षेत्रीय पाहणी केली. संबंधित नागरी समस्यांबाबत महानगरपालिकेच्या विविध विभागांसह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या समन्वयातून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

अंबादेवी रोड व शीलांगण रोडवरील चेंबरसंबंधित प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) व महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने संयुक्तरित्या तातडीची दुरुस्ती व देखभाल कार्यवाही करावी, असे आदेश आयुक्तांनी दिले. अंबादेवी परिसरातील खुल्या प्लॉटवर टाकला जाणारा कचरा रोखण्यासाठी स्वच्छता विभागाने जागा बंद करून संबंधित प्लॉटमालकांना नोटीस बजावावी, असे निर्देश देण्यात आले.

पन्हालाल नगर येथील नाल्याच्या तुटलेल्या कठड्यांची नव्याने उभारणी तसेच नाल्यालगत संरक्षण भिंत (प्रोटेक्शन वॉल) उभारण्यासाठी बांधकाम विभागाने सादर केलेल्या अंदाजपत्रकास तातडीने निधी उपलब्ध करून काम हाती घ्यावे, असे सांगण्यात आले. देसाई लेआउट परिसरातील रस्त्यालगत टाकलेले बांधकाम साहित्य संबंधितांकडून हटवण्यासाठी बांधकाम विभागाने कारवाई करावी, तर उद्यान विभागाने परिसरातील अनावश्यक झाडांची छाटणी करावी, असे निर्देश देण्यात आले. तसेच संपूर्ण परिसरातील सर्व नाल्यांची तातडीने सफाई करण्याचे आदेश देण्यात आले.



या पाहणीवेळी नगरसेवक मिलिंद बांबल, स्वाती कुलकर्णी, लवीना हर्षे व रतन डेंडूले, उपआयुक्त योगेश पिठे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भूषण पुसदकर, उपअभियंता प्रमोद इंगोले, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, अभियंता लक्ष्मण पावडे, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक श्रीकांत डवरे व स्वास्थ निरीक्षक प्रशांत गावनेर उपस्थित होते.

नगरसेवकांनी मांडलेल्या समस्यांवर महानगरपालिकेच्या बांधकाम, स्वच्छता, उद्यान आदी विभाग तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या संयुक्त समन्वयातून तातडीने कार्यवाही सुरू करण्यात आली असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# ‘लग्नाआधी-नंतर धर्मांतरासाठी राज्याची परवानगी बंधनकारक करा’

## -खासदार अनिल बोंडे यांची कठोर कायद्याची मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील वाढत्या कथित ‘लव्ह जिहाद’ प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर भाजप खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी मोठी प्रतिक्रिया देत धर्मांतर आणि आंतरधर्मीय विवाहांबाबत कठोर कायद्याची मागणी केली आहे.



बोंडे यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले, ‘लग्नाच्या पूर्वी किंवा लग्नाच्या नंतर धर्मांतरण होत असेल तर धर्मांतरण करण्याची परवानगी राज्य शासनाची असली पाहिजे. शासनाला माहिती करून धर्मांतरण झालं पाहिजे. असा कठोर कायदा करणे आवश्यक आहे.

अमरावतीत बोलताना बोंडे यांनी दावा केला की, ‘लव्ह जिहाद ही संघटित गुन्हेगारी आहे. अहमदनगरमधील घटना अपवादात्मक नाही.’ त्यांच्या मते, खोटी ओळख, अमिष, प्रलोभन आणि ब्लॅकमेलिंगच्या माध्यमातून मुलींना जाळ्यात ओढण्याचे प्रकार वाढत आहेत. लव्ह जिहादला आळा घालण्यासाठी आपण राज्यसभेत खाजगी विधेयक मांडल्याचेही त्यांनी सांगितले.

बोंडे यांनी पुढे कठोर शिक्षेची मागणी करत म्हटले की, ‘खोटे अमिष, प्रलोभन, ब्लॅकमेलिंगच्या माध्यमातून विवाह होत असेल तर दोषींना किमान दहा वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा देणारा कायदा महाराष्ट्र सरकारने करावा.’ आंतरधर्मीय विवाह करताना स्पेशल मॅरेज ॲक्ट १९५४ अंतर्गत प्रक्रिया काटेकोरपणे राबवून पालकांना माहिती देणे बंधनकारक करावे, अशीही त्यांची मागणी आहे.

बोंडेंच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे आहेत. धर्मांतर आणि आंतरधर्मीय विवाहांबाबत कठोर कायदा करण्याची मागणी आता चर्चेच्या केंद्रस्थानी आली असून, राज्य सरकार काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ३ वर्षांच्या चिमुकल्याच्या डोक्यातील धोकादायक रक्तगाठ यशस्वीपणे काढली

## -विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात शस्त्रक्रिया

**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे तीन वर्षांच्या एका चिमुकल्याच्या डोक्यातील धोकादायक गाठ यशविरीत्या काढण्यात आली. रुग्ण हा रा. बदनापूर ता. नांदगाव खंडेश्वर, अमरावती येथील रहिवाशी असून त्याला विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे आणले असता डॉक्टरांनी डोक्यात रक्ताची गाठ असल्याचे सांगितले. या गाठीमुळे मुलाच्या डोळ्यांवर मोठ्या प्रमाणात सूज आली होती. डॉक्टरांच्या तपासणीत ही गाठ



रक्ताची असल्याचे निष्पन्न झाले असून ती डोळ्यावर दाब निर्माण करत असल्याने मुलाच्या दृष्टीला धोका निर्माण झाला होता.

या गंभीर स्थितीमुळे तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. अनुभवी डॉक्टरांच्या चमूने काळजीपूर्वक ऑपरेशन करून गाठ यशस्वीपणे काढली. शस्त्रक्रियेनंतर मुलाची प्रकृती स्थिर असून त्याची प्रकृती सुधारत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

योग्य उपचार व निरीक्षणानंतर मुलाला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. सदर शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आली.ही शस्त्रक्रिया विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली न्युरो सर्जन डॉ. अंकुश वानखडे, डॉ वैशाली धांडे, भूलतज्ञ डॉ संजय महतपुरे, डॉ अश्विनी मढावी, डॉ बागवाले यांच्या मार्फत करण्यात आली. सदर शस्त्रक्रिये मध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ उज्वला मोहोड, अधिसेविका चंदा खोडके याच्या मार्गदर्शनाखाली न्यूरो इंचार्ज अलका मोहोड, दिपाली देशमुख, वैशाली नागराळे, अपेक्षा वाघमारे,मनीषा रामटेके,शुभम गवई, स्नेहल काळे, विजय गवई, यश गवई, अभिषेक निचत, तेजल बोंडगे,फार्मासिस्ट योगेश वाडेकर, बायोमेडिकल इंजिनिअर अमोल वाडेकर, प्रशांत शिरे, आकाश काळे, वेदांत इंदुरकर, ज्ञानेश लांजेवर, राहुल कवनपुर यांचे विशेष सहकार्य होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### १० हजार कोटींचा

आहे का? EOW कडे ५ गुन्हे दाखल होणे ही नामुष्की आहे, असे आरोप अंबादास दानवे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये केले आहेत.

**अंबादास दानवे यांचे राज्य सरकारवर गंभीर आरोप-** तसेच अंबादास दानवे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पोस्ट टॅग करत म्हटलं की, सखोल चौकशी होउन वसुली होणार का? अधिका-यांना शासन कोण करणार? अपारंपरिक उर्जा खात्याचा कारभार पाहणारे मंत्री यांच्या यातील सहभागाची चौकशी पारदर्शक कारभाराचे पुरस्कर्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार का?, असा सवाल अंबादास दानवे यांनी केला आहे. शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची वाय प्लस सुरक्षा गृह विभागाने काढली असल्याची माहिती समोर आली आहे. यावरून खासदार संजय राउत यांनी राज्य सरकारवर खोचक टीका केली.

### अजितदादांना मोदी अन् शाहाच

आम्हाला जे ट्रोल करत आहेत, जे भाजपासाठी काम करतात, ते खूप जास्त अग्रेसिव्ह झालेले आहेत, आम्ही जेव्हापासून प्रेझेंटेशन चालू केले तेव्हापासून ते भडकले आहेत, एअरपोर्ट कडून त्यांना माहिती मिळत आहे. मी कोणत्या फ्लाईटने गेलो होतो, माझ्यासोबत कोणता सेलिब्रिटी होता त्यांच्या आणि माझ्या आधार कार्डची माहिती त्या ट्र?लर्स न मिळत आहे. मी जेव्हा दिल्लीत आलो होतो तेव्हा मी स्वत? सांगितलं होतं मी देखील व्हीएसआर च्या विमानाने फिरलेलो आहे, माझ्यासोबत एक सेलिब्रिटी होता, मी ही माहिती दिली तरी देखील भाजपचे जे ट्रोलर्स आहेत ही माहिती त्यांना कोणी दिली, आरटीआय टाकून देखील आम्हाला माहिती मिळत नाही, कोणते अधिकारी आम्हाला माहिती देत नाहीत, पण एअरपोर्ट प्रशासन अशा ट्रोलर्स ना सर्व माहिती का देत आहे असा आमचा प्रश्न आहे, या ट्रोलर्सच्या मागे नेमकं कोण आहे या सगळ्यात जाउन मी तुमचा सर्वांचा वेळ घेणार नाही, पण अशा पद्धतीने भाजपचे काही मोठे ट्रोलर्स आम्हाला ट्रोल करत आहेत आमच्या पत्रकार परिषदेला ट्रोल करत आहेत, तर मला वाटतंय की हा सर्व रिसर्च आणि सर्व माहिती दाबण्याचा प्रयत्न करत आहे की, यामध्ये दुसरा कोणता अँगल आहे असा प्रश्न लोकांच्या देखील मनामध्ये येत आहे असेही रोहित पवार यांनी म्हटलं आहे.

### अविमुक्तेश्वरानंद यांच्यावर

जर पोलिस तपास आवश्यक असेल तर एफआयआर नोंदवून चौकशी करणे योग्य आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, आरोप हा एक गंभीर आणि दखलपात्र गुन्हा आहे आणि पोक्सो कायदा लागू होतो. पुरावे गोळा करण्यासाठी पोलिस तपास आवश्यक आहे. केवळ खासगी तक्रार म्हणून प्रकरण पुढे नेणे योग्य ठरणार नाही. न्यायाधीशांनी संबंधित पोलिस स्टेशनच्या प्रभारींनी तात्काळ एफआयआर नोंदवावा असे आदेश दिले. कायद्यानुसार स्वतंत्र आणि निष्पक्ष तपास करावा. पोक्सो कायद्यातील तरतुदींचे पालन करावे. पीडितांची ओळख आणि प्रतिष्ठा जपली पाहिजे. तपास अहवाल न्यायालयात सादर करावा. न्यायालयाच्या निर्णयानंतर शंकराचार्य म्हणाले, ‘लैंगिक शोषणाचा खटला खोटा सिद्ध होईल. हा एक बनावट खटला आहे. तो (आशुतोष महाराज) रामभद्राचार्यांचा शिष्य आहे. तो इतिहासलेखक आहे. त्याने यापूर्वीही लोकांवर खोटे खटले दाखल केले आहेत. तो लोकांना धमकावतो आणि पैसे उकळतो.‘ अविमुक्ते[illegible]रानंद म्हणाले: रामभद्राचार्य यांच्याशी आमचे सतत शाब्दिक युद्ध सुरू असते. सर्वांना हे माहिती आहे. त्यांनी त्यांच्या शिष्याचा वापर करून आमच्यावर खोटा खटला दाखल केला आहे. ते आम्हाला गायीच्या बचावासाठी सरकारविरुद्ध आवाज उठवणे थांबवू इच्छित आहेत. म्हणूनच हे सर्व आमच्यासोबत घडत आहे. शंकराचार्य म्हणाले, ‘न्यायालयीन प्रक्रिया आहे, आम्ही त्यात सहकार्य करू. यानंतर, सत्य उघड होईल. जर आपण असे असतो तर आपल्याला पश्चात्ताप झाला असता. जर आपण असे नसतो तर काय? बनावट केस बनावटच राहील. म्हणून, आम्हाला तपास लवकरात लवकर पूर्ण करायचा आहे. पोलिस सरकारच्या अधीन काम करतात.

### भाजपा आमदाराला ५ लाखांची

पोलिसांनी सापळा रचला. यामध्ये आमदार चंद्रू लामाणी हे ५ लाखांची लाच स्वीकारताना रंगेहाथ आढळून आले. या कारवाईत लमाणी यांनी मागणी केलेल्या एकूण पैशांपैकी ५ लाख रुपये स्वीकारताना त्यांना पकडण्यात आलं आहे. लोकायुक्तच्या वरिष्ठ अधिका-यांच्या देखरेखीखाली ही कारवाई करण्यात आल्याची माहिती सांगण्यात आली आहे. दरम्यान, अधिका-यांनी सांगितलं की, या आमदाराच्या व्यतिरिक्तत्यांच्या दोन सहका-यांनाही घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आलं आहे. त्यांचीही आता चौकशी केली जात असून या घटनेत आणखी पुरावे गोळा करण्यात येत आहेत. तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### स्वीकृत नगरसेवक निवडीवरून

पराभव झाला. या प्रभागातील चारही जागांवर कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आले. त्यांच्या पराभवाची चांगलीच चर्चा रंगली होती. आता स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीवरून त्यांनी आपली नाराजी उघड केली आहे. विवेक कलोती म्हणाले,ॲड. प्रशांत देशपांडे यांनी अंबापेठ प्रभागातून भाजपतर्फे उमेदवारी मागितली होती. पण, काही कारणास्तव पक्षाने त्यांना उमेदवारी दिली नाही. त्यामुळे ते नाराज झाल्याची वार्ता पसरली होती. त्यांनी घरात बसणे पसंत केले. जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे खुद्द त्यांच्या निवासस्थानी गेले आणि त्यांची समजूत देखील काढली. तरी देखील त्यांनी अंबापेठ प्रभागातील भाजपच्या चारही उमेदवारांच्या प्रचारात सहभाग घेतला नाही. अंबापेठ प्रभाग तर सोडाच इतरही प्रभागांमध्ये भाजपच्या उमेदवारांचा प्रचार त्यांनी केला नाही. त्यांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांना भाजपने स्वीकृत सदस्यपद दिले, असे माझे स्पष्ट मत आहे. विवेक कलोती म्हणाले, भाजपमधील अंतर्गत राजकारणामुळेच माझा पराभव झाला, हे माझे ठाम मत आहे. स्वीकृत सदस्यपदाच्या निवडीवरून मी समाज माध्यमावर माझे मत व्यक्त केले होते. मी नाराज नाही, पण मी माझी भूमिका या माध्यमातून मांडली. दरम्यान, भाजपमधील हे नाराजीनाट्य वाढण्याची चिन्हे आहेत. विवेक कलोती हे २०१७ मध्ये झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत विजयी झाले होते, पण यावेळी त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. भाजपच्या अंतर्गत राजकारणामुळेच आपला पराभव झाला, असा आरोप कलोती यांनी केला आहे. विवेक कलोती यांची २०१८ मध्ये महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी देखील बिनविरोध निवड झाली होती.

### विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा

पुनसेला सर्वाधिक ६ सुवर्ण व १ रोख पारितोषिक, एसआर राठी महाविद्यालय वाशिमची पल्लवी बालकृष्ण राठोड या विद्यार्थिनीला ५ सुवर्ण ,१ रोप्य व संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय शेगाव येथील तेजस्विनी विठ्ठल भगत व विद्याभारती महाविद्यालयाची साईश्वरी सत्यजित इंदुरकर या विद्यार्थिनीला ४ सुवर्ण असे पारितोषिक घोषित करण्यात आले आहे. ८४ विद्यार्थ्यांना पदके देऊन सन्मानित केले जाणार आहे. यामध्ये ६७ मुली तर १८ मुले आहेत. अशी माहिती आज शनिवार २१ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषदेमध्ये कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी दिली. त्यांनी सांगितले की, विद्यापीठाच्या स्थापनेला ४३ वर्ष पूर्ण होत आहे. ४५१ महाविद्यालय विद्यापीठाशी संलग्नित असून आठ महाविद्यालय स्वायत्त आहे. परीक्षेचे बदललेले स्वरूप, सेमिस्टर, वेळेवर निकाल यामुळे परीक्षा घेण्याचे कार्य कार्यक्षमतेने व गतिशील करण्याचा विद्यापीठाचा सातत्यपूर्ण प्रयत्न नेहमीच असतो. उन्हाळी २०२५ मध्ये एकूण २ लाख ७६ हजार ७५० परीक्षार्थी होते. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या १ लाख ५६ हजार ८९० आहे. माजी विद्यार्थ्यांची संख्या १ लाख १९ हजार ८६७ इतकी आहे. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. अभ्यासक्रमाची संख्याही वाढलेली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. समारंभामध्ये मानवविज्ञान विद्याशाखाचे १०७८७, वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा ७९१३, विज्ञान व तंत्रज्ञान १७१५५ आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास ४४३३, याव्यतिरिक्त स्वायत्त शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय ४५१, स्वायत्त शारीरिक शिक्षा महाविद्यालय एचवीपीएम ८५२, स्वायत्त शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था ४३९, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग बनडेरा १७७, पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट ११० इतक्या पदविकाक्षींना सुद्धा पदवी दिल्या जाणार आहे. विशेष म्हणजे जास्तीत जास्त पदक मुलींनाच देण्यात आलेली आहे. प्रथम तीन मध्ये मुलींनीच बाजी मारलेली आहे.

**-डॉ. कमलताई गवई डिलीटने होणार सन्मानित-** समारंभात माजी लेडी गव्हर्नर डॉ.कमलताई रामकृष्ण गवई यांना मानव विज्ञान विद्याशाखा अंतर्गत राज्यशास्त्र विषयात डिलीट पदवी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.४६६ संशोधकांना आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे एकूण २०७ पदवीधारक आहे. रसायनशास्त्र विषयात २३, भौतिकशास्त्र १४, संगणक विज्ञान पाच, प्राणीशास्त्र २३, गणित एकोणवीस ,सांख्यिकी दोन ,सूक्ष्मजीवशास्त्र नऊ, वनस्पतीशास्त्र १२, संगणक शास्त्र व अभियांत्रिकी ४६, परमाणु अभियांत्रिकी विद्युत अभियांत्रिकी आठ, स्थापत्य अभियांत्रिकीच्या चार,माहिती व तंत्रज्ञान एक, रासायनिक तंत्रज्ञान एक, पर्यावरण विज्ञान एक ,जीव तंत्रज्ञान एक व विज्ञान २०, वाणिज्य व्यवस्थापन विद्या शाखेमध्ये ७४, मानव विज्ञान विद्या शाखेमध्ये १२१ आचार्य पदवीधारक आहे.

### नवीन नियमामुळे ६० टक्के सोलर

खपत पाहून सोलर पॅनल लावत असतात. गेल्या एक वर्षात महावितरण कंपनीने ही मर्यादा कमी केली आहे. ग्राहकांची मागणी कमी होईल. विशेष म्हणजे महावितरण कंपनीने नवीन धोरण कुठल्याही कागदपत्रच्या आधार बनवून केलेले नाही. कुणालाही सूचना किंवा शिफारशी घेतलेली नाही. सरळ सरळ हा नियम पोर्टलवर लागू केला आहे.अनेक ग्राहकांच्या घरी सोलर पॅनल लावल्यानंतर इलेक्ट्रॉनिक उपकरण वाढवतात. त्यामुळे विजेची खपत वाढते. महावितरण कंपनीने सरासरी सोलर पॅनल ला मंजुरी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ग्राहकांचे बिल वाढण्याची शक्यता आहे. वास्तविक अनेक कुटुंब आपल्या जीवन शैलीच्या आधारावर सोलर पॅनल घेत असतात.पत्रकार परिषदेत विवेक यादव, सुनील पाटील, विक्रांत जोशी, आशिष पेठ, विनय वैद्य ,धीरेंद्र कानव, श्रीकांत तिखीले, शुभम डगवार, प्रतीक याऊल, अतुल अनासाने उपस्थित होते.

### दर्यापूर तालुक्यात ११ केंद्रावर

पेपरला ३८ विद्यार्थ्यांनी गैरहजेरी लावल्याची माहिती पंचायत समिती शिक्षण विभागाचे प्र.गट शिक्षणाधिकारी संतोष घुगे यांनी दिली. तसेच ठिकठिकाणच्या परिक्षा केंद्रावर दर्यापूरचे ठाणेदार सुनिल वानखडे,येवदाचे ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर व खल्लारचे ठाणेदार रविंद्र बारड यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दर्यापूर तालुक्यातील एकुण ११ परीक्षा केंद्रापैंकी दर्यापूर शहरात आदर्श हायस्कूल,प्रबोधन विद्यालय, रत्नाबाई राठी विद्यालय, हि ३ परीक्षा केंद्र असून ग्रामिणमध्ये सर्वोदय विद्यालय कोकर्डा, काशीबाई अग्रवाल विद्यालय येवदा, गयाबाई राऊत विद्यालय येवदा, दारापूर हायस्कूल दारापूर, खल्लार हायस्कूल खल्लार, राष्ट्रीय विद्यालय तोगलाबाद,शहीद शालिकराम जावरकर विद्यालय सासन-रामपूर, झामाजी वाकपांजर विद्यालय थिलोरी अशी ८ केंद्र आहेत. तहसिलदार डॉ.रविंद्रकुमार कानडजे, प्रभारी गटविकास अधिकारी बाळासाहेब रायबोले यांच्या नेतृत्वाखाली बैठे पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. शिक्षण विस्तार अधिकारी नंदकुमार जाधव,उपपरीक्षक अशोक बावनेर, सहाय्यक म्हणून राजेश सावरकर,अतुल हारे,प्रमोद कुरळकर,सुनिल स्वर्गीय,अमित वानखडे, तुळशीदास धांडे, मोहम्मद अजान, मोहम्मद इरशाद ,भारत माहोरे, संतोष पारडे, आदी चोखपणे कामकाज पाहत आहेत.भरारी पथक प्रमुख नायब तहसिलदार प्रमोद काळे,व नियुक्त सहायक यांच्याकडून सर्व केंद्रावर लक्ष ठेवण्यात आले असून पहील्या पेपरला कुठेही कॉपीचे प्रकरण समोर आले नाही.

### बांधकामस्थळी आढळला कुजलेला

मध्ये जाऊन पाहिले तर एका कोपऱ्यामध्ये कुजलेला मृतदेह दिसला. मृतदेहाचा चेहरा विकृत झाला होता. यामुळे त्याची ओळख पटली नाही. मजुरांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठवला. चार ते पाच दिवसापूर्वीचा हा मृतदेह असण्याचा अंदाज लावला जात आहे. पोस्टमार्टम रिपोर्ट आल्यावर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. पोलिसांनी मजुरांची विचारपूस केली आहे तसेच परिसरातील व्यापाऱ्यांची ही विचारपूस केली जात आहे. परिसरातून कोणी बेपत्ता आहे का ? याचा तपासही पोलीस करत आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

### ‘धर्माच्या आधारावर आरक्षण

आरक्षण रद्द झालं पाहिजे.’ त्यांच्या मते, ही बाब न्यायालयाच्या अनेकदा निदर्शनास आणून देण्यात आली असून, कोर्टात गेले तरी ही याचिका टिकू शकणार नाही. मुस्लिम आरक्षण रद्दीकरणाच्या निर्णयावरून राज्यातील राजकारण तापले असताना, बोंडेंच्या या विधानामुळे न्यायालयीन लढाईसोबतच वैचारिक संघर्षही तीव्र होण्याची चिन्हे आहेत. आता न्यायालय काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### एसटीच्या धडकेत कुष्ठरोगी

०८८४ क्रमांकाची एसटी बस गर्ल्स हायस्कूल चौकातून जात असताना एका कुष्ठरोगी व्यक्तीचा पाय बसच्या मागील चाकाखाली आला. अपघात होताच एसटी चालक व वाहक तेथून निघून गेले. जखमी व्यक्ती मदतीसाठी आक्रोश करत रस्त्यावर पडून होता, मात्र प्रत्यक्षदर्शींपैकी कोणीही मदतीला पुढे आले नाही.

त्याच वेळी माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख हे त्या मार्गावरून जात होते. ही परिस्थिती पाहताच त्यांनी तातडीने थांबून जखमी व्यक्तीची विचारपूस केली आणि स्वतः पुढाकार घेऊन त्याला उपचारासाठी रुग्णालयात हलवले. डॉ. देशमुखांच्या या तत्परतेमुळे जखमीला वेळेत उपचार मिळाले असून सर्वत्र त्यांच्या या कार्याचे कौतुक होत आहे.

### मुर्तीजापुरच्या श्रेया ने

वाया जाऊ नये या उद्देशाने अमरावती मंडळाने पुढाकार घेऊन तिला रुग्णालयात पेपर देण्याची संधी दिली. योग्य असा हा निर्णय मंडळाच्या वतीने घेण्यात आला आहे.

माहितीनुसार श्रेया देशमुख शनिवारचा सकाळी पेपर देण्यासाठी देशमुख कॉलेज सेंटरवर गेली होती. तिचा रोल नंबर ४९८६ होता. श्रेया पेपर देत असतांनाच अचानक तिची प्रकृती बिघडली आणि चक्कर येऊन ती खाली पडली. केंद्रावर कार्यरत कर्मचाऱ्यांनी तिला महाजन रुग्णालयात दाखल केले आणि तिच्या पालकांना सुचित केले. श्रेया शुध्दीवर आल्यावर तिने पेपर देण्याचा निर्णय घेतला. पालकांनी केंद्र संचालक रामटेके यांना हे सांगितले. त्यांनी अध्यक्ष संदीप सांगवे यांना सुचित केले. यानंतर संदीप सांगवे यांनी महाजन रुग्णालयामध्ये श्रेया सोबत फोनवर चर्चा केली. तिचे म्हणणे ऐकल्यावर त्यांनी तिला पोलीस बंदोबस्तात रुग्णालयातच पेपर देण्याची परवानगी दिली. यावेळी महिला पोलीस कर्मचारी सरला पारोदे, पर्यवेक्षक ढोकणे, परीक्षक वैशाली रामटेके ,उपपरीक्षक मोहम्मद इब्राहिम उपस्थित होते. सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या देखरेखीमध्ये तिने पेपर दिला.

### विद्यार्थिनीवर अत्याचार करून

सांगून तिला विश्वासात घेण्यात आले.

हॉटेलमध्ये गेल्यावर आरोपींनी तिला काचेच्या ग्लासमध्ये ड्रिंक दिले, ज्यात आधीच नशेचे औषध मिसळले होते. ते प्यायल्यानंतर तरुणी बेशुद्ध झाली. याच अवस्थेत आरोपींनी तिच्यावर अत्याचार केला आणि त्याचे व्हिडिओ चित्रीकरण केले. या घटनेनंतर पीडिता प्रचंड घाबरली होती, त्यामुळे तिने कोणालाही काही सांगितले नाही. मात्र, आरोपींनी तो व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला वारंवार त्रास दिला आणि पाच लाख रुपयांची मागणी केली.

सततच्या त्रासाला कंटाळून अखेर पीडितेने पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी चेतन आणि आकाश यांच्याविरुद्ध पोलिसांनी कलम ३७६,३५४ अ,३५४ ड,३८४,३२३,५०४,५०६,३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### दोन वेगवेगळया अपघातांत दोघांचा

उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ही घटना १२ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी तक्रारीवरून वरुड पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. दुसरी घटना तळेगाव दशासर पोलीस ठाणे हद्दीत घडली. चांदूर रेल्वे येथील संतोष गोडांवणे हे आपल्या दुचाकीने (क्रमांक एमएच २७/एएक्स ७५७१) सुलतानपूर ते बोरी मार्गावरून जात होते. दरम्यान, ट्रॅक्टर (क्रमांक एमएच २७/डीयू ४९१८) चालकाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात संतोष गोडांवणे यांचा मृत्यू झाला. अनिल केवट यांच्या तक्रारीवरून तळेगाव दशासर पोलिसांनी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस करीत आहेत.

### सामदा येथिल नागरिकांचे तहसिल

येथील नविन वाढीव गावठाणला पर्यायी रस्ता मिळणे, मे २५ मध्ये घरकुल लाभार्थ्यांचा सर्व्हे करण्यात आला असता त्याला मंजुरात मिळणे व सुटलेल्या लाभार्थ्यांचे सर्व्हेक्षण करणे आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

शासन निर्णयानुसार नागरीकाद्वारे केलेला पत्र व्यवहार संबंधात ७ दिवस किंवा ३० दिवसाच्या आत कारवाई करणे क्रमप्राप्त असतानाही दुर्लक्ष केल्या गेले आहे. सामदा येथील नागरीक यांनी अनेकदा पत्रव्यवहार करून मागण्या संदर्भात लक्ष वेधले तरी सुध्दा कार्यालया मार्फत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही , यामुळे ग्रामस्थ संतप्त झालेत. यासंबधी तातडीने कारवाई करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलन प्रभाकर चौरपगार यांच्या नेतृत्वात करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ संगिता भगत, योगेंद्र रायबोले,एकनाथ पळसपगार, मनोहर तराळ, रुपेश गोविंदसिह,सुरेश भांडे,संतोष तराळ,सचिन एलोणे,उमेश राणे, अशोक धांडगे,किशोर सूर्यवंशी, जगन्नाथ किरडे विनोद भोंडे निवृत्ती कोलटक्के ,मनोज घुगरे, दिपक चुगले,यांच्यासह शेकडो ग्रामस्थ आंदोलनात सहभागी झाले होते.

### भरधाव वाहन उलटले, आठ

ा जीवदान मिळाले. ही घटना २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजता घडली. या प्रकरणी चांदूर बाजार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक मधुकर भास्कर यांच्या तक्रारीवरून अज्ञात बोलेरो चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला आहे.

माहितीनुसार, २० फेब्रुवारी रोजी उपनिरीक्षक मधुकर भास्कर हे ड्युटीवर असताना डायल ११२ वर गुरे घेऊन जाणारे वाहन अपघातग्रस्त झाल्याची माहिती मिळाली. तत्काळ ते इतर पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. तेथे एमएच ३० / एएफ ८६५६ क्रमांकाची बोलेरो पिकअप गाडी उलटलेली आढळून आली.पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असता, गाडीत अकरा गुरे अमानुषपणे भरलेली असल्याचे स्पष्ट झाले. यामध्ये आठ गुरे मृतावस्थेत आढळली. गंभीर अवस्थेत असलेल्या तीन गुरांना सुरक्षितपणे गोरक्षकांकडे पाठविण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, गुरांची बेकायदेशीर व क्रूर वाहतूक रोखण्यासाठी अधिक कडक कारवाईची मागणी होत आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# विनापरवानगी कॉम्प्लेक्सचे बांधकाम तात्काळ बंद करा

## मनवर शाह लुकमान शाह यांची नगरपंचायतकडे तक्रार

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

**मौजा मानोरा येथील मालमता शीट नंबर १ प्लॉट क्र. ३१७ क्षेत्र १३२ चौ. मीटर धारनाधिकार (ब) चा प्लॉट माझे आजोबा इब्राहीमशाह अन्वरशाह यांना शासनाकडून मिळालेल्या प्लॉटवर शामराव आत्माराम उईके यांनी नगरपंचायतची बांधकाम परवानगी न घेता विना परवानगी शॉपिंग कॉम्प्लेक्सचे सुरु केलेले बांधकाम तत्काळ बंद करा. याबाबत मानोरा नगरपंचायत कार्यालयात दि. १६ फेब्रुवारी रोजी मनवर शाह लुकमान शाह यांच्याकडुन तक्रार देण्यात आली आहे.**



दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले की, माझे आजोबा इब्राहीमशाह अन्वरशाह यांना स.न. १९६७/६८ मध्ये तहसीलदार मंगरुळपीर यांचे कार्यालयाचे केस क्र. ३२/०६/१९६७-६८ नुसार ३० रुपये भरून घेऊन मानोरा येथील मालमत्ता शीट नंबर प्लॉट क्र. ३१७ क्षेत्र १३२ चौ.मी.धारनाधिकार (ब) चा प्लॉट शासनाकडून मिळालेला आहे. माझे आजोबा इब्राहीम शाह अन्वर शाह यांनी शामराव उईके यांना प्लॉट खरेदी करून दिला नसतांना नझुल मालमता पत्रकावर शामराव आत्माराम उईके यांच्या नावाची नोंद चुकीच्या पद्धतीने अधिकारी यांना हाताशी धरून आर्थिक देवाण घेवाण करून बोगस नोंद घेतली आहे. व त्याचाच गैर फायदा घेऊन विना परवानगी त्या प्लॉटवर शामराव उईके यांनी बांधकाम सुरु केले आहे. सदरचे प्लॉटची मालमत्ता नोंद रद्द करण्याकरिता प्रकरण तहसील कार्यलयात न्याय प्रविष्ठ आहे. विशेष म्हणजे सदर बांधकाम नगर पंचायतच्या रस्त्यावर मेन रोडला लागुण जवळच सुरु असल्याने मालमता शीट नंबर प्लॉट क्र. ३१७ क्षेत्र १३२ चौ.मी.धारनाधिकार (ब) इब्राहीमशाह अन्वरशाह यांच्या मालकीचा असल्याने त्यावर विना परवानगी अवैद्यरित्या सुरु केलेले शामराव उईके यांचे कॉम्प्लेक्सचे बांधकाम ताबडतोब बंद करण्यात यावे. अशी मागणीचे निवेदन मानोरा नगरपंचायत मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे. निवेदनासोबत सहपत्र प्लॉट क्र. ३१७ ची आखीव पत्रिका, प्लॉट क्र. ३१७ या ७०, प्लॉट क्र. ३१७ चा वाटप आदेश, प्लॉट क्र. ३९७ ची ताबा पावती, प्लॉट क्र. ३१७ चा आदेश, प्लॉट क्र. ३१७ ची रक्कम भरल्याची पावती सुद्धा देण्यात आली असुन प्रतिलिपी जिल्हाधिकारी वाशीम, तहसील कार्यालय तहसीलदार मानोरा, ठाणेदार पो.स्टे. मानोरा यांना पाठविण्यात आल्या आहेत.

> मानोरा नगरपंचायत कार्यालयात तक्रार दाखल झाली आहे. त्या तक्रारीची संपूर्ण चौकशी करण्यात येईल.
>
> **उमेश राठोड**
> मुख्याधिकारी नगरपंचायत मानोरा

# बालविकास मंदिर प्राथमिक शाळेत घेतले जातात उत्कृष्ट उपक्रम - हनुमान लांडकर

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

येथील तहसील कार्यालयाजवळ बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा मालेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती शाळेमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त शाळेच्या विद्यार्थ्यांनी मालेगाव शहरात निघणाऱ्या भव्य मिरवणुकीत देखावा सादर केला व शाळेत प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक विठ्ठल कुटे तर प्रमुख अतिथी हनुमान लांडकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची पूजन व हार अर्पण करून करण्यात आले. १९ फेब्रुवारी ला छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त निघणाऱ्या भव्य रॅलीमध्ये शिवरायांची जीवन चरित्रावर आधारित नाट्य वर्ग २ री तील विद्यार्थ्यांनी सादर केले. त्यामध्ये शिवरायांचा जन्म, जिजाऊंची शिकवण, शिवराज्य राज्याभिषेक, अफजलखान वध अशा पद्धतीचा उत्कृष्ट देखावा लेझीम पथकासह शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केला. यावेळी मालेगाव शहरातील सर्व भागातून ही रॅली काढण्यात आली यामध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिवचरित्र देखाव्याची सर्व



उपस्थित मंडळींनी प्रशंसा केली. यानिमित्त शाळेत प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली त्यामध्ये आयशा अंजुम सय्यद दस्तगीर, कोमल कांबळे, आदित्य देवळे.

या विद्यार्थ्यांचे अनुक्रमे क्रमांक देण्यात व मान्यवरांच्या हस्ते त्यांना बक्षीस वितरित करण्यात आली. प्रमुख अतिथी हनुमान लांडकर यांनी या स्पर्धेची पाहणी केली व विद्यार्थ्यांचे कौतुक सुद्धा यावेळी केले. सदर शिवजयंती मिरवणुकीचे व कार्यक्रमाचे आयोजन विठ्ठल कुटे, जिजेबा घुगे व केशव इंगळे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी धोंगडे व कोमल कांबळे यांनी केले. शिवजयंती कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे व सर्व शिक्षक यांनी मोलाचं सहकार्य करून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# वाशिम येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती भक्तिभावात व उत्साहात साजरी



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

स्थानिक आय.यु.डी.पी. कॉलनी परिसरात स्थित संत सेवालाल महाराज संस्थान येथे संत सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती दि. १५ फेब्रुवारी रोजी अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

या जयंती सोहळ्याचे आयोजन समस्त बंजारा बांधव तसेच संस्थानच्या पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. जयंतीनिमित्त सकाळपासूनच परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर संस्थानचे प्रमुख असलेले भगत नेमीचंद महाराज यांच्या हस्ते विधीवत भोग भंडार लावण्यात आला. पारंपरिक पद्धतीने विनंती अर्दास करण्यात आली. यावेळी उपस्थित भाविकांनी श्रद्धेने नतमस्तक होत संतांच्या चरणी आपली कृतज्ञता व्यक्त केली. 'जय सेवालाल'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. याप्रसंगी भजन-कीर्तनाच्या स्वरांनी कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

जयंतीनिमित्त संत सेवालाल महाराजांच्या जीवनकार्याचा आढावा घेण्यात आला. बंजारा समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी दिलेले योगदान, सामाजिक समता, बंधुभाव, सत्य, संयम आणि नैतिकतेचा संदेश यावर उपस्थित मान्यवरांनी प्रकाश टाकला. त्यांच्या शिकवणुकीमुळे समाजात एकोपा आणि नैतिक मूल्यांची जपणूक कशी झाली, याचे विवेचन करण्यात आले. समाजातील युवकांनी संतांच्या विचारांचे अनुकरण करून व्यसनमुक्ती, शिक्षण आणि सामाजिक प्रगतीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच बालकांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. जयंतीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचा लाभ घेतला. स्वयंसेवकांनी महाप्रसाद वितरणात सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमात सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि श्रद्धेचा सुंदर संगम पाहायला मिळाला. जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थानचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बंजारा समाजबांधवांनी परिश्रम घेतले. या जयंती निमित्ताने शहरात धार्मिक उत्साहासोबतच सामाजिक एकात्मतेचा संदेश अधोरेखित झाला.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**कारंजा :** तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, खेर्डा येथे संस्थेच्या अध्यक्षा किर्तीताई अर्जुन, संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन पंडित यांच्या मार्गदर्शनात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व श्री. दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर भाषणे केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप पांडव यांनी आपल्या भाषणात शिवाजी महाराजांचे पराक्रम, स्वराज्य स्थापनेसाठी केलेला संघर्ष, दूरदृष्टी, न्यायनिष्ठा व आदर्श नेतृत्व यांचा उल्लेख करून त्यांच्या विचारांचे अनुकरण करावे, असे आवाहन केले.

# मेडशी येथे ग्राम संसद भवन व डिजिटल ज्ञानपीठ अभ्यासीकेस पत्रकारांची भेट

## विनोद तायडे यांच्याकडून महापुरुषांच्या पुस्तकांची भेट

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

तालुक्यातील मेडशी गावात ग्राम संसद भवन व 'डिजिटल ज्ञानपीठ' अभ्यासीकेला गावातील सर्व पत्रकार बंधूंनी सदिच्छा भेट देत सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम राबविला. वाशिम जिल्ह्यातील झुंजार पत्रकार म्हणून ओळख असलेले पत्रकार विनोद तायडे यांनी या प्रसंगी अभ्यासीकेस महापुरुषांच्या विचारांवरील दर्जेदार पुस्तकांची भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठेवा प्रदान केला.

मेडशी ग्रामपंचायत अंतर्गत सुरू असलेल्या ग्राम संसद भवन व डिजिटल ज्ञानपीठ अभ्यासीका ही विद्यार्थ्यांसाठी ज्ञानसाधनेचे प्रभावी केंद्र ठरत आहे. स्पर्धा परीक्षा, शासकीय नोकरी, विविध प्रवेश परीक्षा तसेच शैक्षणिक




मार्गदर्शनासाठी येथे नियमित अभ्यासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकार बांधवांनी भेट देत अभ्यासीकेची पाहणी केली व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या वेळी विनोद तायडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, त्यागमूर्ती रमाई, महाराणी अहिल्यादेवी होळकर आदी महापुरुषांच्या कार्य, विचार व चरित्रांवरील पुस्तकासह इतर साहित्य अभ्यासीकेस भेट दिली. 'विद्यार्थ्यांनी केवळ स्पर्धा परीक्षेपुरते मर्यादित न राहता महापुरुषांचे विचार आत्मसात करून समाजाभिमुख दृष्टीकोन जोपासावा,' असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच उपस्थित सर्व पत्रकार बांधवांना नवीन वर्षाचे कॅलेंडर व पुस्तके देऊन स्नेहबंध अधिक दृढ केले.

कार्यक्रमास ग्रामपंचायत सरपंच शेख जमीर शेख गणिभाई, पत्रकार अजय चोथमल, अनिस बागवान, गोरख भागवत प्रसाद पाठक, विठ्ठल भागवत, सोहेल पठाण, अजिंक्य मेडशीकर, युसूफ पठाण, सचिन साठे आदी मान्यवर उपस्थित होते. सरपंच शेख जमीर यांनी आपल्या मनोगतात विनोद तायडे यांचे विशेष आभार मानत सांगितले की, 'गावातील विद्यार्थ्यांसाठी ही पुस्तके अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी तसेच नोकरीच्या संधींसाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या या अभ्यासीकेला पत्रकारांनी दिलेले पाठबळ प्रेरणादायी आहे.' विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत पुस्तकांचा अभ्यासासाठी मोठा फायदा होईल, अशी भावना व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करण्याचा निर्धार व्यक्त करत अभ्यासीका अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

# गायवळ येथे आगळी वेगळी आदर्श शिवजयंती उत्साहात साजरी



**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

कारंजा लगत असलेले ग्राम गायवळ येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. आज शिवजयंती केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर विचारांची आणि कर्तृत्वाची जयंती म्हणून साजरी व्हावी, याचा आदर्श वस्तुपाठ जय भवानी नवयुवक मित्र मंडळ, तथा श्रमशक्ती फाऊंडेशन बजरंग चौक, गायवळ यांनी समाजासमोर ठेवला.

कोणताही DJ चा गजर, दिखाऊपणा किंवा अनावश्यक खर्च न करता, शांततेत, शिस्तीत आणि सामाजिक बांधिलकीतून शिवजयंती साजरी करण्याचा त्यांचा निर्णय खरोखरच प्रेरणादायी ठरला. कारण छत्रपती शिवाजी महाराज यांची शिकवण ही नेहमीच लोककल्याण, न्याय, स्वराज्य आणि माणुसकी यांवर आधारलेली होती. या विशेष दिनानिमित्त मंडळाच्या वतीने अपंग व मतिमंद विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले, तसेच वृद्धाश्रमात जाऊन नाश्त्याचे वितरण करून 'समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे' हा खरा शिवविचार जिवंत ठेवण्यात आला. हे उपक्रम केवळ मदतीपुरते मर्यादित न राहता, संवेदनशीलतेची आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारे आहेत. या कार्यक्रमात जय भवानी मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते व श्रम शक्ती फाउंडेशन चे सर्व सदस्य यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांना सामुहिक हार अर्पण करून पूजन करण्यात आले. सर्व स्तरावरून जय भवानी नवयुवक मित्र मंडळ व श्रम शक्ती फाउडेंशन यांच्या या स्तुत्य उपक्रमांचे मनापासून कौतुक सुरू आहे.

## सह्याद्री रत्न पुरस्काराने प्रगती ठाकरे सन्मानित



**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

येथील मूळचे रहिवाशी असलेल्या प्रगती हरिभाऊ ठाकरे यांना दि. १९ फेब्रुवारी रोजी पुणे येथे कलावंत दादासाहेब फाळके व सह्याद्री रत्न पुरस्कार देऊन स्वराज्य फिल्म प्रोडक्शन तर्फे अभिनेते दिग्दर्शक कलाकार तसेच सुप्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. प्रगती ठाकरे यांचे वृत्तलेखन कविता कथालेखन सामाजिक कार्य साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या व सध्या दारव्हा येथे शिक्षिका म्हणून कार्य करीत असलेला प्रगती ठाकरे (जगदंबा कोचिंग क्लासेस संचालिका) वृत्त लेखिका व कवयत्री असे त्यांचे वेगवेगळ्या क्षेत्रात अंतर्मुख होऊन कार्य करीत असलेल्या प्रगती ठाकरे यांना वरील पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

# श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

तालुक्यातील तिर्थक्षेत्र पोहरादेवी शिवजन्मोत्सव समिती च्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंती यांची ३९६ व्या जयंत उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी प्रमुख अतिथी माजी पंचायत समिती सदस्य विजय अनंतकुमार पाटील यांच्या वतीने पुजन करण्यात आले व प्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष अर्जुन सतिश पालकृतवार व उपाध्यक्ष अक्षय संतोष पुसांडे व तसेच प्रमुख उपस्थिती उल्हास महाराज, उपसरपंच वसंतनगर अनिल नाईक, श्री हरीदास नाईक, गोविंद महाराज, खुशाल



महाराज, दिलीप वसराम जाधव, ग्रा .प. सदस्य सुशिल पुसांडे, ग्रा.प. सदस्य गजानन भालेराव, अमोल राठोड,. रवि पातुरकर, संजय पुसांडे, दतराम शिंदे, वासुदेव कजबे राम शिंदे, सचिन डोळस, नितीन चव्हाण, गुलाब पुसांडे, पवन निरंजन दारव्हेकर , प्रविण काजळे कुंडलिक आहिरे, राजेंद्र पिंगाणे, रवि पुसांडे, जय जयस्वाल , राज जयस्वाल, प्रविण जाधव, गुलशन हरसुले, वैभव मन्नरवार, शुभम घुगे, पप्पू जयस्वाल, बापूराव पुसाडे, जय शिंदे, शुभम खोडके, आयुष्य घुगे, पप्पू खोंड, अजय ढोके, सांरग लाखेकर, अमित लाखेकर, सागर वाघमारे अजय पडधने, प्रणय पडधने, विक्की गायकवाड, वैभव पुसांडे, आकाश कुंटे , प्रणव कडुकार गणेश होटगीर शेखर देवकते, रामहरी, नितीन पडधने सोनटक्के व तसेच युवक तथा वरिष्ठ मंडळी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**नोटीस देणार :-** गणेश महादेव किनवटकर वय अं. ४५ वर्ष, धंदा - मजुरी रा. लावना ता. मंगरूळपीर जि. वाशिम

**नोटीस प्राप्त करणार :-** १. अरूण बाबुलाल गेडाम वय अं. ६० वर्ष, धंदा- शेती २. पंकज अरून गेडाम वय अं. ४० वर्ष, धंदा - मजुरी दोघेही रा. लावना ता. मंगरूळपीर जि. वाशिम

यात नोटीस देणार कळवितो की, ते येणे प्रमाणे गणेश महादेव किनवटकर यांनी दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायलय मंगरूळपीर येथे नोटीस प्राप्त करणार यांनी मौजे - लावना ता. मंगरूळपीर जि. वाशिम येथील मालमत्ता क्र. ११८ या जागेचे दि. २३/११/२०१७ रोजी दस्त क. २०७२ ची खरेदी केली. ती रदद करण्या करीता गणेश- विरुध्द - माधुरी चौधरी दावा दाखल केला या दाव्यात नोटीस प्राप्त करणार हे प्रतिवादी आहेत वि. न्यायालयांनी प्रतिवादी यांना नोटीस दिली. परंतु नोटीस घेण्यास अरूण बाबुलाल गेडाम व पंकज अरून गेडाम हे नोटीस घेण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत वि. मामल्यात नेमलेली तारीख २५/०२/२०२६ आहे या तारखेच्या आत नोटीस प्राप्त करणार यांनी हजर व्हावे करीता नोटीस प्राप्त करणार यास कळविले आहे.

मंगरूळपीर
दिनांक :-२५/०२/२०२६

**सही**
**गणेश महादेव किनवटकर**

## जाहिरनामा

या जाहीरनाम्याव्दारे सर्वत्र लोंकाना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी संदर्भिय अर्जान्वये अर्जदार श्री कविता गजानन चव्हाण रा चोरद ता मंगरुळपीर जि वाशिम यांचा अर्जान्वये सुरु करण्यात आले आहे. प्रकरणात अर्जदार यांची मौजे चोरद येथील सर्वे क्र/ गट क्र ७६ मधील एकुण क्षेत्र ५.२३ हे आर पैकी क्षेत्र १.२१ आर शेत जमीन असुन सदर शेतजमीन अर्जदार यांचे ताब्यात व वहीतीत आहे. सदर जमीनीचे ७/१२ वर इतर अधिकार मध्ये साधे कुळ सिताराम देमाजी दर्शविलेले आहे. सदर कुळाचा बोझा कमी करण्यासाठी अर्जदार यांनी विनंती अर्ज सादर केला आहे. अवगन सदर प्रकरणात कोणाला काही आक्षेप/ हरकती दाखल करावयाच्या असल्यास त्यांनी सदरच्या जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून (कार्यालयीन सुटीचे दिवस सोडून ) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात आपल्या हरकती/ आक्षेप सादर करावे. मुदती नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ - मंगरुळपीर
दिनांक -०९/०१/२०२६

**- स्वा -**
**तहसिलदार मंगरुळपीर**

## सोमठाणा जि. प. शाळेत शिवजयंती साजरी



**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

येथून जवळच असलेल्या सोमठाणा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी विद्यार्थी यांनी मराठमोळा गणवेश परिधान केला होता. सर्वप्रथम प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण मुख्याध्यापक बालाजी फटाटे यांनी केले व शिवाजी महाराज यांचे जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

# एस.एम.सी. इंग्लिश स्कूलमध्ये कौशल्य परीक्षा संपन्न

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

२१ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्रात एक मोठी कौशल्याधारित परीक्षा आयोजित करण्यात आली. या परीक्षेत राज्यातील ३० पेक्षा जास्त शाळा सहभागी झाल्या होत्या.

ही परीक्षा Versatile Educaare System (VES) या मुंबईस्थित, गेल्या २२ वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या संस्थेद्वारे आयोजित केली जात आहे.

ही पारंपरिक लिखित परीक्षा नसून, प्रत्यक्ष कृतीवर आधारित (Practical) कौशल्य परीक्षा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) च्या उद्दिष्टांनुसार प्रत्यक्ष कौशल्य शिक्षणाची अंमलबजावणी करण्याचा हा प्रयत्न आहे.



विद्यार्थ्यांचे मूल्यमापन फॉनिक्स, अबॅकस, इंग्रजी व मराठी हस्ताक्षर सुधारणा, रुबिक क्यूब, आर्थिक साक्षरता Financial Literacy, वैदिक गणित इत्यादि अभ्यासक्रमद्वारे होणार आहे.

एस एम सी इंग्लिश स्कूल मध्ये संस्थाध्यक्ष प्रा हरि क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनात शाळेच्या मुख्याध्यापिका मीना उबगडे यांनी शाळेत् जून–जुलै २०२५ मध्ये शाळेतील शिक्षकांना ने मार्फत विशेष प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना नियोजनबद्ध अभ्यासासाठी संरचित पुस्तके उपलब्ध करून देण्यात दिली.

सर्व कार्यक्रमांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषद (MSBVET) यांचे प्रमाणपत्र मिळाले आहे तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र (SCERT महाराष्ट्र) यांची मान्यता प्राप्त आहे. त्यामुळे या उपक्रमाला शैक्षणिक मान्यता मिळाली आहे.

हा उपक्रम महाराष्ट्रातील ग्रामीण भागात संरचित कौशल्य शिक्षण आणि NEP 2020 ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. वाशिम मध्ये प्रथमच हे पारंपरिक अभ्यासक्रमाबरोबर व्यावसायिक शिक्षण एस एम सी इंग्लिश स्कूल ने सुरू केल्यामुळे शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. सदर अभ्यासक्रमकरिता पर्यवेक्षिका प्रणिता हरसुले, शिक्षिका स्मिता पाटील, संजय बोदडे, रिंकु खंडेलवाल, संदीप बोदडे, संगीता गाडे, कुसुम मापारी, प्रतीक्षा कान्हेड, संजीवनी पाटील, रश्मि मोहटे तर तंत्र सहाय्य पवन खंडेलवाल यांनी केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ८७ ■ रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.


## गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात दारूबंदीचा फज्जा : कागदावर बंदी रस्त्यावर दारूची दिंडी

### -अवैध दारू विक्रीचा वाढता सुळसुळाट; नागरिकांमध्ये नाराजी

**वर्धा जनमाध्यम :** देशाला संयम, सत्य आणि नैतिकतेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या विचारांनी पावन झालेली ही भूमी. १९७४ पासून अधिकृत दारूबंदी लागू असलेला जिल्हा म्हणून वर्ध्याची ओळख. पण आजचे चित्र संतापजनक आहे. दारूबंदीचा कायदा फक्त कागदावर उरलाय आणि रस्त्यावर मात्र दारूचा उघड उच्छाद सुरू आहे,

गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच अवैध दारूचा महापूर उसळला आहे. चौकाचौकांत अड्डे, गल्लीबोळांत हातभट्ट्या, तर काही ठिकाणी बारसदृश ठाण मांडून खुलेआम विक्री सायंकाळ होताच शहरातील वातावरण बदलते. मुख्य रस्त्यांवर नशेत धुंद तरुणांची टोळकी, दुचाकींचा बेफाम वेग, कर्णकर्कश हॉर्न आणि नागरिकांच्या काळजाचा ठोका चुकवणारे प्रकार रोजचे झाले आहेत.

पोलिस प्रशासनाकडून अधूनमधून लाखो रुपयांची दारू जप्त केल्याच्या बातम्या झळकतात. फोटो, प्रसिद्धीपत्रके, आकडेवारीष्ठ पण दुसऱ्याच दिवशी तीच दारू पुन्हा उपलब्ध होते, हा कोणता जादूचा खेळ, कारवाई खरोखरच प्रभावी आहे की फक्त दिखावा, जनतेच्या मनात संशयाचे ढग दाटले आहेत.



काही अधिकाऱ्यांवर 'चिरीमिरी'च्या कुजबुजीने या आगीला अधिकच फुंकर घातली आहे.

या बेकायदा दारू व्यवसायाने हजारो कुटुंबांचे संसार करपले आहेत. मजूर वर्गाचे घामाचे पैसे नशेत उडत आहेत. विद्यार्थी आणि तरुण पिढी व्यसनाच्या दलदलीत अडकत आहे. काही ठिकाणी विषारी दारू तयार होत असल्याच्या बातम्यांनी भीतीचे सावट निर्माण केले आहे. जीवितहानीची शक्यता डोक्यावर घोंघावत असताना प्रशासन मात्र निवांत?

मारामाऱ्या, छेडछाड, लूटमार आणि अपघातांच्या घटनांत वाढ होत असल्याचे नागरिक सांगतात. रात्रीच्या वेळी महिलांना बाहेर पडणे धोक्याचे वाटू लागले आहे. हीच का दारूबंदीची अंमलबजावणी की बंदीच्या नावाखाली काळाबाजाराला खतपाणी,

जिल्ह्याचे पालकमंत्री हेच राज्याचे गृहराज्यमंत्री असताना त्यांच्या जिल्ह्यात कायद्याचा असा बोजवारा उडणे अधिकच गंभीर आहे. गांधी-विनोबांच्या पावन भूमीत दारूबंदीची अशी विटंबना सहन केली जाणार नाही. आता घोषणांपेक्षा कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाईची गरज आहे.अन्यथा जनता विचारेल दारूबंदी खरोखर आहे कुठे फलकावर, की फक्त भाषणात वर्ध्यातील हा दारूचा महापूर थांबवायचा की नाही, याचे उत्तर आता प्रशासनालाच द्यावे लागणार आहे.

## रक्ताचा हिशेब द्या, सिंदीच्या ग्रामीण रुग्णालयासाठी जनतेचा ज्वालामुखी

### खासदार-जिल्हाध्यक्षाचे मुख्यमंत्र्यांना रक्तपत्र

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** सिंदी रेल्वे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याच्या मागणीने अखेर स्फोटक वळण घेतले आहे. आश्वासनांच्या धुरात वर्षानुवर्षे अडकलेला आरोग्य प्रश्न आता रक्ताच्या शाईतून लिहिला गेला. खासदार अमर काळे यांनी स्वतःचे रक्त काढून थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहित शासनाला थेट जाब विचारला. सिंदीकरांचे प्राण इतके स्वस्त आहेत का असा प्रश्न करत त्यांनी सरकारसमोर आरोग्य व्यवस्थेचे विदारक वास्तव मांडले.

सिंदीसह परिसरातील २५ हून अधिक गावांचा आरोग्य प्रश्न गंभीर बनला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात अपुरे डॉक्टर, तुटपुंजे मनुष्यबळ, साधनसामग्रीचा अभाव आणि आपत्कालीन सेवांची कमतरता यामुळे रुग्णांना ५० किलोमीटर दूर वर्ध्याकडे धाव घ्यावी लागते. अपघात, प्रसूती किंवा हृदयविकाराच्या प्रसंगी प्रत्येक मिनिट महत्त्वाचे असताना, उपचारासाठी होणारा विलंब जीवावर बेततो. आष्टी येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले, तर सिंदीला का नाही असा प्रश्न उपस्थित करत काळे यांनी तातडीचा निर्णय घेण्याची मागणी केली.



या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनीही सहभाग घेत रक्ताने पत्र लिहून शासनाचे लक्ष वेधले. आंदोलनाची तीव्रता इतकी वाढली की तब्बल १४०० हून अधिक नागरिकांनी रक्ताने पत्र लिहून शासनाच्या दारात धडक देण्याचा निर्धार व्यक्त केला. घोषणांचा गजर नव्हता, राजकीय भाषणांची आतषबाजी नव्हती पण रक्ताच्या अक्षरांनीच सत्तेला प्रश्न विचारला.

पालकमंत्र्यांनी सिंदी भेटीदरम्यान शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन दिले होते. मात्र तालुका निर्मिती आणि ग्रामीण रुग्णालयाच्या प्रश्नावर अद्याप ठोस निर्णय का नाही, असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी केला. केवळ आश्वासनांच्या मलमपट्टीवर जनतेचे प्राण अडकवता येणार नाहीत, असा इशाराही देण्यात आला.

रेल्वे गाड्यांचा थांबा व बंद गाड्या सुरू करण्याच्या मागणीसाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत आहोत. वेळ पडल्यास त्या मुद्द्यावरही तीव्र आंदोलन उभारू, असा इशारा खासदारांनी दिला. अमोल सोनटक्के मित्रपरिवार, दशरथ ठाकरे, सुधाकर खेडकर, आशिष देवतळे, गंगाधर व अजय कलोडे, तुषार हिंगणेकर, धनराज झिलपे, बंटी बेलखोडे, युगल अवचट यांच्यासह शेकडो नागरिक या आंदोलनात सहभागी झाले होते.


सिंदीची जनता आता शांत बसणार नाही, हे या रक्तपत्राने स्पष्ट केले आहे. आरोग्य हा हक्क आहे, दान नव्हे ही जाणीव अधिक तीव्र झाली आहे. मंत्रालयाच्या भिंतींवर हा रक्ताचा आक्रोश किती वेगाने आदळतो आणि सरकार खऱ्या अर्थाने निर्णय घेते की पुन्हा आश्वासनांची धूळफेक होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

सिंदीकरांनी रक्ताने लिहिलेला हा जाब आता सत्तेच्या दालनात उत्तराची वाट पाहत उभा आहे.

## अबब...वन तलाव लुटला.. रेतीनंतर आता पाण्याची चोरी

### चार टँकरची परवानगी, वीस टँकरचा बेकायदा उपसा; वन्य प्राण्यांच्या तोंडचे पाणी पळवले

**आष्टी जनमाध्यम :** तालुक्यात रेती चोरीच्या घटना ताज्या असतानाच आता थेट वन तलावातील पाण्यावरच डल्ला मारला जात असल्याचा संतापजनक प्रकार उघड झाला आहे. तळेगाव (शा. प.) वन हद्दीत येणाऱ्या आजनादेवी परिसरातील वन तलावातून सिमेंट रस्ता बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात पाणी उपसले जात असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. अधिकृतरीत्या चार टँकरची परवानगी घेतल्याचे सांगितले जात असताना प्रत्यक्षात रात्रंदिवस वीस टँकर पाणी नेले जात असल्याचा आरोप आहे.



वन्य प्राण्यांची तहान भागविण्यासाठी तयार करण्यात आलेला हा तलाव सध्या कोरडा पडण्याच्या मार्गावर असल्याची भीती व्यक्त होत आहे. उन्हाळ्याच्या तोंडावर वन्यजीवांसाठी जीवनदायी ठरणारे पाणीच उपसले जात असल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र संताप आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांना सिंचनासाठी परवानगी मिळविताना नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाते, मात्र कंत्राटदारासाठी नियम शिथिल कसे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित विभागांकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई न झाल्याने संगनमताचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी महाराष्ट्र वन विभाग, महसूल व लघु सिंचन प्रशासनाने संयुक्त चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.

## सर्वांना साथ देणारा पत्रकार हरपला; वर्ध्याचा 'चारूभाऊ' काळाच्या पडद्याआड

**वर्धा जनमाध्यम :** शब्दांवर नितांत प्रेम करणारा, सत्याशी दोन हात करण्याची हिंमत बाळगणारा आणि मित्रांच्या सुखदुःखात कायम खांद्याला खांदा लावून उभा राहणारा पत्रकार आज हरपला. 'श्रमिक संघर्ष'चे संपादक दिनेश श्याम पाटील (उर्फ चारूभाऊ) यांचे वयाच्या ५३ व्या वर्षी मध्यरात्री १२:१५ वाजता सावंगी येथील रुग्णालयात निधन झाले. त्यांच्यावर स्थानिक स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले,

चारूभाऊ हे नाव म्हणजे विश्वासाचा आधार. राजकीय घडामोडींवरील अचूक विश्लेषण, शासकीय विभागांच्या कामकाजाची सखोल माहिती आणि आकडेवारीवर आधारित भाष्य ही त्यांची ओळख होती. कुठलीही बातमी छापण्याआधी तिची काटेकोर पडताळणी हा त्यांचा नियम होता. त्यामुळे त्यांचे लेखन केवळ वाचले जात नव्हते, तर गांभीर्याने घेतले जात होते.

स्टेट बँकेजवळील इंदिरा सद्भावना परिसरातील त्यांच्या प्रेसमध्ये दररोज मित्रमंडळींची मैफल रंगायची. पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी, तरुण विद्यार्थी सर्वांना ते आपलेसे वाटत.



वाढदिवस असो वा एखादा आनंदाचा क्षण, चारूभाऊ पुढाकार घेऊन साजरा करत. त्यामुळेच 'संपादक' या पदापेक्षा 'चारूभाऊ' हीच त्यांची खरी ओळख ठरली. दरम्यान, अवघ्या तीन महिन्यांपूर्वीच त्यांच्या बंधूंचे निधन झाले होते. त्या दुःखातून परिवार सावरत असतानाच चारूभाऊंच्या जाण्याने घरावर दुहेरी आघात झाला आहे. ती पोकळी भरून निघण्याआधीच नियतीने आणखी एक घाव घातला. त्यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे.

अनेक तरुण पत्रकार त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडले. वृत्तांकनातील शिस्त, सामाजिक जाणीव आणि निर्भीड भूमिका घेण्याचे धाडस त्यांनी नव्या पिढीला दिले. त्यांच्या अचानक जाण्याने ही पिढी अक्षरशः पोरकी झाली आहे.

वर्ध्याच्या पत्रकारितेला दिशा देणारा, सर्वांना साथ देणारा आणि विचारांचा दीप प्रज्वलित ठेवणारा हा माणूस काळाच्या पडद्याआड गेला असला, तरी त्यांची लेखणी, त्यांची तत्त्वनिष्ठा आणि त्यांची मैत्रीची ऊब कायम स्मरणात राहील.

## संत गाडगेबाबांच्या स्मृतींनी सोमवारी कृष्णनगर दणाणणार



**वर्धा जनमाध्यम :** समाजप्रबोधन, स्वच्छता आणि निस्वार्थ सेवेचा अखंड मंत्र देणाऱ्या संत गाडगेबाबा यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी स्थानिक कृष्णनगर येथील श्रीसंत गाडगेबाबा सेवा समितीच्या वतीने सोमवार, दि. २३ रोजी गाडगेबाबा स्मारक येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी परिसर स्वच्छता मोहिमेने होणार आहे. 'स्वच्छता हीच खरी सेवा' हा संतांचा संदेश कृतीतून जपण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला जाणार आहे. त्यानंतर दीपप्रज्वलन व माल्यार्पण करून संतांना अभिवादन करण्यात येईल.

दुपारी विविध भजन मंडळांकडून भजन गायन तसेच कला-कौशल्य व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी रंगणार आहे. सायंकाळी दारव्हा येथील बालकिर्तनकार रौनक अरुण नांदेकर यांचे कीर्तन होणार असून, संतांच्या विचारांची भक्तिरसात न्हालेली साद उपस्थितांना अनुभवता येणार आहे. यावेळी शिवसेना जिल्हाध्यक्ष रविकांत बालपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ. संजय धोटे, नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुधीर पांगुळ व नगरसेवक यशवंत झाडे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. रात्री कला व विज्ञान महाविद्यालय, आर्वी येथील व्याख्याते प्रा. डॉ. सुधाकर भुयार यांचे संत गाडगेबाबा सामाजिक कार्य आणि राष्ट्रीय कामगिरी या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमानंतर प्रसादभोजनाचे वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहून संतांच्या विचारांना वंदन करावे, असे आवाहन उत्सव समितीने केले आहे.

## हर हर महादेव'च्या जयघोषात रामनगर दुमदुमले

### -वीरशैव सेवा मंडळातर्फे महाशिवरात्री उत्सव भक्तिभावात संपन्न

**वर्धा जनमाध्यम :** रामनगर येथील शिवमंदिर, रामनगर येथे महाशिवरात्री निमित्त दोन दिवस अखंड भक्तिरसाची गंगा वाहताना पाहायला मिळाली. वीरशैव सेवा मंडळ, वर्धा यांच्या वतीने आयोजित महाशिवरात्री उत्सव–२०२६ उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला.

उत्सवाची सुरुवात सकाळी अभिषेकाने झाली. सकाळी ७ ते १० वाजेदरम्यान सुनिल मिसाळ यांच्या हस्ते विधीवत अभिषेक पार पडला. त्यानंतर रामनगर येथील गणपती अर्थवशीर्ष मंडळाच्या सहकार्याने गणपती अथर्वशीर्षाचे पठण करण्यात आले. या वेळी मंदिर परिसर मंत्रोच्चारांनी भारावून गेला होता. दर्शनासाठी दिवसभर शिवभक्तांच्या रांगा लागल्या होत्या. उपस्थितांना फराळ प्रसाद व चहापानाची व्यवस्था करण्यात आली.



रात्री ८ ते १० या वेळेत तिळले पेंटर व संच यांच्या संगीतमय कार्यक्रमाने भक्तिमय वातावरणात रंग भरला. भजन, अभंग आणि शिवस्तुतींनी उपस्थितांची मने जिंकली.

दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी श्री अजिंक्य पहुरकर व संच यांच्या वतीने लघुरुद्राभिषेक प्रशांत मिरासे, शैलेश बत्रा व भुपेंद्र लोहिया यांच्या उपस्थितीत सपत्नीक पार पडला. संत तुकाराम महाराज भजन मंडळ, रामनगर यांनी गोपाळकाला साजरा केला. दुपारी १ ते ४ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.उत्सवाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष शामराव आनपान, सचिव सुधाकर कापसे, सहसचिव सुरेश कापसे यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य व वीरशैव लिंगायत समाजाने मोलाचे योगदान दिले. दोन दिवस चाललेल्या या उत्सवामुळे रामनगर परिसरात अध्यात्मिक उर्जा आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. हर हर महादेवच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

## भरधाव वाहन उलटले, आठ जनावरे दगावली

### मोर्शी-चांदूर बाजार मार्गावरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी–चांदूर बाजार रस्त्यावर गुरांची बेकायदेशीर व क्रूर वाहतूक सुरू असल्याचा गंभीर प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. भरधाव वेगात जाणारी बोलेरो गाडी उलटून झालेल्या अपघातात आठ गुरांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन गुरांचे प्राण वाचविण्यात पोलिसांना यश आले. चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोर्शी–चांदूर बाजार रस्त्यावर गोविंदप्रभू मंदिराजवळ भरधाव वेगात जाणारी बोलेरो पिकअप गाडी उलटून भीषण अपघात झाला. या गाडीत क्रूरपणे कोंबलेली एकूण अकरा गुरे होती. त्यापैकी आठ गुरांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन गुरांना जीवदान मिळाले. ही घटना २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजता घडली. या प्रकरणी चांदूर बाजार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक मधुकर भास्कर यांच्या तक्रारीवरून अज्ञात बोलेरो चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला आहे.

## दोन वेगवेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील वरुड व तळेगाव दशासर पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या दोन वेगवेगळ्या रस्ते अपघातांत दोन तरुणांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वरुड तालुक्यातील आलोडा येथील शुभम राजेंद्र लोखंडे (वय २४) हे आपल्या दुचाकी (क्रमांक एमएच २७/बी ०५७०) ने जात असताना त्यांच्या मोटारसायकलीची बैलगाडीला धडक बसली. या अपघातात शुभम लोखंडे गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ही घटना १२ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी तक्रारीवरून वरुड पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. दुसरी घटना तळेगाव दशासर पोलीस ठाणे हद्दीत घडली. चांदूर रेल्वे येथील संतोष गोडांवणे हे आपल्या दुचाकीने (क्रमांक एमएच २७/एएक्स ७५७१) सुलतानपूर ते बोरी मार्गावरून जात होते. दरम्यान, ट्रॅक्टर (क्रमांक एमएच २७/डीयू ४९१८) चालकाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात संतोष गोडांवणे यांचा मृत्यू झाला. अनिल केवट यांच्या तक्रारीवरून तळेगाव दशासर पोलिसांनी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस करीत आहेत.

## झऱ्यामोह महादेव देवस्थानास 'क' वर्ग तिर्थक्षेत्र दर्जाकडे वाटचाल

### -खा.अमर काळे यांच्या पाठपुराव्याला यश; प्रस्तावाच्या कार्यवाहीला सुरुवात

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील चानकी चारमंडळ येथील प्रसिद्ध श्री क्षेत्र झऱ्यामोह महादेव देवस्थानास 'क' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्याच्या प्रस्तावाची प्रशासकीय कार्यवाही सुरू झाली आहे. स्थानिक ग्रामस्थ व भाविकांच्या मागणीची दखल घेत खा. अमर काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पत्रव्यवहार केल्याने या प्रक्रियेला गती मिळाली आहे.

झऱ्यामोह महादेव देवस्थान हे परिसरातील प्रमुख श्रद्धास्थान असून महाशिवरात्रीच्या दिवशी येथे मोठी यात्रा भरते. वर्षभर विविध भागांतून भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. मात्र 'क' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा नसल्याने शासनाकडून



विकासनिधी मिळत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. परिणामी रस्ते, पाणी, स्वच्छता व इतर मूलभूत सुविधांच्या विकासात अडथळे येत होते.

ग्रामस्थांनी निवेदन देऊन ही बाब खासदार काळे यांच्या निदर्शनास आणून दिली. स्थानिक ग्रामपंचायतीनेही यासंदर्भात ठराव मंजूर करून प्रस्ताव पाठविला. त्यानंतर २६ जानेवारी २०२६ रोजी खासदारांनी जिल्हा परिषद वर्धा येथील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र पाठवून 'क' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा मंजूर करण्याची मागणी केली.दरम्यान, जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधित पत्राची दखल घेत पंचायत समिती सेलू, पोलीस अधीक्षक वर्धा तसेच वनपरीक्षेत्र अधिकारी यांना आवश्यक माहिती तात्काळ सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रस्तावासंदर्भातील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता सुरू असल्याचे समजते.

दर्जा मंजूर झाल्यानंतर देवस्थान परिसराच्या विकासासाठी निधी उपलब्ध होणार असून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या कार्यवाहीमुळे चानकी चारमंडळ परिसरात समाधानाचे वातावरण आहे.


## मालमत्ता फेरफारबाबत जाहिरनामा

याद्वारे सुचित करण्यांत येते की, खालील मालमत्ता धारकांनी ग्राम पंचायत, निमगांव (सबाने) येथे फेरफार करण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. तसेच काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी जाहिरनामा प्रसिध्दीच्या दिनांकापासुन ७ दिवसाच्या आत आपल्या हरकती लेखी स्वरूपात ग्राम पंचायत, निमगांव (सबाने), ता.जि. वर्धा यांच्याकडे सादर कराव्यात. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेप अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

| अ.क्रं. | घर क्रं. | एकुण आराजी | वार्डाचे नांव | रेकॉर्डला दाखल करावयाचे नांव | रेकॉर्डवरून खारीज करावयाचे नांव | सादर केलेले दस्ताऐवज | मालमत्तेचे प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १२६ | ८५८ चौ.फुट | वार्ड क्रं. १ | ज्ञानेश्वर चंपतराव मसराम | मैनाबाई शंकर कुंभरे | शपथपत्र, असेसमेंट कॉपी | दगड विटा मातीचे व खाली जागा |

**प्रशासक**
**ग्रा.पं. निमगांव (सबाने)**

**ग्राम पंचायत अधिकारी**
**ग्रापं निमगांव, ता. जि. वर्धा,**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार १) श्री. दिलीप गजानन गुंडमवार, २) सौ. नंदा अशोकराव भुलकळवार, ३) सौ. छाया विजयरो मोरस्कार हे मौजा हिंगणघाट, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथील मालमत्तेचे मालक व ताबेदार आहेत. सदर मालमत्ता नगर परिषद हिंगणघाट हद्दीत, संत कबीर वॉर्ड क्र. ४८, झोन क्र. ३, नगर भूमापन क्र. १४२, घर क्र. ६९४, शीट क्र. ४७, ब्लॉक क्र. ७, क्षेत्रफळ ५५.७४ चौ. मी. (६०० . ०० चौ. फूट) असून त्यावर बांधकाम केलेले घर आहे.

सदर मालमत्तेच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

पूर्वस : रस्ता, पश्चिमेस :- सेंट्रल रेल्वेची मोकळी जागा,उत्तरेस : - ४ फूट जागा व श्री. देशपांडे यांचे घर

दक्षिणेस : - श्री. विजय गट्टेवार यांचे घर , श्री. सुरेश नाथुजी दाबेगवार यांनी नगर भूमापन क्र. १४२, क्षेत्रफळ ५५.७४ चौ. मी. ही मालमत्ता दिनांक ३०/०४/१९८५ रोजी दस्त क्र. ६२४/१९८५ अन्वये श्री. गजानन नानाजी गुंडमवार यांना विक्रीखताद्वारे विकलेली आहे. त्यानंतर श्री. गजानन नानाजी गुंडमवार यांचे दिनांक ०६/०४/२००७ रोजी निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कायदेशीर वारसांमध्ये १) श्री. दिलीप गजानन गुंडमवार, २) सौ. नंदा अशोकराव भुलकळवार, ३) सौ. छाया विजयरो मोरस्कार यांनी फेरफार नोंद क्र. ४७९ अन्वये सदर मालमत्तेवर आपली नावे नोंदवून घेतली आहेत. सध्या माझ्या पक्षकारांनी श्री. अक्षय राजुसिंग गौर यांच्याशी सदर मालमत्तेबाबत खरेदी-विक्री करार केलेला आहे. मात्र माझ्या पक्षकारांचे मूळ विक्रीखत दिनांक ३०/०४/१९८५ दस्त क्र. ६२४/१९८५ हरवलेले आहे. तसेच श्री. अक्षय राजुसिंग गौर यांनी Home First Finance Company India Ltd येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

म्हणून सर्व संबंधितांना जाहीर कळविण्यात येते की वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा सदर हरवलेले मूळ विक्रीखत कोणास मिळाल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येईल.

**ॲड. आर. आर. तिवारी,**
**रामनगर, वर्धा**
**मो. नं. ९८२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझी पक्षकार श्रीमती मनीषा प्रवीण अडसड, रा. मौजा तळेगाव, ता. धामणगाव व जि. अमरावती यांची गावठाण मालमत्ता ग्रामपंचायत तळेगाव हद्दीत, वॉर्ड क्र. १, शीट क्र. ३, मालमत्ता क्र. २७८२ भूमापन क्र. ७१३, क्षेत्रफळ १५३.०० चौ.मी. असून त्यावर सुमारे २७० चौ.फुट बांधकाम असलेले घर आहे. सदर मालमत्तेच्या हद्दी पुढीलप्रमाणे आहेत:

पूर्व : श्री. बंकर यांचे घर,
पश्चिम : श्री. वाकेकर यांचे घर,
उत्तर : रस्ता,
दक्षिण : श्री. वाकेकर यांचे घर,

श्री. वामनराव नामदेवराव वडकर यांनी मालमत्ता क्र. २७८२, भूमापन क्र. ७१३ पैकी क्षेत्रफळ ४५. ५० चौ.मी. जागेचा विक्रीखत दिनांक १०/०३/२००७ रोजी दस्त क्र. ३३२/२००७ अन्वये श्रीमती मनीषा प्रवीण आडसड यांच्या नावे केलेला आहे.

तसेच श्री. वामनराव नामदेवराव वडकर यांनी त्याच मालमत्तेतील क्षेत्रफळ १०७.५०चौ.मी. जागेचा विक्रीखत दिनांक २६/०३/२०२५ रोजी दस्त क्र. ७८५/२०२५ अन्वये श्रीमती मनीषा प्रवीण अडसड यांच्या नावे केलेला आहे.

माझ्या अशिलाकडून यांचे मूळ विक्रीखत दिनांक २३/०४/१९९७ दस्त क्र. ५४१/१९९७ हरवलेले आहे. तसेच माझ्या क्लायंट यांनी आधार हाऊसिंग फायनान्स लि. येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे. म्हणून सर्व संबंधितांना कळविण्यात येते की वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा वरील मूळ विक्रीखत कोणास सापडल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड. आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा**
**मो. नं. ९८२२४२५१६८**

■ रविवार २२ फेब्रुवारी २०२६

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

paper www.janmadhyam.com

# देशात 70 हजार कोटींचा 'बिर्याणी घोटाळा'

## ■ सरकारला मोठा आर्थिक फटका ■ एआयमुळे काळाबाजार उघडकीस

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातील हजारो कोटींच्या अनेक घोटाळ्यांनी आतापर्यंत मोठा हाहाकार उडवल्याचे दिसून आले आहे. तसेच दुसरीकडे टॅक्स चोरीच्या घटनाही दिवसेंदिवस वाढत चालल्याचे वास्तव आहे. अशातच आता हाटेल क्षेत्रातील एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बिर्याणी ऑर्डरच्या काळाबाजारात ७० हजार कोटींचा मोठा आर्थिक फटका सरकारला बसला आहे.देशातील तब्बल ७० हजार कोटींच्या टॅक्स चोरीच्या प्रकरणाने मोठी खळबळ उडाली आहे. या महाघोटाळ्याची सुरुवात हैदराबाद शहरात नोव्हेंबर २०२५ मध्ये झाली. आयकर विभागाने केलेल्या छापेमारीच्या कारवाईतून ३ लोकप्रिय बिर्याणी चेनवर तब्बल ३० ठिकाणी मोठी कारवाई केली होती. त्यात हाटेलच्या मुख्य कार्यालयांसह संबंधित वरिष्ठ व्यवस्थापनाच्या घरांचाही समावेश असल्याचे समोर आले होते.या घोटाळ्यात अनेक रेस्टारंट्स कर चुकवण्यासाठी त्यांचे उत्पन्न कमी दाखवत असल्याचे समोर आले. आयकर विभागाच्या अधिका-यांना असे आढळले की, २०१९-२० या आर्थिक वर्षापासून या रेस्टारंट्सनी किमान ७०,००० कोटी रुपयांची विक्री लपवली आहे.

अधिकारी एका बिलिंग साफ्टवेअर प्लॅटफार्मवर लक्ष ठेवून होते. या स?फ्टवेअर प्लॅटफार्मचा रेस्टारंट बिलिंग साफ्टवेअर मार्केटमध्ये सुमारे १० टक्के वाटा आहे. याचदरम्यान हा घोटाळा समोर आला. तपासासाठी बिग डेटा ॲनालिटिक्स आणि जनरेटिव्ह एआयसह विविध एआय साधनांचा वापर करण्यात आला. याद्वारे सुमारे १.७७ लाख रेस्टारंट आयडीमधील डेटा आणि ६० टेराबाईट व्यवहारांच्या डेटाचे विश्लेषण करण्यात आले. संपूर्ण देशात एकूण ७०,००० कोटी रुपयांपैकी १३,३१७ कोटी रुपयांचे बिलिंगमधील व्यवहार डिलिट केल्याचे साफ्टवेअर प्रोव्हायडरच्या नोंदीवरून दिसून आले. एकट्या आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये ५,१४१ कोटी रुपयांची विक्री लपवण्यात आली.अधिका-यांच्या म्हणण्यानुसार, कर्मचारी स्तरावर होणारी फेरफार रोखण्यासाठी रेस्टारंट्स रोख (कॅश), कार्ड आणि यूपीआयद्वारे होणारे सर्व व्यवहार बिलिंग साफ्टवेअरमध्ये नोंदवतात. मात्र, स्वतः मालकच या यंत्रणेचा गैरवापर करत असल्याचे अधिका-यांनी स्पष्ट केले. मिळालेल्या कागदपत्रांनुसार, कॅश इन्व्हाईस (रोख पावती) निवडकपणे डिलिट करण्यात आल्याचे यात समोर आले. या प्रक्रियेत




रोख नोंदींचा फक्त काही भाग ठेवायचे आणि उर्वरित नोंदी डिलिट करायचे, जेणेकरून आयकर आणि जीएसटी कमी भरावा लागेल.काही प्रकरणांत ठराविक तारखांचे किंवा अगदी संपूर्ण महिन्याची सर्व बिले डिलिट करण्यात आल्याचेही या तपासातून समोर आले आहे. बिले डिलिट करून अत्यंत कमी उत्पन्न दाखवून टॅक्स रिटर्न भरले जायचे.

**महाराष्ट्रासह अन्य ५ राज्यांचा समावेश-**तामिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा, महाराष्ट्र आणि गुजरात ही कर चोरी करताना आढळलेली पाच राज्ये आहेत. कर्नाटकात सर्वाधिक म्हणजे सुमारे २,००० कोटी रुपयांचे व्यवहार डिलिट केल्याची नोंद झाली आहे. त्यापाठोपाठ तेलंगणामध्ये १,५०० कोटी रुपये आणि तामिळनाडूमध्ये १,२०० कोटी रुपयांचे व्यवहार डिलिट करण्यात आले आहेत. काही रेस्टारंट्सनी तर आयटी रिटर्नमध्ये विक्री कमी दाखवूनही साफ्टवेअरमधील रेकार्ड डिलिट केले नव्हते, असे अधिका-यांनी स्पष्ट केले आहे. एकूण विक्रीच्या जवळपास २७ टक्के विक्री लपवण्यात आल्याचा आतापर्यंत अंदाज आहे.

# बारावीचे दोन पेपर फुटले!

## परीक्षेच्या तासाभरापूर्वीच प्रश्नपत्रिका व्हाट्सॲपवर व्हायरल



**नागपूर/प्रतिनिधी :** बारावी परीक्षेचे दोन पेपर फुटले असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे, याप्रकरणी नागपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. व्हाट्सॲप ग्रुप तयार करून हा सगळा पेपर फोडण्याचा प्रकार सुरू होता अशी माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी नागपूरच्या सदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका विद्यार्थिनीचा स्मार्टफोन जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात आणखी कोण सहभागी आहे? याचा पोलिस कसून तपास करीत आहेत. एका खासगी शिकवणी वर्गातील शिक्षकाने पैसे घेउन पेपर फोडल्याची माहिती समोर आली आहे.

सदर परिसरातील सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर हे प्रकरण उघडकीस आले आहे. बारावीच्या विज्ञान शाखेचे फिजिक्स आणि केमिस्ट्रीचे पेपर परीक्षेच्या तासाभरापूर्वीच व्हाट्सॲपवर आल्याची माहिती समोर येत आहे. गुरुवारी बारावीचा केमिस्ट्रीचा पेपर होता मात्र परीक्षेआधी पेपर विद्यार्थ्यांच्या व्हाट्सॲप ग्रुपवर आला होता.सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर एक विद्यार्थिनी वारंवार प्रसाधनगृहात जात होती त्यामुळे केंद्रावरील पर्यवेक्षकाला तिचा संशय आला. त्यांनी तिची शिक्षिकेच्या माध्यमातून झाडाझडती घेतली. तिच्याकडील एक स्मार्टफोन जप्त करण्यात आला आहे. या मोबाईलमध्ये एका व्हाट्सॲप ग्रुपवर परीक्षा सुरू होण्यापूर्वी पेपर आलेला होता, असे पोलिसांनी सांगितले. केंद्रप्रमुखांनी सदर पोलिसांना माहिती दिल्यावर पोलिसांनी तपास करून गुन्हा दाखल केला आहे.

**खासगी शिकवणी वर्गाचे कनेक्शन-** जप्त करण्यात आलेल्या मोबाईलमध्ये १५ विद्यार्थ्यांचा एक ग्रुप तयार करण्यात आल्याचे आढळले. या ग्रुपमधील दोन विद्यार्थिनींची चौकशी पोलिस करीत आहेत. एका खासगी शिकवणी वर्गातील शिक्षकाने पैसे घेउन पेपर फोडल्याची माहिती समोर आली आहे. या ग्रुपमधील अन्य १३ विद्यार्थी शहरातील वेगवेगळ्या केंद्रांवर परीक्षा देत होते. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचे हात गुंतले आहेत का, हे लवकरच समजेल.

# राज्यात अवकाळीचे संकट!

**मुंबई / प्रतिनिधी-** राज्यातील वातावरणात कमालीचा बदल झाला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये उकाडा वाढला असून उन्हाचे चटके लागू लागले आहेत. राज्यातील तापमानात चढ-उतार पाहायला मिळत आहे. अशातच भारतीय हवामान विभागाने अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांना सोमवारी अहिल्यानगर, सांगली, सोलापूर, बीड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांत ढगाळ वातावरणासह काही ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह हलक्या स्वरूपाचा पाउस पडू शकतो. तर मंगळवारी सोलापूर, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात ढगाळ वातावरणासह काही ठिकाणी ढगांच्या



अवकाळी पाउस झोडपून काढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही दिवस सर्वांसाठी महत्त्वाचे राहणार आहेत. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात सोमवारी आणि मंगळवारी ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. ११ जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, राज्यातील काही भागात सोमवारी आणि मंगळवारी ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांमध्ये ढगांच्या गडगडाटासह पाउस पडण्याची शक्यता आहे. गडगडाटासह हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे.

**पिकांवर संकट; बळिराजा चिंतेत-** चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाचा अंदाज आहे. या अवकाळी पावसाच्या अंदाजामुळे बळिराजा चिंतेत आहे. या अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. दरम्यान, शुक्रवारी नाशिक, नंदुरबार या जिल्ह्यांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक जोरदार पाउस झाला. त्यामुळे कांदा, गव्हासह अन्य पिकांना फटका बसण्याची भीती शेतक-यांनी वर्तवली आहे.

## अर्थसंकल्पीय अधिवेशन विरोधी पक्षनेत्यांविना

# इतिहासात पहिल्यांदाच दोन्ही सभागृहांत विरोधी पक्षनेता नाही

**मुंबई/प्रतिनिधी-**विधानसभेपाठोपाठ विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेपद रिक्त असल्याने आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उभय सभागृहांचे कामकाज विरोधी पक्षनेत्याविना पार पडेल, अशी एकूण चिन्हे आहेत. राज्याच्या इतिहासात दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्षनेतेपद रिक्त असण्याचा प्रकार पहिल्यांदात घडत आहे.२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर १५ वी विधानसभा गठित झाली. नव्या विधानसभेचे पहिले अधिवेशन डिसेंबर २०२४ मध्ये पार पडले. सर्वसाधारणपणे पहिल्या अधिवेशनात विरोधी पक्षनेत्याची निवड होते. मात्र विरोधी बाकावरील सर्वांत मोठ्या पक्षाच्या सदस्यांची संख्या ही एकूण विधानसभा सदस्य संख्येच्या १० टक्के इतकी नसल्याचे कारण देत विधानसभा अध्यक्षांकडून विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय प्रलंबित ठेवण्यात आला आहे.

ठाकरे गटाचे माजी आमदार अंबादास दानवे यांची विधान परिषदेची मुदत संपल्यानंतर विधानसभेप्रमाणे विधान परिषदेतही हेच चित्र निर्माण झाले. नागपूर अधिवेशनात विरोधी पक्षनेत्याचा मुद्दा चर्चेत आला तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय हा विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद सभापतींच्या अखत्यारीतील




असल्याचे सांगितले होते. त्यांनी घेतलेला निर्णय सरकारला मान्य असेल. विरोधी पक्षनेतेपदाबाबत सरकारचा कोणताही दुराग्रह नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले होते. तर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षनेतेपदाबाबत नियमांचा अभ्यास सुरू असल्याचे स्पष्ट केले होते. विधानसभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे २० आमदार आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून विधानसभा विरोधी पक्षनेतेपदासाठी ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांच्या नावाची शिफारस करणारे पत्र ४ मार्च २०२५ रोजी देण्यात आले. या पत्राला पुढील महिन्यात एक वर्ष पूर्ण होईल.ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांची विधान परिषद सदस्यत्वाची मुदत गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये संपली. त्यामुळे काँग्रेसने विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना डिसेंबर २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षनेतेपदासाठी सतेज पाटील यांच्या निवडीचे पत्र दिले होते. विरोधी पक्षाच्या या दोन्ही पत्रांवर अजून कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे गेल्या डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनाप्रमाणे येत्या सोमवारपासून (२३ फेब्रुवारी) सुरू होणारे अर्थसंकल्पीय अधिवेशनसुद्धा विरोधी पक्षनेत्याविना पार पडणार आहे. काँग्रेसच्या प्रज्ञा सातव यांनी भाजपमध्ये प्रवेश करताना आमदारकीचा राजीनामा दिला. परिणामी काँग्रेस आमदारांचे संख्याबळ सहा झाले. त्यातच राजेश राठोड यांची मुदत पुढील महिन्यात संपुष्टात येत आहे. यामुळे काँग्रेसचे संख्याबळ आणखी कमी होईल.

# शिक्षकांनीच पुरवल्या विद्यार्थ्यांना कॉप्या!

## बोर्डाकडून चौकशी व कारवाईचे निर्देश जारी

**पुणे /प्रतिनिधी-** दहावी-बारावीची परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा टर्निंग पाईंट. पण पुण्यातील धायरीत शिक्षकांनीच विद्यार्थ्यांना कॉप्या पुरवून शिक्षण व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली आहेत.



शाळेचा निकाल १०० टक्के लागावा म्हणून धायरीत कॉपीबहाद्दर शिक्षकांनी हा धक्कादायक प्रकार केल्याचे समोर आले आहे. आठवडाभरापूर्वी छत्रपती संभाजीनगरमध्येही शिक्षकांनीच विद्यार्थ्यांना कॉपी पुरवल्याचा प्रकार घडला होता. मात्र यावेळी परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकांनाच चिरीमिरी देत चहापानाला पाठवून शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी कॉपीचे पान मांडून ठेवले आहे. त्यामुळे याप्रकरणात शिक्षकावर कारवाई करण्याचे निर्देश बोर्डाच्या विभागीय अध्यक्षांनी दिले आहेत. गेल्या काही वर्षांपासून परीक्षा कॉपीमुक्त व्हावी म्हणून विभागीय आणि राज्य मंडळ प्रयत्नशील आहे. कॉपी होउ नये म्हणून सीसीटीव्ही लावलेले असले तरीही परीक्षार्थी, शाळेच्या केंद्रावरील केंद्रप्रमुख आणि शिक्षकांनाच धाक उरलेला नसल्याचे दिसत आहे. आता तर विद्यार्थी नव्हे तर शिक्षकच कॉपीबहाद्दर बनत चालले आहेत.

# एसटी कर्मचा-यांना दिलासा

## वेतनवाढीचे थकित हप्त्यांसाठी 100 कोटी रुपयांची तरतूद

**मुंबई :** एसटीच्या सुमारे ८६ हजार कर्मचा-यांचे वेतनवाढीचे थकित हप्ते देण्यासाठी शासनाने तातडीने १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे, लवकरच फेब्रुवारी महिन्याच्या वेतनासोबत देण्यात येणारा वेतनवाढीचा थकित हप्ता कर्मचा-यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशी माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. तसेच या अनुषंगाने येत्या २४ फेब्रुवारीला काही कामगार संघटनांनी पुकारलेले आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी कर्मचा-यांना वेतनवाढीचा थकित हप्ता देण्यासाठी एसटी महामंडळाकडे पैसे




नसल्यामुळे शासनाने ती जबाबदारी उचलावी. अशी चर्चा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी केली होती. त्यानुसार त्यांच्या अनुमतीने दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये शासनाने अनुदान स्वरूपात एसटीला द्यावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कामगार संघटनांच्या सोबत घेतलेल्या बैठकीमध्ये दिले होते. सदर थकित हप्ते डिसेंबर महिन्याच्या वेतनासोबत देण्यास सुरुवात झाली. तथापि काही तांत्रिक अडचणींमुळे फेब्रुवारी महिन्याच्या वेतनासोबत सदर हप्ता देण्यासाठी एसटी महामंडळाकडे निधी उपलब्ध नव्हता. त्यामुळे थकित हप्ता न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याची भावना एसटी कर्मचा-यांमध्ये निर्माण होउन त्यांच्यात नाराजी पसरली. अशा परिस्थितीत काही कामगार संघटनांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता.सदर गंभीर परिस्थिती ओळखून परिवहनमंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच मुख्यमंत्री याच्याशी चर्चा करून या थकित हप्त्यापोटी २१० कोटी रुपये तातडीने सरकारने एसटीला द्यावेत, अशी विनंती केली. त्याचा सातत्याने पाठपुरावा देखील केला. त्यामुळे त्या २१० कोटी रुपयांपैकी १०० कोटी रुपये शासनाने दिले आहेत. तसेच उर्वरित निधीदेखील लवकरच प्राप्त होईल. त्यामुळे कर्मचा-यांच्या थकित वेतनाचे हप्ते कोणत्याही परिस्थितीमध्ये देण्यात येतील असे आश्वासन त्यांनी शासनाच्या वतीने दिले आहे. तसेच सध्या दहावी आणि बारावीच्या मुलांच्या परीक्षा सुरू असल्यामुळे त्यांच्या प्रवासात कोणते अडथळा निर्माण होउ नये यासाठी काही संघटनांनी पुकारलेले आंदोलन तातडीने स्थगित करावे, असे देखील आवाहन त्यांनी यावेळी केले.

# भुसेंकडून अब्रुनुकसानीचा दावा मागे

## संजय राउत यांच्या दिलगिरीनंतर कोर्टात समझोता

**मालेगाव/ प्रतिनिधी-**खासदार संजय राउत यांनी न्यायालयात आणि माध्यमांसमोर स्पष्ट शब्दांत दिलगिरी व्यक्त केली. चुकीच्या माहितीच्या आधारे आपण मंत्री दादा भुसे यांच्यावर आरोप केल्याचे त्यांनी मान्य केले. विषय आता संपला आहे, असेही त्यांनी सांगितले. आपल्याला मिळालेली माहिती चुकीची होती आणि त्यातून गैरसमज निर्माण झाला, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मालेगावच्या शेतक-यांची माफी मागत संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान मालेगाव येथील न्यायालयात घडलेल्या घडामोडींनी राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना सुरुवात झाली. मंत्री दादा भुसे यांनी दाखल केलेल्या अब्रु नुकसानीच्या खटल्याच्या सुनावणीसाठी खासदार संजय राउत स्वतः उपस्थित राहिले होते.

या प्रसंगी दादा भुसे यांनीही सकारात्मक भूमिका घेतली. राउत यांनी दिलगिरी व्यक्त केल्यानंतर आपण अब्रु नुकसानीचा दावा मागे घेत असल्याचे त्यांनी जाहीर केले. मालेगावच्या शेतक-यांचा आणि नागरिकांचा संभ्रम, तसेच त्यांच्या भावना लक्षात घेता हा विषय वाढवण्यापेक्षा संपवणे योग्य असल्याचे



त्यांनी सांगितले. हा विषय आता संपला आहे, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी नमूद केले.

वादाची पार्श्वभूमी १७८ कोटी रुपयांच्या कथित शेअर्स घोटाळ्याशी संबंधित होती. संजय राउत यांनी सामाजिक माध्यमांवर हा आरोप केला होता. दादा भुसे यांनी तो आरोप पूर्णपणे खोटा असल्याचे सांगत आधीच स्पष्टीकरण दिल्याचे नमूद केले. संबंधित सर्व पैसे आर्मस्ट्राँग कंपनीकडे ट्रान्सफर झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. तरीही आरोप मागे घेतले गेले नाहीत, म्हणूनच मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. यावेळी दादा भुसे यांनी सांगितले की, काही व्यक्तींनी चुकीची माहिती पसरवून हा वाद निर्माण केला. ज्यांच्याकडून माहिती आली तेही आता दुस-या पक्षात गेले असल्याचे सूचक विधान करण्यात आले. अद्वय हिरे यांनी चुकीची माहिती दिल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. मात्र राउत यांनी स्वतः आरोप मागे घेतल्याने आणि खोटेपणा मान्य केल्याने पुढील कारवाईची गरज उरली नसल्याचे भुसे यांनी स्पष्ट केले.

संजय राउत यांनीही दादा भुसे आणि माझे चांगले संबंध आहेत. ही महाराष्ट्राची संस्कृती आहे, असे म्हणत विषयाला मैत्रीपूर्ण शेवट दिला. राजकीय भूमिका वेगळी असली तरी वैयक्तिक पातळीवर संवाद आणि समज कायम असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. वाद वाढवण्यापेक्षा संपवणे योग्य असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. एकंदरीत, न्यायालयात सुरू झालेला हा वाद अखेर समझोत्याने मिटला.

# रणवीर सिंहकडे 10 कोटींच्या खंडणीची मागणी

**मुंबई :**बालिवूडचा लोकप्रिय अभिनेता रणवीर सिंहकडे बिश्नोई गँगने १० कोटी रुपयांची मागणी केली आहे. बिश्नोई गँगने अभिनेत्याला ज्या नंबरवरून धमकीची व्हाईस नोट पाठवली होती, तो मेसेज एका अमेरिकन नंबरवरून आला होता. मुंबई पोलिसांच्या वरिष्ठ अधिका-यांनी सांगितले की, क्राईम ब्रँच प्रोटोकालनुसार त्या नंबरची माहिती मिळवण्यासाठी अमेरिकेतील संबंधित यंत्रणेशी संपर्क साधत आहे. मुंबई क्राईम ब्रँचच्या तपासात समोर आले आहे की, सध्या बिश्नोई गँगचा खास हस्तक असलेल्या हॅरी बाक्सरने व्हाईस नोट पाठवून रणवीर सिंहला धमकी दिली आणि १० कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. क्राईम ब्रँचच्या प्राथमिक तपासात रणवीर सिंहच्या मॅनेजरच्या व्हाटस्ॲपवर आलेल्या व्हाईस नोटमधील आवाज हॅरी बाक्सरचाच असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हॅरी बाक्सरने ही व्हाईस नोट दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घरावर झालेल्या गोळीबारानंतर पाठवली होती. रणवीर सिंहला मिळालेली ही धमकी त्याच्या मॅनेजरच्या मोबाईल नंबरवर व्हाईस नोटद्वारे पाठवण्यात आली होती. या धमकीनंतर रणवीर सिंहच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून बिश्नोई गँग बॉलिवूडला टार्गेट करत आहे. रणवीर सिंहच्या आधी बिश्नोई गँगने सलमान खान, कपिल शर्मा, पवन सिंग आणि रोहित शेट्टी यांसारख्या सेलिब्रिटींवर निशाणा साधला होता. त्यानंतर या सर्व सेलिब्रिटींच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

# एसीपी कार्यालयात शिरला कोब्रा

**कल्याण/ प्रतिनिधी-**कल्याणमध्ये काल दुपारी धक्कादायक प्रकार घडला. कल्याण एसीपी कार्यालय येथे साडेपाच फुटांचा अतिविषारी इंडियन कोब्रा शिरल्याने एकच खळबळ उडाली. कार्यालयात काम करणा-या महिला पोलिस कर्मचा-यांनी भीतीपोटी तब्बल अर्धा तास स्वतःला खोलीत कोंडून घेतले. सर्पमित्रांनी घटनास्थळी धाव घेत नागाला पकडल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. कल्याण पश्चिमेतील आंबेडकर रोड परिसरात असलेल्या एसीपी कार्यालयात काल दुपारच्या सुमारास अचानक साडेपाच फुटांचा इंडियन कोब्रा शिरल्याने कार्यालयात



घबराटीचे वातावरण निर्माण झाले. नकळत कार्यालयात घुसलेल्या या अतिविषारी नागामुळे कर्मचारी घाबरले. घटनेची माहिती मिळताच सर्पमित्रांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून अत्यंत दक्षतेने या अतिविषारी नागाचे रेस्क्यू केले. त्यानंतर नागाला वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील प्रक्रिया पूर्ण करून त्याला जंगलात सोडण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# यंदा कडक उन्हात विद्यार्थ्यांना द्यावी लागणार परीक्षा

## ■ परीक्षांबाबत शिक्षण विभागाचा मोठा निर्णय ■ शिक्षक, विद्यार्थी, पालकांमध्ये नाराजी

**मुंबई/प्रतिनिधी :** यंदा विद्यार्थ्यांना कडक उन्हात परीक्षा द्यावी लागणार आहे, कारण शिक्षण विभागाने शालेय परीक्षांबाबत मोठा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षी मार्चमध्ये परीक्षा पूर्ण करून एप्रिलमध्ये शाळा सुरू करण्याचे नियोजन होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना उन्हाचा त्रास झाला नव्हता. पण यंदा एप्रिलमध्ये परीक्षा घेतल्या जाणार असल्याने कडाक्याच्या उन्हात विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार आहे. या निर्णयाला शिक्षक संघटनांनी विरोध केला असून विद्यार्थी आणि पालकांमध्येही नाराजीचे वातावरण आहे. यंदा एप्रिलमध्ये राज्यातील सर्व शाळांमध्ये वार्षिक परीक्षा घेण्याचे नियोजन शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. याचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर व परीक्षेवर परिणाम होण्याची शक्यता शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्तकेली आहे. परीक्षा एप्रिलमध्ये घेतल्यामुळे त्यानंतर शिक्षकांनाही पेपर तपासणे व निकाल तयार करण्यासाठी फार कमी कालावधी मिळणार असल्याने त्यांच्यावर प्रचंड ताण असेल, अशी भीती व्यक्तकरण्यात येत आहे.

सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात शिक्षक संघटना आंदोलनाच्या तयारीत आहेत. गेल्यावर्षी राज्य मंडळाने सीबीएसई मंडळाच्या पद्धतीनुसार आपल्या शाळांच्या परीक्षा मार्चमध्ये घेउन एप्रिलमध्ये शाळा सुरू करून



मेमध्ये विद्यार्थ्यांना सुटी देण्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना शिक्षण विभागाने शाळांना दिल्या होत्या. पण यंदा या सूचनांना केराची टोपली दाखवली आहे. ते रद्द करून संपूर्ण एप्रिलमध्ये परीक्षा घेण्याचे शालेय शिक्षण विभागाने नियोजन केले आहे.

**शिक्षक संघटनांचा विरोध-**भर उन्ह्यात एप्रिलमध्ये परीक्षा घेणार असल्याने उन्हामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शैक्षणिक कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होउ शकतो. त्यामुळे शिक्षण संघटनांनी त्याला विरोध केला आहे. मार्चमध्ये वार्षिक परीक्षा पूर्ण कराव्यात, एप्रिलमध्ये मार्गदर्शन वर्ग घेण्यात यावे, परीक्षा नियोजनाचे अधिकार पूर्वीप्रमाणे मुख्याध्यापकांना द्यावेत, अशी मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे.

## संपादकीय


प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# संशयकल्लोळ

अजितदादांच्या अपघाती निधनाने सामान्य माणूस अजूनही बुचकळ्यात आहे. एखाद्या अनपेक्षित घटनेचा धक्का एवढा मोठा असतो, की घटना घडून गेल्यानंतरही बरेच दिवस ती घटना मनाला स्वीकारता येत नाही. सत्य कळत असते, पण त्यावर विश्वास ठेवायला मन तयार नसते. एका बाजूला अनपेक्षित, अविश्वसनीय घटना आणि त्यानंतर समाज माध्यमांवरून फिरत असलेल्या अजितदादांच्या अनेक चित्रफिती. त्यात भर आमदार रोहित पवार यांच्याकडून व्यक्त होत असलेल्या संशयाची. अपघात हे खरे तर अतार्किकच असतात. त्यामुळे, तर्काने त्यात अनेक प्रश्न उपस्थित होतच असतात. काही सर्वसामान्यांच्या मनात असलेले प्रश्न, काही तज्ज्ञांचे प्रश्न, आपल्याकडे प्रत्येक व्यवस्थेत असलेल्या अव्यवस्था आणि नेमक्या त्याच दिवशी घडलेल्या काही अपवादात्मक त्रुटी या सगळ्यांची गोळाबेरीज रोहित यांच्या प्रश्न आणि संशयात असल्याने त्या अपघाताभोवतीचे गूढ वाढत चालले आहे. रोहित यांच्या आरोपवजा प्रश्नांना सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि प्रवक्ते आनंद परांजपे यांनी उत्तरे दिली. पण, तरीही रोहित यांच्या पत्रकार परिषदा थांबेनात आणि त्यांच्या समर्थनार्थ अजितदादांचे धाकटे चिरंजीव जय पवारही आले, तेव्हां राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी उत्तरे द्यायला सुरुवात केली. रोहित यांच्या नेमक्या प्रश्नांना खरे तर हवाई वाहतूक विभागाशी संबंधित यंत्रणांनी उत्तर द्यायला हवे होते किंवा निदान तज्ज्ञांचे अहवाल येईपर्यंत वाट बघण्याचे आवाहन तरी करायला हवे होते. पण, विमान ज्या खासगी कंपनीचे होते, त्या कंपनीने आपल्या बाजूने अजून तरी कोणतीच वस्तुस्थिती उघड न केल्याने आणि हवाई प्रवासी वाहतूक विभागाशी संबंधित नियंत्रक संस्थांनीही अजून तपासातील प्रगती अधिकृतरीत्या जनतेसमोर न ठेवल्याने रोहित यांच्या प्रश्नांची धार वाढत चालली आहे. सर्वसामान्य माणसालाही त्यामुळे काही प्रश्न पडू लागले आहेत.अजितदादांच्या अपघाती निधनानंतर त्याविषयी पहिली शंका व्यक्त केली, ती पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी. ममता यांचा संशय पसरू नये आणि या दुःखद घटनेला वेगळे वळण लागू नये, तो राजकारणाचा विषय होऊ नये, यासाठी शरद पवार यांनी तातडीने माध्यमांसमोर येऊन खुलासा केला. पण, त्यानंतर ही जबाबदारी खुद्द त्यांचे नातू रोहित यांनीच घेतली! राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते, आमदार अमोल मिटकरी ही या अपघाताबाबत प्रश्न उपस्थित करणारी दुसरी राजकीय व्यक्ती होती. ममतादीदींनी विषय नंतर सोडून दिला. मिटकरीही फार बोलले नाहीत. पण, रोहित या संदर्भातील तांत्रिक व परिस्थितीजन्य माहिती गोळा करू लागले. खासगी गुप्तहेरांमार्फतही काही माहिती गोळा करणार असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. मुंबई आणि दिल्लीत त्यांनी माध्यमांसमोर सादरीकरणही केले आणि त्याला धरून रोज काही ना काही मुद्दे मांडत राहिले. त्यामुळे संशयाचे वादळ मनामनांत घोंघावते आहे. घराघरांत त्याची चर्चा सुरू आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स आगीत जळाल्याचे सांगितले गेल्याने अविश्वासात भर पडली आहे. तथ्य किती किंवा तथ्याच्या शक्यता किती, याचा विचार न करता अशा चर्चांत मग प्रत्येकाच्या डोक्यातील प्रश्नांची भर पडत जाते. सध्या नेमके हेच सुरू आहे. ते सहजपणे दुर्लक्ष करण्यासारखे नाही. रोहित पवार आणि अजितदादांचे कुटुंब तांत्रिकदृष्ट्या वेगवेगळ्या पक्षात आहेत. रोहित आणि अजितदादांच्या पक्षातील 'अन्य' नेत्यांचा राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावरही दादांच्या मृत्यूनंतर वाद झाला होता. त्यामुळे, रोहित यांच्या या आरोपांनाही त्या नेत्यांकडून त्याच पद्धतीने उत्तरे दिली जातील, असे वाटत असतानाच एके दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या पार्थ पवार आणि पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटल्या. त्यांनी या अपघाताची सीबीआय या केंद्रीय यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी केली. अजितदादांनंतर सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री असताना, संपूर्ण पक्ष सत्ताधारी महायुतीत सहभागी असताना आणि फडणवीस यांच्यासोबत एकूण एक पक्षाचे मधुर संबंध असताना अचानक ही मागणी का व्हावी? रोहित यांना रोखण्यासाठी, पक्षांतील खदखद थांबवण्यासाठी, की हितचिंतक मतदारांना दिलासा देण्यासाठी? फडणवीस यांचा दिल्ली दौरा ठरला होताच. त्यामुळे, त्यांनीही या शिष्टमंडळाला 'माझी केंद्रीय गृहमंत्र्यांबरोबर भेट होणार आहे. आपली मागणी मी त्यांच्यापर्यंत नक्की पोहोचवतो' असे आश्वासन दिले. पुढे काय? ते थोड्याच दिवसांत कळेल. राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकले झाल्यापासून या दोन्ही पक्षातले संबंध त्या पक्षांच्या सर्वोच्च नेत्यांतील भावनिक संबंधांवर हेलकावे खात होते. दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाचा विषयही त्याचाच भाग होता. आपल्याबरोबरच्या नेत्यांचे काहीही मत असले, तरी पक्षाच्या अगदी खालच्या थरातील कार्यकर्त्यांच्या आणि मतदाराच्या मनात काय आहे, याची कल्पना अजितदादांना होती. १२ फेब्रुवारीचा मुहूर्त त्यांनी म्हणूनच नक्की केला होता. महानगरपालिकेच्या निवडणुकीतील प्रचारसभांत ते या एकत्रिकरणाबद्दल उपस्थित जनसमुदायाला आश्वासित करत असत. त्याचे अनेक व्हिडीओ सध्या समाजमाध्यमांवर भरपूर फिरताहेत. राजकारण्यांसाठी राजकीय सोय सर्वाधिक महत्त्वाची असते. ते साहजिकही आहे. राष्ट्रवादीचे दोन भाग झाले, ते या सोयीसाठी आणि आता त्या पक्षाचे वरिष्ठ नेते एकत्रिकरणाच्या विचारापासून पक्षाला शक्य तितक्या लांब घेऊन जाऊ पाहताहेत, तेही त्यासाठीच. अपघाताबद्दलचे प्रश्न आणि त्याच्या चौकशीच्या मागण्या या सोयी - गैरसोयीचा भाग होऊ नयेत, एवढीच घराघरांतल्या सर्वसामान्य माणसाची अपेक्षा असेल.

# गटबाजी अन् सत्तेची चढाओढ

**काँग्रेसने चंद्रपुरातील वचपा भिवंडीत काढल्याची चर्चा आहे. नागपूर महापालिकेत स्थायी समिती सभापतिपदी कुणाची वर्णी लागणार, याकडे लक्ष लागले आहे.**



चंद्रपूरच्या महापौरपदाच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या वाट्याला जे आले तेच भिवंडीत भाजपच्या वाट्याला आले. चंद्रपूरमध्ये काँग्रेसची सत्ता येणार, हे अपेक्षित असताना भाजपचा महापौर निवडून आला. शिवसेना उबाठा गटाने महाविकास आघाडीऐवजी भाजपला साथ दिली. मातोश्रीने या बंडखोरीची गंभीर दखल घेतली, असे दाखविले खरे; मात्र पुढे काहीच न झाल्याने भाजप, शिवसेना परंपरागत मैत्रीची वीण अधिक घट्ट होण्याच्या वाटेवर असल्याची चर्चा रंगली. मुंबई मनपात भाजपला 'वॉक ओव्हर' दिला गेल्याने या शंकेला अधिक बळ मिळाले. चंद्रपूर काँग्रेसमधील दगाबाजीची चर्चा गल्ली ते दिल्ली झाली.

चंद्रपुरात ठरलेल्या गणिताला, दिलेल्या शब्दाला मित्रपक्ष जागला नाही. नेत्यांचा बेबनाव, समन्वयाचा अभाव यात काँग्रेसच्या हातून सत्ता गेली. काँग्रेसचे विधानसभेतील गटनेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील संघर्ष मनपा निवडणुकीनंतरच्या घडामोडीत अधिक वाढला. धानोरकर यांनी वडेट्टीवारांवर पुन्हा निशाणा साधला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दखल घेतली; मात्र ते टिपू सुलतान वादात अडकल्याने ही कारवाई मागे पडली, असे दिसते. आता काँग्रेसने चंद्रपूरचा वचपा भिवंडीत काढला अशी चर्चा आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संबंधित सहा भाजप नगरसेवकांवर निलंबन आणि कडक कारवाईचा इशारा दिला आहे.

### नागपुरची तिजोरी कुणाकडे ?

नागपुरात स्थायी समिती कुणाकडे ...र, याचा निर्णय अद्याप होऊ शकलेला नाही. आता २४ फेबुवारीला बैठक होणार आहे. स्थायी समितीचे १६ सदस्य निवडले जातील. यातूनच अध्यक्षपदी कुणाची वर्णी लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपने नागपुरात महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती अध्यक्ष असे महिलाराज राहणार असल्याचे संकेत यापूर्वीच दिले आहेत. परिवहन समिती आणि इतर समित्यांवर कुणाची वर्णी लागणार, याविषयी उत्सुकता आहे. मनपा निवडणुकीचे निकाल लागून महिना उलटला आहे. पदाधिकाऱ्यांच्या निवड प्रक्रियेला विलंब होत असल्याने भाजपमधील गटबाजी उघड झाली आहे.

निष्ठावंत भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते नाराज असल्यानेच १५१ सदस्यांच्या मनपात १०२ सदस्यांचे बहुमत असताना सत्तारूढ भाजपमध्ये एकमत होत नसल्याचे चित्र आहे. स्थायी समिती अध्यक्षपदाच्या निवडीसोबतच मनपातील दहा स्वीकृत सदस्यांच्या निवडीकडे लक्ष लागले आहे. काँग्रेसने पराभूत उमेदवारांना संधी नाही, असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अनेकांचा स्वप्नभंग होणार आहे. दुसरीकडे भाजपकडील यादी मोठी आहे. प्रत्येक १० सदस्यांमागे एक स्वीकृत सदस्य करण्याच्या महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रस्तावाला मुख्यमंत्र्यांनी हिरवा झेंडा दाखवल्याने अनेक इच्छुकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. दिल्ली ते गल्ली भाजपची सत्ता असल्याने अगदी कट्टर विरोधक असला, तरी कुणालाही सत्तेचा मोह टाळता येत नाही हे दिसत आहे. यातूनच भाजपच्या बॅनरवर काँग्रेसचे शहर अध्यक्ष आमदार विकास ठाकरे यांच्या फोटोची चर्चा उपराजधानीत रंगली.

### नवीन नागपुरसाठी ६७६ हेक्टरवर मोजणी पूर्ण

नागपूर विभागाला २०४७ पर्यंत देशात अग्रगण्य औद्योगिक व सेवा केंद्र म्हणून उभारण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच जाहीर केला. विकसित नागपूर २०४७ शाश्वत विकास योजनेअंतर्गत तब्बल ५.२५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले. यातील ६५ ते ७५ टक्के निधी हा खासगी क्षेत्रातून उभारला जाणार आहे. नऊ लाखांहून अधिक रोजगारनिर्मितीची अपेक्षा आहे. नवीन नागपूरसाठी ६६४ पैकी ६०३ हेक्टरसाठी शेतकऱ्यांनी संमतीपत्र दिले. ६७६ हेक्टर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण झाली. नागपूरसाठी ही सुवार्ता म्हणता येईल.

दरम्यान, राज्यात १ जानेवारी ते २८ फेबुवारीपर्यंत कार्यकाळ संपलेल्या आणि प्रशासकीय अडचणींमुळे निवडणुका घेणे शक्य नसलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचांचीच प्रशासक म्हणून नियुक्ती करणे राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. नागपूर खंडपीठाने या प्रकरणावर २४ फेबुवारी रोजी पुढील सुनावणी निश्चित केली आहे.

**राजेंद्र उट्टलवार**

# अणुऊर्जा हाच शाश्वत, स्वच्छ ऊर्जेचा मार्ग!

**भारत २०४७ पर्यंत विकसित आणि कमी कार्बन उत्सर्जन करणारी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना अणुऊर्जा निर्णायक भूमिका बजावू शकते. संसदेत मांडण्यात आलेल्या शांती विधेयकामागेही हीच उद्दिष्टे आहेत. त्याद्वारे सुरक्षेला प्राधान्य देत विकासक, पुरवठादार आणि धोरणात्मक भागीदार यांना गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढवण्याची परवानगी देण्यात आली आहे..**

भारताच्या विकासाची गाथा आता निर्णायक टप्प्याच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचली आहे. वेगाने होणारा आर्थिक विकास, वाढते उत्पन्न आणि डिजिटल व औद्योगिक क्षेत्राचा विस्तार यामुळे विजेच्या मागणीत वाढ होत आहे. जगातील काही मोजक्या देशांमध्ये वीजमागणीत अतिशय वेगाने वाढ नोंदवली गेली आहे. त्याच वेळी भारताने २०७० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा आणि २०४७ पर्यंत विकसित भारताच्या निर्मितीचा निर्धार केला आहे. विकास, विश्वासार्हता आणि शून्य कार्बन उत्सर्जन ही सर्व उद्दिष्टे साध्य करण्यास कठीण असली तरीही ती साध्य करण्यासाठी व्यावहारिक ऊर्जा पर्यायांची गरज आहे.अक्षय ऊर्जा हा भारताच्या स्वच्छ ऊर्जा धोरणाचा पाया आहे. देशातील सौर व पवन ऊर्जा क्षमता लक्षणीयरीत्या वाढल्या आहेत. जसजसा अक्षय ऊर्जाक्षमतेचा विस्तार होत आहे तसे हे विविध ऊर्जास्रोत मिळून आधुनिक अर्थव्यवस्थेच्या गरजा पूर्ण करू शकत नाहीत हे स्पष्ट होत आहे. म्हणूनच अणुऊर्जेचे योगदान मोलाचे ठरणार आहे.

### कमी कार्बन उत्सर्जन

भारतातील विजेची मागणी सातत्याने वाढतेच आहे. डेटा सेंटर्स, मेट्रो सेवा, विजेवरील वाहने आणि उद्योगांसाठी चोवीस तास ऊर्जा आवश्यक आहे. सौर ऊर्जा व पवन ऊर्जा स्वच्छ आणि वाढत्या क्षमतेच्या ऊर्जा आहेत; मात्र त्यांची निर्मितीक्षमता हवामान व दिवसाची वेळ यावर अवलंबून असते. ऊर्जा साठवण क्षमता आधुनिक होत आहे; परंतु सध्याचे व्यवहारदृष्ट्या रास्त पर्याय केवळ काही तासांसाठीच वीज वाहिन्यांना वीज पुरवू शकतात. सलग काही दिवस अक्षय ऊर्जा निर्मिती, हे सगळ्यात कठीण आव्हान आहे; विशेषत: पावसाळ्यातील ढगाळ हवामान किंवा हिवाळ्यातील कमी वाऱ्याचे दिवस. या दिवसांसाठी लागणारी मोठ्या प्रमाणातली ऊर्जा साठवण्याची क्षमता असलेली यंत्रणा अजून तरी उपलब्ध नाही. म्हणूनच वातावरणात कितीही बदल झाले तरी सातत्याने वीजनिर्मिती करू शकणारा आणि स्थिर, कमी कार्बन उत्सर्जन असलेला विजेचा



स्रोत भारतासाठी आवश्यक आहे. सध्या उपलब्ध असलेल्या स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानापेक्षा अणुऊर्जा ही मागणी चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकते.

अणुऊर्जेच्या पर्यावरणीय फायद्यांना बरेचदा कमी लेखले जाते, मात्र तिच्या संपूर्ण निर्मितीचक्राचे मूल्यांकन केले असता, अणुऊर्जा हा विजेचा सर्वांत स्वच्छ स्रोत ठरतो. भारतीय प्रदूषण नियामक मंडळाच्या २०१४ मधील पाचव्या मूल्यांकन अहवालात (कार्यकारी गट ३) असे म्हटले आहे की, अणुऊर्जा प्रकल्पाच्या सामान्य निर्मिती चक्रामुळे होणारे वायू उत्सर्जन प्रति किलो वॅट १२ ग्रॅम कार्बनडाय ऑक्साइड इतके आहे. हे कार्बन उत्सर्जन पवन ऊर्जेच्या निर्मिती चक्रात होणाऱ्या वायू उत्सर्जनाइतके आणि सौर फोटोव्होल्टेक यंत्रणेपेक्षा बरेच कमी आहे.जमिनीची आवश्यकता हेदेखील अणुऊर्जेचे बलस्थान आहे. अणुऊर्जा प्रकल्पांची जमिनीचा परिणामकारक वापर करण्याची क्षमता चांगली आहे. प्रति तास एक मेगा वॅट ऊर्जानिर्मितीसाठी एक चौरस मीटर जागेपैकी काही भागच वापरला जातो; याउलट प्रति तास एक मेगावॅट पवन व सौर ऊर्जानिर्मितीसाठी अनेक चौरस मीटर जागेची आवश्यकता असते. शेती, घरे आणि उद्योग यांच्यासाठी असलेली जमिनीची आवश्यकता लक्षात घेता, अणुऊर्जेचा हा मोठा फायदा आहे.अणुऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणारे टाकाऊ पदार्थांचे प्रमाण हा जितका गंभीर मुद्दा मानला जातो तितका तो गंभीर नाही आहे. ७०० मेगावॅट अणुऊर्जा निर्मिती चक्रामुळे दरवर्षी तयार होणारा कचरा हा काचेसारख्या उच्चस्तरीय पदार्थाचा असतो आणि त्याचे आकारमान शंभर घनमीटरच्या आत असते. सुरक्षित दीर्घकालीन व्यवस्थापन हा या प्रक्रियेतील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे.

७०० मेगावॅट क्षमतेचे अणुऊर्जा निर्मिती प्रकल्प ठरलेल्या वेळेत पूर्ण होतात असा आतापर्यंतचा अनुभव आहे. त्यांचा खर्च कोळशावरच्या नव्या औष्णिक ऊर्जा प्रकल्पाइतकाच किंवा थोडा जास्त असू शकेल. मात्र या खर्चाकडे पाहताना या प्रकल्पांच्या ७० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळाच्या ऊर्जानिर्मिती क्षमतेच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. अणुऊर्जा प्रकल्पांच्या विशाल फिरत्या वीजनिर्मिती उपकरणांमुळे वीज वाहिन्यांना स्थिरता मिळते; ज्यायोगे मागणी किंवा पुरवठ्यात अचानक झालेल्या बदलाचा वीजवाहिन्यांवर परिणाम होत नाही. विविध अक्षय ऊर्जास्रोतांचा वापर जसा वाढेल; तसे सुरक्षित व लवचीक वीज यंत्रणा व्यवस्थापनासाठी अणुऊर्जेचे हे वैशिष्ट्य महत्त्वाचे ठरणार आहे.अणुऊर्जा हा अक्षय ऊर्जेला पर्याय नाही तर पूरक आहे. जरी २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जानिर्मिती झाली; तरी ती एकूण ऊर्जानिर्मिती क्षमतेच्या पाच टक्क्यांपेक्षा कमी असेल. याचाच अर्थ अणुऊर्जेचा वापर अक्षय ऊर्जा वाहिन्यांना स्थैर्य मिळवून देण्यासाठी केला जाईल, त्यांना पर्याय म्हणून नाही. या दोन्ही प्रकारच्या ऊर्जा मिळून भारताची विजेची वाढती मागणी पूर्ण करणारी विश्वासार्ह, कमी कार्बन उत्सर्जन करणारी वीज यंत्रणा निर्माण करता येऊ शकते.

### आण्विक क्रांतीत भारताचे स्थान

अक्षय ऊर्जेच्या वीजवाहिन्यांना अणुऊर्जा स्थिर व कमी कार्बन उत्सर्जन असलेली ऊर्जा पुरवत असल्यामुळे जगभरातील अनेक देश शून्य कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने क्रांतिकारी पर्याय म्हणून या स्रोताकडे पाहात आहेत. सीओपी २८ आणि सीओपी २९मध्ये ही बाब अधोरेखित करण्यात आली. वाढती वीज मागणी, ऊर्जा सुरक्षेची चिंता आणि छोट्या आधुनिक रि?क्टर्सची हमी या दृष्टीने आपल्या हवामान बदलविषयक धोरणाचा एक भाग म्हणून अणुऊर्जेचा वापर करण्याचा निर्धार या परिषदांमध्ये कित्येक विकसित अर्थव्यवस्थांनी पुन्हा व्यक्त केला.भारताचा अणुऊर्जा कार्यक्रम विकसित होत आहे. सुमारे ८.८ गिगावॅट क्षमतेच्या ऊर्जा प्रकल्पाद्वारे एकूण ऊर्जानिर्मितीच्या तीन टक्क्यांपेक्षा कमी ऊर्जा पुरवली जात आहे. दीर्घकालीन ऊर्जा मागणी पूर्ण करण्याची क्षमता विकसित करणे शक्य असल्याचेच यातून सिद्ध होते. आगामी दोन दशकांमध्ये विजेची मागणी दरवर्षी चार ते सहा टक्क्यांनी वाढत राहील असा अंदाज आहे. अणुऊर्जेच्या विस्ताराशिवाय विश्वासार्हता, उत्सर्जन व ऊर्जा सुरक्षितता यांचे संतुलन राखत ही वाढती मागणी पूर्ण करणे आव्हानात्मक ठरेल. या पार्श्वभूमीवर, संसदेने अणुऊर्जा क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी शांती विधेयक अमलात आणले. या विधेयकाद्वारे सुरक्षेला प्राधान्य देत विकासक, पुरवठादार आणि धोरणात्मक भागीदार यांची गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढवण्याची परवानगी देण्यात आली. २०४७ पर्यंत १०० गिगावॅट ऊर्जानिर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अणुऊर्जा प्रणाली क्षमता विस्ताराची सुविधा असलेला आराखडा या विधेयकात आहे.

### वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी व्यवहार्य पर्याय

स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल वास्तव व महत्त्वाकांक्षा या दोन्हींवर आधारित असणे आवश्यक आहे. साठवण क्षमता व तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने अक्षय ऊर्जा क्षमतेचा सतत विकास होत राहणे गरजेचे आहे. मात्र यासाठी अतिरिक्त ऊर्जा पर्यायाची गरज आहे आणि सिद्ध झालेले तंत्रज्ञान व वाढता धोरणात्मक पाठिंबा याआधारे अणुऊर्जा एक विश्वासार्ह पर्याय ठरू शकतो.भारत २०४७ पर्यंत विकसित, कमी कार्बन उत्सर्जन अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना अणुऊर्जा यामध्ये निर्णायक भूमिका बजावू शकते. ऊर्जा रूपांतरणाचा विश्वासार्ह, स्वच्छ आणि स्थिर भाग म्हणून याचा उपयोग केला तर दीर्घकालीन विकास व हवामानबदल उद्दिष्टपूर्ती या हेतूने लवचीक ऊर्जा प्रणाली तयार करण्यात अणुऊर्जेची मदत होईल.

**अजय तळेगांवकर**




# युथ काँग्रेसचे लाजीरवाणे विरोध प्रदर्शन?

जेव्हा संपूर्ण जग भारताला नवी दिल्लीतील 'भारत मंडपम'मध्ये आयोजित 'इंडिया AI इम्पॅक्ट समिट २०२६' चे यजमानपद भूषवताना पाहत होते आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताच्या वाढत्या जागतिक नेतृत्वाचे साक्षीदार होत होते, नेमक्या त्याच वेळी यूथ काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अर्धनग्न प्रदर्शन करून देशाच्या प्रतिष्ठेला काळिमा फासण्याचे कृत्य केले. सुमारे ८ ते १० कार्यकर्त्यांनी ऑनलाइन नोंदणी करून आणि क्यूआर कोडच्या माध्यमातून भारत मंडपममध्ये प्रवेश मिळवून अर्धनग्न अवस्थेत गोंधळ घालण्यास सुरुवात केली. जागतिक स्तरावर भारताचा सन्मान वाढत असताना काँग्रेसने आयोजनात व्यत्यय आणण्याचा हा जो मार्ग निवडला,तो केवळ दुर्दैवी नसून भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा मलीन करण्याचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न वाटतो.असे आंदोलन काँग्रेसच्या जुन्या जाणत्या नेत्यांना सुद्धा आवडले नसेल हे पक्के आहे, अशा प्रतिष्ठित कार्यक्रमात, जिथे तंत्रज्ञानातील आपले 'इनोव्हेशन' आणि 'लीडरशिप' दाखवली जात होती, तिथे काँग्रेसने प्रतिष्ठेऐवजी अडथळ्याला दिलेली पसंती अत्यंत संतापजनक आहे.

'इंडिया AI इम्पॅक्ट समिट' ची थीम 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' या राष्ट्रीय दृष्टिकोनावर आधारित होती, ज्याचा अर्थ सर्वांचे कल्याण आणि सर्वांसाठी आनंद असा होतो. मानवतेसाठी AI च्या जागतिक तत्त्वाला प्रोत्साहन देणे हा यामागचा मुख्य उद्देश, यात १०० हून अधिक देशांतील प्रतिनिधी, २० हून अधिक राष्ट्रप्रमुख, ६० हून अधिक मंत्री आणि ४५ हून अधिक जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रमुख सहभागी झाले,याव्यतिरिक्त, ३० हून अधिक देशांतील ३०० हून अधिकांनी येथे आपले स्टॉल्स लावले होते.

भारत आपली ताकद पीपल (लोक), प्लॅनेट (ग्रह) आणि प्रोग्रेस (प्रगती) या तीन मुख्य स्तंभांवर उभी करत असल्याचे या परिषदेतून सिद्ध होत असतांना, शेती, आरोग्यसेवा आणि शिक्षण यांसारख्या क्षेत्रांत AI भविष्यात कशी क्रांती घडवेल, याची प्रत्यक्ष प्रचिती येथे जगभरातील प्रतिनिधींना येत होती. मात्र,अशा भव्य आणि गौरवशाली वातावरणात काँग्रेस कार्यकर्त्यांनी ज्या लाजीरवाण्या पद्धतीने अनुचित वर्तन केले,त्यामुळे भारताच्या शिस्तीवर आणि संस्कृतीवर जागतिक स्तरावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. लोकशाहीत निषेध करण्याचा अधिकार सर्वांना आहे, पण ज्या व्यासपीठावर देशाचा मान-सन्मान पणाला लागलेला असतो, तिथे असा गोंधळ घालणे म्हणजे स्वतःच्याच देशाच्या प्रगतीचा पाय खेचण्यासारखे आहे. एकीकडे भारत जागतिक तंत्रज्ञान नकाशावर स्वतःचे नाव कोरत असताना, दुसरीकडे अशा प्रकारच्या आंदोलनांमुळे देशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर बदनामी होणे हे लोकशाहीसाठी नक्कीच भूषणावह नाही.

या संपूर्ण प्रकारामुळे देशभरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून,ज्या काँग्रेसच्या मोठ्या पदाधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने हा 'धिंगाणा' घालण्यात आला, त्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यायला हवा. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची नाचक्की करणाऱ्या या बेजबाबदार कार्यकर्त्यांवर कठोर कायदेशीर कारवाई होणे अत्यंत गरजेचे आहे.आता तरी काँग्रेस नेतृत्व या गुंडगिरीवर कारवाई करण्याची हिंमत दाखवणार की देशाची प्रतिष्ठा रसातळाला गेलेली उघड्या डोळ्यांनी पाहणार,हाच खरा प्रश्न आहे.

**-वैभव बावनकर,**
नागपूर
मो.९५४५७४५५८०

# महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत अमरावती विभागाचे राज्यस्तरावर नावलौकिक करावे : पालकमंत्री ना. संजय राठोड




## पथसंचलनात यवतमाळ जिल्हा अव्वल

या विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्याचे महसूल विभाग सहभागी झाले असून या स्पर्धेअंतर्गत पथसंचनाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी या पथसंचलनाला पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी मानवंदना दिली. तसेच या पथसंचलन स्पर्धेत यवतमाळ जिल्हा अव्वल ठरल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी जाहीर केले.

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पालकमंत्र्याच्या हस्ते विभागीय महसूल महोत्सवाचे थाटात उद्घाटन, यवतमाळला यंदाचे यजमानपद

यवतमाळ - यंदाच्या विभागीय महसूल महोत्सवाचे यजमानपद यवतमाळ जिल्ह्याला मिळाले असून या महोत्सवांतर्गत विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते शनिवारी थाटात उद्घाटन झाले. या स्पर्धांच्या माध्यमातून सर्वांनी नवी ऊर्जा आणि नवा संकल्प घेऊन आपल्या शासकीय कार्यात मोठे योगदान द्यावे आणि अमरावती विभागाचे राज्यस्तरावर नावलौकिक करावे, असे प्रतिपादन पालकमंत्र्यांनी यावेळी केले.

जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित या विभागीय महसूल महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, विभागीय अपर आयुक्त अजय लहाने, संजय जाधव, सुरज वाघमारे, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हधिकारी अनिरुद्ध बक्षी यांच्यासह स्त्रव उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, महसूल संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री ना. संजय राठोड पुढे म्हणाले की, महसूल विभागावर नेहमीच कामाचा मोठा ताण असतो. तरीही त्यांना सोपवलेली कामे तत्परतेने आणि चोखपणे पार पाडतात. या दगदगीच्या दिनक्रमाला दूर सारत क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांच्या माध्यमातून महसूल परिवारातील संबंध अधिक दृढ व्हावेत आणि लोकाभिमुख प्रशासनाच्या निर्मितीसाठी नवचैतन्य मिळावे हाच या महोत्सवाचा उद्देश आहे. शासनाचा कणा असलेला महसूल विभाग या स्पर्धांमधून अधिक ऊर्जावान आणि सजग बनल्यास महोत्सवाची फलश्रुती ठरेल. हा महोत्सव महसूल प्रशासनाला अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी विकास मीना म्हणाले की, महसूल महोत्सवांतर्गत विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे चांगले नियोजन व व्यवस्था करण्यात आली आहे. ही स्पर्धा महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठीची मोठी संधी आहे. या स्पर्धांमधून महसूल यंत्रणेत आत्मविश्वास आणि समर्पण भावना जागृत होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. २१, २२ आणि २३ फेब्रुवारीपर्यंत सुरु राहणाऱ्या या तीन दिवसीय महोत्सवात क्रिकेट, फुटबॉल, टेनिस, खो-खो आदी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या महोत्सवाची सुरुवात ध्वजारोहणाने आणि मशाल पेटवून करण्यात आली. तसेच आदिवासी संस्कृतीचे पारंपरिक नृत्याद्वारे सादरीकरण करण्यात आले.

# 'रयतेचे राज्य' या शिवछत्रपतींच्या समतावादी धोरणांचा वारसा पुढे नेण्याची गरज : डॉ. ओमप्रकाश फुलमाळी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - "हे राज्य व्हावे, ही श्रींची इच्छा..." या ब्रिद वाक्याला समोर ठेऊन छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेचे राज्य व निर्माण केले. मात्र, हे स्वराज्य केवळ एका विशिष्ट जाती किंवा धर्माचे नसून, ते खऱ्या अर्थाने लोकांचे राज्य होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील संविधानाच्या माध्यमातून हाच वारसा पुढे नेण्याचे काम केले .आजही साडेतीनशे वर्षांनंतर महाराजांचा हा सर्वसमावेशक दृष्टिकोन जगासमोर एक आदर्श वस्तुपाठ ठरत आहे.

भेदभावाला थारा नाही: गुणवत्तेला प्राधान्य देणारे शिवाजी महाराज आपल्या साठी कालही आदर्श होते आजही आहेत आणि उद्या सुद्धा राहतील असे प्रतिपादन डॉ.ओमप्रकाश फुलमाळी यांनी केले. गुजरी येथे शिवसुर्य जन्मोत्सव मंडळ द्वारे आयोजित "रयतेचे राजे " शिवछत्रपती, या विषयावर आयोजित प्रबोधन पर्वाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते . या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मनिष काळे, प्रतिष्ठित नागरिक विलास निमरट, प्रमुख अतिथी पत्रकार किरण हांडे आदी मान्यवर उपस्थित होते . या वेळी शिवरायांच्या विषयावर घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विचार मांडताना मनिष काळे यांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य आजही आदर्श ठरत असल्यावर प्रकाश टाकला. प्रशासनात जात किंवा धर्म पाहून नव्हे, तर कर्तृत्व आणि निष्ठा पाहून पदे दिली जात असत. त्यांच्या सैन्यात आणि अष्टप्रधान मंडळात सर्व समाजातील अठरापगड जातींच्या मावळ्यांचा समावेश होता. महाराजांच्या आरमाराचे प्रमुख कान्होजी आंग्रे होते, तर तोफखान्याची जबाबदारी इब्राहिम खान यांच्याकडे होती. त्यांचे खाजगी अंगरक्षक मदारी मेहतर आणि गुप्तहेर खात्यात महत्त्वाचे काम पाहणारे रुस्तुम-ए-जमान हे महाराजांच्या 'धर्मनिरपेक्ष' आणि न्याय्य भूमिकेचे जिवंत उदाहरण आहेत. शेतकऱ्यांप्रती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन व्यापक होता .राजमात जिजाऊ यांच्या संस्कारातून ते तयार झाले आणि त्यांच्या संस्कारातून त्यांनी छत्रपती संभाजी महाराज यांना तयार केले असे मनोगत त्यांनी व्यक्त केले. विलास नीमरड यांनी शिवरायांच्या कार्याला पुढे घेऊन जायचे असेल तर काही ठोस पाऊले उचलावी लागतील ,त्या साठी गुजरी येथे विद्यार्थ्यांकरिता सार्वजनिक वाचनालय मंडळाने सुरू करावे, ही अत्यंत चांगली जागा तुम्ही निवडली म्हणून मंडळाच्या सदस्यांचे कौतुक केले. पुढे कोणतीही मदत आपण या साठी करू, अशी ग्वाही देखील विलास निमरड यांनी दिली.

## • वेचक

### दिग्रस येथीलआठ वर्षीय अदिबा कलरवाले या चिमुकलीचा पवित्र रमजानचा पहिला रोजा उत्साहात



दिग्रस - मुस्लिम धर्मीयांचा पवित्र रमजानला गुरुवार दिनांक 19 फेब्रुवारी 2026 पासून सुरुवात झाली असून दिग्रस गवळीपुरा येथील आठ वर्षीय अदिबा अमीन कलरवाले हिने आपल्या आयुष्याचा पवित्र रमजानचा पहिला रोजा मोठ्या श्रद्धेने, उत्साह व आनंदात पूर्ण केला असून एवढ्या लहान वयात तिने उपासना,शिस्त व नमाज पठण आणि धार्मिक विधीचे पालन करीत कलरवाले कुटुंबीयांचा अभिमान वाढवला आहे आणि पहिल्या रोजाच्या निमित्ताने घरामध्ये सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून मित्रपरिवार व कुटुंबीयांनी तिचे कौतुक करत शुभेच्छाचा वर्षाव केला आहे. रमजान महिन्यातील रोजा हा संयम,त्याग आणि आत्मशुद्धीचे प्रतीक मानला जातो. एवढ्या लहान वयात या आठ वर्षीय चिमुकलीने अतिशय कठीण धार्मिक विधीचे पालन करून आदीबाने एक आदर्श निर्माण केला आहे. नातेवाईक तसेच मित्रपरिवार यांनी तिचे अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहे. आदिबाच्या या पहिल्या रोजामुळे गवळीपुरा परिसरातआनंदाचे वातावरण निर्माण झाले असून आदिबाला तिच्या भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहे.

### सुषगंगा पॉलिटेक्निक, वणी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

वणी - सुषगंगा पॉलिटेक्निक वणी येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक महान योद्धा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व अभिषेक करून करण्यात आली. प्राचार्य,सर्व विभागप्रमुख (HOD), प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी श्रद्धेने पुष्पहार अर्पण करण्यात आले. अभिषेकानंतर विद्यार्थ्यांनी जोशपूर्ण “शिवगर्जना” देत “जय भवानी,जय शिवाजी” च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून टाकला. यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर भाषणे,पोवाडे आणि देशभक्तीपर गीते सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. या प्रसंगी सुषगंगा पॉलिटेक्निक, वणीचे प्राचार्य यांनी प्रेरणादायी भाषण दिले.त्यांनी शिवरायांचे शौर्य,धैर्य,दूरदृष्टी आणि आदर्श प्रशासन यांचा उल्लेख करून विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले. राष्ट्रप्रेम,शिस्त आणि नेतृत्वगुण जोपासणे हीच शिवरायांना खरी आदरांजली असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्यांनी सर्व प्राध्यापक,विभागप्रमुख (HOD),शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याचे त्यांनी सांगितले. या जयंती सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, स्वाभिमान आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ झाली.

### विहीर खोदताना दरड कोसळून मजुराचा मृत्यू

पोफाळी - विहिरीचे खोदकाम सुरू असताना अंगावर मोठा दगड पडल्याने एका गंभीर जखमी मजुराचा मृत्यू झाला. ही घटना २० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास अंबाळी शेत शिवारात घडली. कोंडबा ऊर्फ कैलास अडकिने (५०) रा. ब्राह्मणगाव असे मृत मजुराचे नाव आहे. कैलास अडकिने हे अंबाळी शिवारातील एका शेतात विहीर खोदकामाचे काम करत होते. शुक्रवारी सकाळी काम सुरू असताना अचानक एक मोठा दगड उडून त्यांच्या डोक्यात पडला. या अपघातात ते गंभीररीत्या जखमी झाले. विहिरीवर उपस्थित असलेल्या अन्य मजुरांनी व नागरिकांनी त्यांना तत्काळ उमरखेड येथील रुग्णालयात दाखल केले. उमरखेड येथील डॉक्टरांनी त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेडला हलवण्याचा सल्ला दिला. मात्र, नांदेडकडे जात असताना वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली. याप्रकरणी मृताची पत्नी अनुसया अडकिने यांनी पोफाळी पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे. ठाणेदार निलेश शेंबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस या घटनेचा पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे ब्राह्मणगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# शिरपूर पोलिसाची धडक कारवाई

## एमडी ड्रगसह रागीब अब्दुल रब अटकेत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्ह्यात अमली पदार्थांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेला शिरपूर पोलिसांनी जोरदार धडक देत आणखी एका ड्रग तस्कराला अटक केली आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या मोहिमेत शिरपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार संतोष मनवर व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

यापूर्वी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रेयश उर्फ गुड्डू पाटील याच्याकडून ५७.१ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) हा सुमारे ५ लाख ६० हजार रुपये किंमतीचा सिंथेटिक अंमली पदार्थ जप्त करण्यात आला होता. या गुन्ह्याचा सखोल तपास करताना अटक आरोपी श्रेयश पाटील व अक्षय बागदडे यांनी रागीब अब्दुल अहमद रब (वय २५, रा. वणी) हा ड्रग तस्करी साखळीत सक्रिय असल्याची माहिती दिली. माहितीच्या आधारे शिरपूर पोलिसांनी वणी परिसरात छापा टाकून रागीब रब याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ६.७ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) किंमत अंदाजे ६० हजार रुपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपासासाठी त्याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात आतापर्यंत तीन आरोपींना अटक झाली असून ड्रग तस्करीच्या साखळीच्या मुळापर्यंत पोहोचण्याचा निर्धार पोलिसांनी व्यक्त केला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार संतोष मनवर, पो.उप.नि. धीरज गुल्हाणे, इक्बाल शेख, प्रशांत झोड, पंकज कुडमेथे, परमेश्वर दराडे, सुनील दुबे, विजय फुल्लुके आदी पथकाने पार पाडली. पोलीसांचे आवाहन ड्रग्स विक्री अथवा सेवनाबाबत माहिती असल्यास नागरिकांनी शिरपूर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाईल, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'नंददीप'च्या संदीप व नंदिनी शिंदे यांचा सोमवारी नागरी सत्कार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - बेघर आणि निराधार मनोरुग्णांच्या सेवेसाठी आपले आयुष्य समर्पित करणारे नंददीप फाउंडेशनचे संस्थापक संदीप शिंदे व नंदिनी शिंदे यांचा यवतमाळकरांच्या वतीने नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

संत गाडगे बाबा जयंतीचे औचित्य साधून, सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता स्थानिक सावरकर मैदान (रंगोली मैदान) येथे हा सोहळा पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजय कावलकर राहणार असून, यावेळी संतोष अरसोड प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित राहतील. हॉंगकॉंग रोटरीतर्फे 'द वन इंटरनॅशनल' या जागतिक पुरस्कारासह अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित शिंदे दाम्पत्याच्या कार्याचा गौरव करून यवतमाळच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी व संदीप शिंदे यांच्या कार्यास संवेदनशील समाजमनाची मदत व्हावी, यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय आजच्या तरुणांसमोर संदीप शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व एक 'युथ आयडॉल' म्हणून स्थापित व्हावे, ही आयोजकांची भावना आहे. यवतमाळच्या मातीतील हे सेवाकार्य जागतिक स्तरावर पोहोचले आहे. या कार्याला दाद देण्यासाठी सर्व यवतमाळकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नागरी सत्कार समिती व विविध संस्था, संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे.

पुरस्कारांचे प्रदर्शन : कार्यक्रमस्थळी नंददीप फाउंडेशनला आजवर मिळालेले सर्व पुरस्कार, मानपत्रे आणि स्मृतीचिन्हे यांचे विशेष दालन उभारले जाणार आहे. संस्थेच्या आजवरच्या संघर्षाचा आणि सेवाकार्याचा प्रवास उलगडणारा माहितीपट यावेळी उपस्थितांना पाहता येईल, असे आयोजकांनी कळविले आहे.

# उमरखेड MIM तालुका अध्यक्षांचा राजीनामा

## भविष्यात पक्ष कार्यकर्ता म्हणूनच सक्रिय राहणार

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - तालुक्यातील ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (MIM) पक्षाचे तालुका अध्यक्ष शहाबुद्दीन कुरेशी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे तालुक्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असून, स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

राजीनामा पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, सध्याच्या वैयक्तिक कारणांमुळे नैतिकतेच्या भूमिकेतून आपण हा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या संघटनात्मक कामकाजात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, तसेच तालुक्यातील संघटना अधिक बळकटपणे पुढे जावी, या उद्देशानेच आपण पदाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. आपल्या कार्यकाळात पक्षाच्या विचारधारेनुसार तळागाळातील कार्यकर्त्यांना जोडण्यावर भर दिला असून, विविध उपक्रम राबविले गेले, असेही त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. अनेक सामाजिक व जनहिताच्या विषयांवर पक्षाच्या माध्यमातून आवाज उठविण्याचे काम व अनेक आंदोलन ही करण्यात आले, असे मतही त्यांनी व्यक्त केले आहे. पक्षाने आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल आणि दिलेल्या संधीबद्दल त्यांनी पक्ष नेतृत्व, वरिष्ठ पदाधिकारी तसेच सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत. अध्यक्षपदाच्या काळात सर्व सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच संघटनात्मक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडता आल्या, असेही त्यांनी नमूद केले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, हा राजीनामा पक्षातून बाहेर पडण्यासाठी नसून, भविष्यातही आपण पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ता व शिपाई म्हणून कार्य करत राहणार असल्याचे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले आहे. पक्षाची विचारधारा, नेतृत्व आणि संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आपण पूर्वीप्रमाणेच सक्रिय राहू, तसेच पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात व कार्यक्रमात सहभागी राहू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच आगामी काळात नव्या तालुका अध्यक्षांना पूर्ण सहकार्य देऊन संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आपण सर्व कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. या संपूर्ण घडामोडीमुळे उमरखेड तालुक्यातील राजकीय वातावरणात नव्या चर्चेला सुरुवात झाली असून, लवकरच पक्षाकडून नव्या तालुका अध्यक्षांची नियुक्ती जाहीर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# कायद्याची कसोटी : टिपेश्वर ESZ मध्ये नियम मोडणाऱ्यांवर कारवाई होणार का ?

## तक्रारीनंतर पोलिसांची नोटीस ; रिसॉर्ट मालकांना चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा -टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य लगतच्या इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) क्षेत्रातील कथित बेकायदेशीर रिसॉर्ट उभारणी संदर्भात अंकित नैताम यांनी दाखल केलेल्या तक्रारीची पोलिसांनी अधिकृत दखल घेतली आहे. पांढरकवडा पोलीस स्टेशनकडून संबंधित रिसॉर्ट मालक व व्यवस्थापकांना लेखी नोटीस बजावून ठराविक तारखेला आवश्यक कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

९ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे लेखी तक्रार सादर करण्यात आली होती. त्यानंतर दि. ११ फेब्रुवारी रोजी पोलीस ठाण्यात फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली. त्यानुसार चौकशी प्रक्रिया सुरू झाली असून संबंधित परवानग्या, पर्यावरणीय मंजुरी, अग्निसुरक्षा उपाययोजना व कायदेशीर कागदपत्रांची पडताळणी होणार आहे. दरम्यान, सुन्ना गेटलगत असलेल्या एका रिसॉर्टला लागलेल्या आगीच्या घटनेने प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. आग वेळीच नियंत्रणात आल्याने संभाव्य मोठे पर्यावरणीय संकट टळले, मात्र या घटनेमुळे ESZ क्षेत्रातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कायद्याची चौकट काय सांगते? : ESZ अधिसूचना (दि. १७ जानेवारी २०१६) – संरक्षित क्षेत्राभोवती १ किमी परिसरात व्यावसायिक उपक्रमांवर निर्बंध आहे. सर्वोच्च न्यायालय आदेश (दि. ३ जून २०२२) – राष्ट्रीय उद्याने व अभयारण्याभोवती किमान १ किमी बफर झोन अनिवार्य आहे. पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ – उल्लंघनास दंड व कारावास. वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ – संरक्षित क्षेत्रात बेकायदेशीर हस्तक्षेपास कठोर शिक्षेची तरतूद आहे. दरम्यान कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही, नोटीस देणे ही सुरुवात आहे; मात्र दोषींवर ठोस व दृश्यमान कारवाई झाली नाही तर जनआंदोलन उभारले जाईल. असा इशारा अंकित नैताम जिल्हा उपाध्यक्ष, ट्रायबल फोरम, यवतमाळ यांनी दिला आहे.

प्रशासनाची अग्निपरीक्षा : टिपेश्वर प्रकरण आता केवळ एका रिसॉर्टपुरते मर्यादित राहिलेले नाही. हा प्रश्न पर्यावरण संरक्षण, आदिवासी भागाचे हक्क आणि कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीचा आहे. चौकशी अहवालानंतर प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जांब बाजारसह ग्रामीण भागात मटका, गुटखा, दारु खुलेआम सुरु


## पुसद ग्रामीण ठाणेदार व बीट जमदार यांचा कानाडोळा?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - तालुक्यातील ग्रामीण भागात अवैध धंद्ये मोठ्या प्रमाणात सुरू असून संपूर्ण तालुक्यात अवैध धंदयाने पुन्हा डोके वर काढले आहे. मटका जुगार तर गावागावात सुरू आहे. काही महिन्यांपासून बंद पडलेले हे धंदे आता अधिक जोमाने सुरू झाले आहे. पोलिसांचा गुन्हेगारांवरील वचक संपला की काय.? असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून ग्रामीण भागातील अति संवेदनशील असलेले काही गाव यामध्ये जांब बाजार बिटमध्ये एकुण दाहा,बारा गावांचा प्रमुख असलेल्या बीट जमादाराच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात अवैद्य धंद्यांना ऊत आला आहे. यामध्ये मटका, गुटखा, देशी व विदेशी तसेच हातभट्टी दारूची मोठ्या प्रमाणात खुलेआम विक्री होतांना दिसत आहे. या ठिकाणी मटका, गुटखा,जुगार मोठ्या प्रमाणात सुरु असून. शाळकरी विद्यार्थीही मटका, जुगाराच्या नादी लागत असल्याचे दिसून येत आहे. जांब बाजार येथे सादीक नामक हा ठाणेदार व बीट जमदार यांना हफ्ते देऊन मोठ्या प्रमाणात खुलेआम मटका घेत असून कायदा धाब्यावर बसून ठाणेदार यांच्या आशीर्वादाने सर्रासपणे सुरु आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, नागरिक व विद्यार्थी या अवैध धंद्याच्या अधीन होऊन आपले आयुष्य खराब करण्याच्या मार्गावर लागले आहे, असे स्थानिक नागरिकांकडून बोलल्या जात आहे. याकडे पुसद उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक यांनी लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे अन्यथा पुढील पिढी बरबाद झाल्याशिवाय राहणार नाही असे काही सुज्ञ नागरिकाकडून मत व्यक्त केल्या जात आहे.

# आठ वर्षाच्या जिया खान हिने केले पहिला रोजा पुर्ण



महागाव - पवित्र रमजान महिन्याची सुरुवात मोठ्या भक्तीभावाने झाली असुन महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथील पत्रकार शेरखान पठाण यांच्या जिया खान या आठ वर्षीय चिमुकलीने आपला पहिला रोजा पुर्ण केला आहे. रमजान महिना मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र असुन या महिन्यात पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपवास ठेवला जातो. नमाज पठण,कुराण वाचन ,दानधर्म आणि गरजुची मदत याला विशेष महत्व असते.जिया पठाण हिने श्रद्धेने व उत्साहाने पहिला रोजा ठेवत कुटुंबीयासोबत नमाज अदा केली.तिच्या या धार्मिक भावना व चिकाटीचे परिसरात कौतुक होत आहे.

# महागाव शहर व परिसरातील मटका अड्डे बंद करण्याची मागणी

## शेतकरी व तरुण पिढीवर परिणाम

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - भारतीय जनता पार्टीचे तालुका उपाध्यक्ष शुभम संजय गरुड यांनी महागाव तालुका व शहरातील वाढत्या अवैध मटका व्यवसायाविरोधात पोलीस प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

मा. ठाणेदार, पोलीस स्टेशन महागाव यांना दिलेल्या तक्रार अर्जात शहरात खुलेआम सुरू असलेल्या मटका व्यवसायामुळे विद्यार्थ्यांवर, तरुणांवर व शेतकरी वर्गावर विपरीत परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या अवैध व्यवसायामुळे सामाजिक वातावरण बिघडत असून अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडत असल्याची बाबही त्यांनी मांडली आहे. यासंदर्भात पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO) यांनाही प्रती पाठविण्यात आल्या आहेत. संबंधितांवर तात्काळ व कठोर कारवाई करून सर्व अवैध मटका अड्डे कायमस्वरूपी बंद करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. जर प्रशासनाने योग्य ती कारवाई केली नाही तर नागरिक व राजकीय पदाधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने तीव्र आंदोलन/मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही तक्रारीत देण्यात आला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठीच ही पूर्वसूचना देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सदय

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत निर्बंधांचा आरोप चुकीचा

## ग्राहकांच्या रक्षणासाठीच महावितरणकडून दक्षता

**अमरावती/का.प्र.**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावर सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्याच्या क्षमतेच्या बाबतीत महावितरणने निर्बंध लादल्याचा सौरऊर्जा प्रकल्प पुरवठादारांचा आरोप चुकीचा आहे. अधिक क्षमतेची रास्त गरज असलेल्या वीज ग्राहकांना महावितरणकडून तपासणीनंतर मंजुरी देण्यात येत आहे. सामान्य घरगुती ग्राहकांसाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या या योजनेत पुरवठादारांच्या दबावामुळे ग्राहकांचे नुकसान होऊ नये, यासाठी महावितरणकडून दक्षता घेण्यात येत आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना ही सामान्य घरगुती ग्राहकांसाठी आहे. तथापि, नियमित घरगुती वीज पुरवठ्याच्या गरजेपेक्षा खूप जास्त क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प बसवायचा, केंद्र सरकारकडून अनुदान घ्यायचे, नंतर त्या कनेक्शनचे रुपांतर वाणिज्यिक कनेक्शनमध्ये करून अनुदानाचा गैरफायदा घ्यायचा, असे प्रकार घडल्याचे महावितरणच्या निदर्शनास आले.

महावितरणकडे अशा तक्रारी आल्या होत्या की, वीज ग्राहकांचा विजेचा वापर कमी असल्याने त्यांची एक किंवा दोन किलोवॅटच्या प्रकल्पाची गरज असताना पुरवठादारांकडून त्यांच्यावर अधिक क्षमतेचा प्रकल्प बसविण्यासाठी दबाव आणण्यात येत आहे. यामुळे गरज नसताना संबंधित घरगुती ग्राहकावर जास्त क्षमतेच्या प्रकल्पाच्या खर्चाचा बोजा पडतो.

हे ध्यानात घेऊन महावितरणने ग्राहकांचा प्रत्यक्ष विजेचा वापर किती आहे हे ध्यानात घेऊन त्यानुसार स्वयंचलित व्यवस्थेत विजेच्या मंजूर भाराला (लोड) मान्यता देण्याची व्यवस्था केली. त्यानुसार त्या ग्राहकाला सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविता येतो. तथापि, ग्राहकाच्या नियमित वीज वापरापेक्षा खूप जास्त क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प बसविण्याची मागणी आली तर त्यासाठी महावितरणच्या यंत्रणेकडून स्थल निरीक्षण करून रास्त मागणी असल्याचे स्पष्ट झाल्यावर मंजुरी देण्यात येईल.

मंजूर भारापेक्षा अधिक क्षमतेच्या सौरप्रकल्पाची मागणी झाली तर स्थल निरीक्षण करावे, यासाठी महावितरणच्या व्यवस्थापनाने संबंधित यंत्रणेला आदेश दिले आहेत.प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत केंद्र सरकारकडून एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ६० हजार रुपये तर तीन किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. प्रकल्पासाठीचा बाकीचा खर्च वीज ग्राहकाने करायचा असतो. या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेतून ग्राहकाची घरगुती विजेची गरज भागेल व काही अतिरिक्त वीज निर्माण झाली तर ती महावितरणला विकून लाभ होईल, अशी ही योजना आहे. या योजनेचा उद्देश्य महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना दिलासा देण्याचा आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसाठी महावितरण ही महाराष्ट्रासाठीची नोडल एजन्सी आहे. ही योजना फेब्रुवारी २०२४ मध्ये सुरू झाली. गेल्या दोन वर्षात राज्यात ४.५३ लाख वीज ग्राहकांना योजनेचा लाभ झाला असून त्यांची एकत्रित सौरऊर्जानिर्मिती क्षमता १,७२२ मेगावॅट आहे. या ग्राहकांना ३,१६२ कोटी रुपये अनुदान मिळाले आहे. या योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

या योजनेचा वापर करून महावितरणने संपूर्ण गाव सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी सौरग्राम योजना सुरू केली असून आतापर्यंत १७ गावे सौरग्राम झाली आहेत.

तसेच राज्य सरकारने या योजनेत वीज ग्राहकाला मिळणाऱ्या अनुदानात स्वतःकडून भर घालून दारिद्र्य रेषेखालील अथवा गरीब अशा पाच लाख कुटुंबांना अत्यंत कमी रकमेत योजनेचा लाभ मिळवून देणारी स्मार्ट योजना सुरू केली आहे.

## संक्षिप्त

### बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



**अमरावती-** मराठी पत्रकारितेचे जनक, 'दर्पणकार' आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी अधीक्षक निलेश खटके यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

### तायक्वांडो (महिला) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती-** फकिर मोहन युनिर्व्हसिटी, व्यासा विहार, बालासोर येथे १६ ते २० मार्च, २०२६ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ तायक्वांडो (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूंमध्ये श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची रोहिणी फाड, साक्षी डहाके, महेक बुंदेले, अनामिका डेका व नम्रता तायडे, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीची नुतन पुंड, गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शीटाकळीची पुनम काशिद आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर तायक्वांडो विभागाची विद्या पुरी हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे ४ ते १३ मार्च दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

### उपवर युवक-युवती व पालक परिचय मेळावा

**अमरावती -** मराठा विवाह मंडळ व वाचनालय, नारायण नगर बगिचा, रूक्मिणी नगर अमरावतीच्या वतीने उपवर युवक-युवती व पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.हा वार्षिक मेळावा रविवार २२ मार्च २०२६ ला सकाळी ११ ते दुपारी ४.०० या वेळेत सुयोग मंगल कार्यालय, रूक्मिणी नगर अमरावती येथे होत असून या प्रसंगी उपवर युवक-युवती परिचय पुस्तक सुध्दा प्रकाशित करण्यात येणार आहे.या मेळाव्यासाठी उपवर युवक – युवती यांची नोंदणी सुरु असून ज्यांना नोदणी करून एक वर्षा पेक्षा जास्त कालावधी झाला असेल त्यांनी नुतनीकरण करून घ्यायची आहे. या मेळाव्यासंदर्भातअधिक माहितीसाठी ९४२२८५६७४४३.या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा आणि मेळाव्याचा लाभ घ्यावा व इतरांना माहिती देवून समाज कार्यास सहकार्य करावे, अशी विनंती मराठा विवाह मंडळाचे सरकार्यवाह दिगंबर शहापूरे यांनी केली आहे.

### श्री. नंदिकेश्वर महाराज देवस्थानात महाशिवरात्री महोत्सव



**ब्राह्मणवाडा थडी-** वणी बेलखेडा या गावात अति प्राचीन शिवमंदिर आहे या मंदिराची वैशिष्ट्य म्हणजे वंदनीय राष्ट्रसंत श्री.तुकडोजी महाराज यांनी १९३५ साली.श्री क्षेत्र सारबर्डी येथे भूतो ना भविष्यती असा महायज्ञ केला होता. त्या कार्यक्रमात श्री संत श्रीकिसन जी महाराज होते त्यांनी वंदनीय महाराजांना वणी बेलखेडा येथे असलेल्या शिव मंदिरा विषयी कल्पना दिली असता वंदनीय महाराजांचे वणी बेलखेडा येथे आगमन झाले असता त्यांनी सांगितले की हे देवस्थान साक्षात जागृत आहे. स्वयंभू शिवलिंग आहे आणि महाराजांनी येथे सुद्धा फार मोठा सप्ताह केला त्यास मध्ये वणी बेलखेडा येथील समस्त गावकरी व आजूबाजूचे गावकरी सुद्धा सहभागी झाले होते वंदनीय महाराज सर्व गावकरी यांच्या सहभागातून मंदिराचे जीर्णोद्धार करण्यात आला. नंतरच्या काळात सर्व कार्यक्रम बंद पडले होते परंतु १९९० च्या दशकात येथील श्री रमेशपंत काळे महाराज दर्शनाला आले असता त्यांना साक्षात्कार झाला आणि त्यांनी संकल्प केला की मी जिवंत आहे तोपर्यंत येथे अखंड शिव पुराण करेल त्यांच्या संकल्पनेत गावकऱ्यांनी सहभाग घेतला कार्यक्रम मोठा झाला हा कार्यक्रम १९९० पासून सर्व गावकऱ्यांच्या सहभागातून सतत ३५ वर्षा पासून चालू आहे ह्या सप्त्यामध्ये विविध कार्यक्रम घेतले जाते.महाशिवरात्रीच्या दिवशी भव्य दिव्य अशी शोभायात्रा काढली जाते.सालाबाद प्रमाणे यावर्षी सुद्धा वणी बेलखेडा येथे स्वयंभू श्री नांदिकेश्वर महाराज देवस्थान वरील महाशिवरात्रीचा कार्यक्रम लोकवर्गणीतून मोठ्या उत्साहाने

# सरळ सेवेद्वारे भरण्यात येणारी कृषी सेवेतील पदे

## वित्त विभागाच्या मान्यतेअभावी रिक्त

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत कृषी विभागात चाळणी प्रक्रियेत तसेच सरळ सेवेद्वारे भरण्यात येणारी कृषी सेवेतील पदे वित्त विभागाच्या मान्यतेअभावी मागील दोन वर्षांपासून भरण्यात आलेली नाहीत. कृषी विभागाने राज्यसेवा आयोगाकडे मे आणि डिसेंबर २०२५ मध्ये मागणी पत्र पाठवूनही वित्त विभागाने त्यास मान्यता दिलेली नाही.



त्यासाठी मुख्यमंत्री उपसचिव अमोल पाटणकर ह्यांना युवा मोर्चा अध्यक्ष ऋषिकेश गजानन ठेलकर (स्वामी विवेकानंद मंडळ) यांच्या द्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

कृषी विभागामध्ये २७५०२ पदे मंजूर आहेत. यातील १८२९८ पदे भरली असून तब्बल ९२०४ पदे रिक्त आहेत. यामध्ये उपविभागीय कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहायक, अनुरेखक, वाहन चालक, नाईक, शिपाई, रोपमळा मदतनीस आदी पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. वित्त विभागाच्या निर्देशानुसार यातील वाहन चालक पदे भरण्यास मनाई करण्यात आली आहे. उर्वरित पदांचा आकृतिबंध अंतिम टप्प्यात आला आहे, असे सांगण्यात येत आहे.

मात्र अद्यापही कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठांचा आकृतिबंध अंतिम करण्यात आलेला नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळ सेवेद्वारे कृषी उपसंचालक (गट अ) मधील तंत्र अधिकारी, आणि महाराष्ट्र कृषी सेवा (गट ब) कनिष्ठ संवर्ग, जिल्हा परिषद कृषी अधिकारी ( गट ब) आणि महाराष्ट्र प्रशासकीय सेवा (गट ब)) सहायक प्रशासकीय अधिकारी अशी पदे भरण्यात येतात. मे २०२५ मध्ये ८७ पदांचे मागणी पत्र लोकसेवा आयोगाला पाठविण्यासाठी वित्त विभागाच्या उपसमितीकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले होते. मात्र त्यावर अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.त्यामुळे कृषी सेवेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता आहे.याबाबत विद्यार्थ्यांनी वारंवार मागणी करूनही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. यासंदर्भात मागील पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केल्यानंतर तत्कालीन कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी संबंधित पदांचे मागणी पत्र वित्त विभागाला सादर केले आणि ते मान्यतेअभावी प्रलंबित असल्याचे सांगितले.

त्यामुळे हे प्रकरण तातडीने सुरू करण्यात येईल आणि येत्या अधिवेशनात ह्या संबंधी चर्चा होईल ह्यांची ग्वाही पाटणकर यांनी दिली. निवेदन सादर करताना ह्या वेळी युवा मोर्चा अध्यक्ष ऋषिकेश ठेलकर, चेतन आठवले, आदित्य राजनेकर, जयंत तऱ्हेकर, यशोदीप गाढवे, यश अंबालकर उपस्थित होते.

# ई-गव्हर्नन्समध्ये अमरावती मनपा राज्यात चौथी

**अमरावती/का.प्र**

केंद्र व राज्य सरकारच्या ई-गव्हर्नन्स धोरणांच्या अनुषंगाने तसेच युनाईटेड नेशन यांच्या ई-गव्हर्नन्स अहवालातील निकषांचा अभ्यास करून दरवर्षी ई-गव्हर्नन्स निर्देशांक निश्चित केला जातो. यावर्षी राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सर्वेक्षणात अमरावती महानगरपालिकेने राज्यात चौथा क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर नंतर चौथा क्रमांक अमरावती महानगरपालिकेने मिळवला आहे. विशेष म्हणजे मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर यांच्यासारख्या मोठ्या महानगरपालिका ज्यांचे ई-गव्हर्नन्स व डिजिटायझेशनचे बजेट ३०० करोड पेक्षा जास्त आहे अशाही महानगरपालिकेला मागे टाकत अमरावती महानगरपालिकेने ही कामगिरी साध्य केली आहे.हा निर्देशांक पॉलिसी रिसर्च ऑरगनायजेशनतर्फे महानगरपालिकांच्या ई-गव्हर्नन्सच्या सद्यस्थितीचा सखोल अभ्यास करून तयार करण्यात आला आहे. सेवा वितरण, पारदर्शकता, नागरिकांसाठी उपलब्धता, ई-गव्हर्नन्स मोबाईल ॲप, सोशल मीडिया वापर आणि अधिकृत संकेतस्थळावरील माहिती या निकषांवर आधारित मूल्यांकन करण्यात आले.या यशाबद्दल महानगरपालिकेच्या पहिल्या आमसभेत महापौर श्रीचंद तेजवानी व उपमहापौर सचिन भेंडे तसेच सभागृह नेते चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, युवा स्वाभिमान पक्षाचे गटनेते नानाभाऊ आमले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते अविनाश मार्डीकर, गटनेते राजेंद्र तायडे, AIMIM चे गटनेते हमीद भाई, प्रशांत वानखडे यांनी आयुक्त सौम्या शर्मा चांडक व सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे व संगणक विभागातील संपूर्ण चमुचे या उल्लेखनीय कामगिरी बाबत अभिनंदन केले नागरिकांना आवश्यक असलेल्या सेवा पारदर्शनी पणे ऑनलाईन पद्धतीने पुढेही देण्यासाठी मनपा प्रयत्न करत राहील असा विश्वासही मनपा आयुक्त यांनी व्यक्त केला.नागरिकांना ई-गव्हर्नन्स मधील प्रगती व सुधारणा यांची माहिती www.policyresearch.in तसेच Amravati Municipal Corporation च्या अधिकृत संकेतस्थळ www.amravaticorporation.in वर उपलब्ध असून, ती डाउनलोडही करता येणार आहे.

# आंबेडकरवादी चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. रंजना कवाडे यांचे निधन

**अमरावती/का.प्र.**

आंबेडकरवादी चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक, शांत व संयमी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रा. रंजना कवाडे यांचे शनिवारी, २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ४.१० वाजता नागपुरात दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात शोककळा पसरली आहे. पीपल्स रिपब्लिकन पार्टी (पीरिपा) चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप कवाडे यांना मातृशोक झाला आहे. त्या लाँग मार्चचे प्रणेते, पीरिपाचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या पत्नी होत.

गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती अस्वस्थ होती; मात्र आजाराशी झुंज देताना त्यांनी मानसिक धैर्य आणि सकारात्मकता कायम ठेवली होती. प्रा. रंजना कवाडे या केवळ एका राजकीय कुटुंबातील सदस्य नव्हत्या, तर स्वतःच्या विचारांवर ठाम राहून कार्य करणाऱ्या मार्गदर्शक होत्या. त्यांनी पीपल्स रिपब्लिकन पार्टीसह रिपब्लिकन युथ फोर्स, रमाई महिला ब्रिगेड, दलित मुक्ती सेना, राष्ट्रीय मजदूर सेना आणि राष्ट्रीय विद्यार्थी सेनेच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवला. विविध सामाजिक उपक्रम, महिला सक्षमीकरण, युवक संघटनांचे मार्गदर्शन आणि आंबेडकरवादी विचारांचा प्रसार यासाठी त्यांनी



सातत्याने कार्य केले. त्यांच्या पश्चात मुलगा जयदीप, मुलगी वैशाली, मुलगी सुजाता, सून प्रतिमा, नात निरिजा, नात अस्मिता तसेच नातवंडे आणि मोठा आप्तपरिवार असा परिवार आहे. प्रा. रंजना कवाडे यांची अंत्ययात्रा शनिवारी, २१ फेब्रुवारी रोजी नागपुरातील लक्ष्मीनगर येथील निवासस्थानातून काढण्यात येवून मोक्षधाम घाट येथे अंतिमसंस्कार करण्यात आले.

# 'लव्ह जिहाद' आणि सक्तीचे धर्मांतर रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा करा

## हिंदू जनजागृती समितीचे तहसिलदारांमार्फत शासनाला निवेदन

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील अनेक भागांत फसवणूक करून केलेले विवाह, ओळख लपवून संबंध प्रस्थापित करणे, मानसिक दबाव किंवा धमकीद्वारे धर्मांतर केल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. या संदर्भात कोणत्याही प्रकारचा कायदा नसल्याने कठोर कारवाई करता येत नाही. त्याकारणाने केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार देशातील ५ राज्यांत लागू झालेला, तसेच महाराष्ट्र शासनाने तत्त्वतः मान्यता दिलेला ' लव्ह जिहाद' आणि बलपुर्वक धर्मांतर रोखण्यासाठी स्वतंत्र कायदा येणाऱ्या अर्थसंकल्पीय



अधिवेशनात करण्यात यावा, या मागणीसाठी हिंदू जनजागृती समिति व समस्त हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने शासनाला जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिक्षक तथा तहसीलदार डॉ.निलेश खटके यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. या प्रसंगी विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या प्रसंगी रंजना पांडे,उषा कांबळे,लिना नांदुरकर,भारती मोहोड, विभा चौधरी,चंदा बागडे, समिधा वरुडकर,लता कुयरे, बेला चव्हाण,किरण कोमेरवार,संगीता चौधरी,रेखा मालपानी, प्रीती नागपुरे,कंचन शर्मा, सचिन वैद्य,गिरीष जामोदे, पप्पू मिश्रा (धर्मजा गरण), हरीश नाडे (श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान),रमेश वरुडकर यांसह मोठ्या संख्येने महिला व पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात

# जटिल किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया; आईने दिले मुलाला जीवदान

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, मोशी रोड, अमरावती येथे आणखी एक किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली. स्थानिक अमरावती शहरातील महात्मा फुले नगर, नवसारी येथील मध्यमवर्गीय कुटुंबातील रहिवासी सागर प्रभाकर वसुकर वय वर्ष ३४ या रुग्णाला त्याची आई संध्या प्रभाकर वसुकर वय वर्ष ५५ यांनी किडनी देऊन मुलाला जीवनदान दिले.

सागर व्यवसायाने बिछायत केंद्राचा संचालक आहे. सागरचे वडील ऑटो चालक आहेत. सागर प्रभाकर वसुकर गेल्या सहा महिन्यापासून डॉ अविनाश चौधरी यांच्या देखरेखी खाली उपचार व डायलिसिस घेत होता .श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाचा डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रियेचे नियोजन करण्यात आले. शस्त्रक्रिया चमू मध्ये युरोलॉजीस्ट डॉ राहुल पोटोडे, डॉ विक्रम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली युरोलॉजिस्ट डॉ विशाल बाहेकर,डॉ राहुल घुले,डॉ प्रतीक चिरडे, नेफ्रॉलॉजिस्ट डॉ अविनाश चौधरी, बधिरीकरण तज्ञ डॉ विजया पाटील, डॉ रोहित हातगावकर ,डॉ श्रद्धा ढाकुलकर , डॉ दिपाली चांदुरकर, डॉ उत्कर्षा भोजने डॉ ऋतुजा ,डॉ कल्याणी, रमनिका ढोमणे ,डॉ विद्या ईसळ यांचा मोलाचा वाटा होता. पाच तास चाललेली ही शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली.





रुग्णाचे, नातेवाईकांचे समुपदेशन ,पोलीस पडताळणी , कायदेशीर बाबीची पूर्तता, वैद्यकीय चाचण्या तसेच शस्त्रक्रियेचे फायदे व तोटे समजून सांगणे व याची संपूर्ण फाईल तयार करून प्राधिकरण समिती अथोरायझेशन कमिटी समोर सादर करून प्रत्यक्ष मुलाखती द्वारे मान्यता प्राप्त करून घेणे. इत्यादी बाबी पूर्ण करणे ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर सतीश वडनेरकर यांची महत्त्वाची भूमिका होती.

प्राधिकरण समिती अध्यक्ष अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, सदस्य डॉ अमोल नरोटे, प्रतिनिधी उपसंचालक कार्यालय ,अकोला आरोग्य सेवा ,डॉ विनोद पवार, जिल्हा शल्य चिकित्सक ,अमरावती डॉ अविनाश लव्हाळे सेवानिवृत्त उपसंचालक, विभाग प्रमुख फॉरेन्सिक मेडिसिन, डॉ पवन टेकाडे, विभाग प्रमुख पथोलॉजी, डॉ राम अवतार सोनी, विभाग प्रमुख मेडिसिन, डॉ शुभांगी वर्मा, विभाग प्रमुख फर्माकोलॉजी विभाग,डॉ किशोर बनसोड यांनी रुग्ण व डोनर यांची संपूर्ण कागदपत्राची पडताळणी करून त्यांच्यासोबत मुलाखतीच्या माध्यमातून प्रत्यक्ष संवाद साधून सर्व बाबीची पडताळणी केली व शस्त्रक्रिया करण्याची मान्यता दिली.शस्त्रक्रिया गृहात परिचारिका संध्या वाघमारे ,प्रियंका मैद, मोहिनी गोत्रे, सुमित्रा गाडगे, वैभव नासरे, कल्याणी निरळकर, आशिष बोकडे, कल्पना पाटील, प्रतीक्षा भिसेकर यांनी काम पाहिले. तर किडनी किडनी ट्रान्सप्लांट आयसीयू मध्ये पुढील दहा दिवस, परिचारिका शितल अंबर्ते, दामिनी ढवळे, स्मिता वावरे, शशिकांत ढिवर, नेहा घोरपडे ,प्रतीक्षा दामोदर, चैताली ठाकरे, काजल गुजर ईशा साहू, जतीन दडमल हे कार्यरत होते.

रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख,चित्रा देशमुख, एम एस डब्ल्यू अनिकेत माहोरे ,सहाय्यक प्रियंका देशमुख, आरती मोरांडे यांची शस्त्रक्रिया पूर्वतयारीत व फाईल पूर्ण करण्यात मोलाचे सहकार्य होते.

शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत संपूर्ण मोफत करण्यात आली .तसेच शस्त्रक्रियापूर्वी देखील बऱ्याच चाचण्या रुग्णालया स्तरावर मोफत करण्यात आल्यामुळे रुग्णाला बराच दिलासा मिळाला. रुग्ण व रुग्णांचे कुटुंबियांनी शस्त्रक्रिये बाबत समाधान व्यक्त केले.

गोपाल सावरकर, वर्षा गाढवे, मधुर भुयार, उमेश सोनवणे, सार्थक तसरे, नवनीत करडे ,तेजस हरणे, रोशन वानखडे, आकाश हंबर्डे यांनी शस्त्रक्रिया गृहात सहायक म्हणून कर्तव्य पार पाडले.

किडनी ट्रान्सप्लाट सारखी अत्यंत अवघड शस्त्रक्रिया डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात यशस्वी झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व पदाधिकारी यांनी सर्व तज्ञ डॉक्टर चमूचे ,नर्सिंग स्टाफ तसेच महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

# शिक्षकांच्या समायोजनेचा आक्षेपार्ह आदेश

**सध्या सर्वाधिक गोंधळ आणि भ्रष्टाचार कोणत्या क्षेत्रात असेल तर तो शिक्षण क्षेत्रात आहे. शाळांमध्ये प्रत्यक्ष अध्यापनापेक्षा विविध उपक्रमांचा अक्षरशः वर्षाव होत आहे. यातच टीईटी, सेवाज्येष्ठता, पदोन्नती अशा अनेक मुद्द्यांवर उपाय शोधण्यापेक्षा शासन उलटसुलट आणि विसंगत परिपत्रकांनी समस्या अधिक गुंतागुंतीच्या करीत आहे. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्याच्या शिक्षण संचालकांनी अतिरिक्त शिक्षक व त्यांचे समायोजन याबाबत एक आदेश निर्गमित केला. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात तीव्र असंतोष आणि अनामिक भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**



राज्याच्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालकांनी ४ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी आणि विभागीय उपसंचालक यांना उद्देशून एक परिपत्रक निर्गमित केले आहे. या परिपत्रकात त्यांनी १५ मार्च २०२४च्या सुधारित संच मान्यतेचे निकष आणि सुधारित संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत एक वेळापत्रक ठरवून दिले आहे. त्यानुसार पहिला टप्पा म्हणून सर्व जिल्ह्यांतील शिक्षणाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यांतील सर्व शाळांच्या २०२५-२६ च्या संच मान्यतेनुसार १३ फेब्रुवारी २०२४ पर्यंत अतिरिक्त शिक्षक कोण हे ठरवून त्यांची यादी जाहीर करावयाची आहे. त्यावर संबंधितांनी २४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आक्षेप घ्यावयाचा असून त्यावर निर्णय देऊन शिक्षणाधिकाऱ्यांनी अतिरिक्त शिक्षकांची अंतिम यादी जाहीर करायची आहे. ही यादी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत जाहीर करावी लागेल आणि त्यानंतर ३ मार्च २०२६ पर्यंत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करावयाचे आहे.

उच्चपदस्थ अधिका-यांनी असे आदेश काढण्यापूर्वी आपल्याच खात्यातील शेवटच्या घटकापर्यंत वस्तुस्थिती काय आहे, आपल्या आदेशाची व्यवस्थित अंमलबजावणी होईल की नाही, त्या आदेशाने समस्या निर्माण होणार नाही ना, या बाबींचा सर्वांगीण विचार करावा, अशी किमान अपेक्षा असते. केवळ आदेश काढून उपयोग नाही. संबंधितांनी पुढील काही मुद्दयांचा विचार करायला हवा.

(१) सर्वात महत्त्वाचे म्हणजे संचालकांनी जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांची यादी १३ फेब्रुवारीपर्यंत जाहीर करावी, परंतु अद्याप अनेक शाळांना ती संच मान्यताच प्राप्त झालेली नाही, तर काहींना केवळ एक दिवस आधी मिळाली आहे. शिक्षक अतिरिक्त ठरविण्याचे अधिकार केवळ मुख्याध्यापकांना नाहीत. त्यासाठी संस्थेच्या ठरावाची आवश्यकता असते आणि असा ठराव करायला शाळा समितीची बैठक बोलवावी लागते. यासाठी विषय पत्रिका आणि सभेचा दिवस किमान दोन-तीन दिवस आधी तरी ठरवावा लागतो. त्याबाबत अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकाला कळवावे लागते. त्यानंतर तो संबंधित शिक्षक शाळा समितीकडे आपला आक्षेप नोंदवू शकतो. त्यावर पुन्हा शिक्षण समितीमध्ये चर्चा होऊन अंतिम निर्णय घ्यायचा असतो. त्यानंतर संबंधित शिक्षक या निकालावर अपील करू शकतो. त्यावर शिक्षणाधिकारी सुनावणी घेऊन निर्णय देतात. आता हे सर्व कळायला किमान काही दिवस तरी लागणारच. महत्त्वाचे म्हणजे अतिरिक्त शिक्षक ठरवण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांची अद्ययावत सेवाज्येष्ठता यादी अत्यंत आवश्यक आहे, पण सध्या ही सेवाज्येष्ठता नेमकी कशी करावी याबाबतच खूप गोंधळ आणि मतमतांतरे आहेत. शासनाचे परिपत्रक याबाबत योग्य मार्गदर्शन न करता गोंधळ मात्र वाढवीत आहे. शिक्षणाधिकारी कार्यालयात सेवाज्येष्ठतेबाबत अनेक तक्रारी प्रलंबित आहेत. त्याचा निकाल लागल्याशिवाय अतिरिक्त शिक्षक ठरविणार तरी कसे?

(२) मिळालेल्या संचमान्यतेत अनेक त्रुटी आहेत. त्याबाबत पेलेल्या अनेक तक्रारी प्रलंबित आहेत. त्यांचा निर्णय लागणार कधी? आणि अतिरिक्त शिक्षक ठरवले जाणार कधी? हे सर्वच अनिश्चित आहे. मुख्य म्हणजे आपल्याच खात्यातील ही वस्तुस्थिती उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना ज्ञात नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल!

(३) आज अनेक शैक्षणिक संस्थांमधील चालकांमध्ये दोन-दोन गट निर्माण झाले आहेत. 'आम्हीच खरे मालक' असे म्हणून धर्मदाय आयुक्तांकडे अशा अनेक वादग्रस्त संस्थांची प्रकरणे प्रलंबित आहेत. अशा वेळी अतिरिक्त शिक्षक कोण ठरविणार? शिक्षणाधिकारी न्यायप्रवीष्ट प्रकरण म्हणून निर्णय देत नाहीत, स्वतःचे अधिकारही निर्भयपणे वापरत नाहीत आणि शिक्षण खात्याचे उच्च अधिकारी याबाबत कठोर भूमिका घेत नाहीत. त्यामुळे अनेक शिक्षकांचे वरिष्ठ निवड श्रेणी प्रस्ताव, पदोन्नती अशा अनेक बाबींवर निर्णयच घेतले गेलेले नाहीत. शिक्षण खात्याच्या नव्या आदेशाने न्यायालयाचा अवमान तर होणार नाही ना? ४ फेब्रुवारी २०२६ च्या शिक्षण संचालकांच्या आदेशात असे म्हटले आहे की, १५ मार्च २०२४ च्या सुधारित संच मान्यतेच्या निकषानुसार शिक्षकांचे समायोजन करायचे आहे. मात्र माझ्या माहितीनुसार सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाने १५ मार्च २०२४ च्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलेले आहे. त्याबाबत राज्य शासनाला नोटीसही बजावण्यात आलेली आहे. यासंबंधात प्रथम सुनावणीदेखील झाली आहे. पुढील सुनावणी १३ मार्च २०२६ रोजी होणार आहे. सदर याचिकेचा नंबर २४७९/२६ असा आहे. एवढेच नाही तर यापूर्वीदेखील सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाने ३३३८/१६ या याचिकेद्वारे शासन आदेशाला आव्हान दिलेले आहे आणि या दोन्ही याचिका निर्णयार्थ प्रलंबित आहेत.

याशिवाय उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातदेखील तीन याचिका पेंडिंग आहेत. त्यातील ३१८६/२५ याचिकेनुसार न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. म्हणजे सर्वोच्च न्यायालयात दोन आणि नागपूर खंडपीठात तीन आव्हान याचिका निर्णयाधीन असताना त्याच आदेशानुसार कार्यवाही करायला सांगणे हा न्यायालयाचा अपमान होणार नाही का? सध्याचा काळ परीक्षांचा आहे. बारावीची परीक्षा सुरू आहे. दहावीची तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा होत आहे. त्यानंतर दहावी बोर्डाची व पाठोपाठ शालेय परीक्षा होतील. अशा वेळी शिक्षकांना अतिरिक्त ठरवून दुसऱ्या शाळेत पाठविणे, दुसरे शिक्षक येणार कधी हे अनिश्चित असणे या कारणांमुळे विद्यार्थ्यांचे किती शैक्षणिक नुकसान होईल याचा विचार कोण करणार? निदान परीक्षेचा काळ तरी लक्षात घ्या. हीच प्रक्रिया मे, जून, जुलैमध्ये राबविली असती तर आकाश कोसळले नसते. एकीकडे गुणवत्तापूर्ण शिक्षण असा जयघोष करायचा आणि दुसरीकडे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला बाधा येईल असे निर्णय घ्यायचे. शासनाने हा दुटप्पीपणा करू नये आणि शिक्षकांच्या समायोजनेबाबत काढलेल्या आक्षेपार्ह आदेशाबाबत विचार करावा.

**पी. डी. दलाल**

# मातृभाषेला संपन्न करणे गरजेचे

**२१** फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हाट्सअप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो मात्र दिवस सरला की दुसऱ्या दिवशी पुन्हा येरे माझ्या मागल्या.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे यातील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव



अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तिन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले. बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल.

आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम 'मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. 'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा.व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे.

**जगन घाणेकर**

# मैत्रीण नको आईच होऊया !

**टी**नेजमधील मुलीशी वागताना नियम आणि प्रेम या दोघांची कसरत तुम्हाला करावी लागली आणि कधीकधी तर मुलीला तुमच्या वागण्याच्या बंधनांचा, नियमांचा खूप रागही आला असेल असे असले तरी ते तुमचे तुमच्या मुलीवरचे प्रेम होते, हे काही वर्षांनी तिला समजेल. कळेल की आपली आई नाही म्हणाली पण त्यापेक्षा खूप जास्त गोष्टींना ती हो म्हणाली आहे. का असे नाही म्हणाली ती, कारण त्या वेळेला ते तुमच्या मुलीच्या कल्याणासाठी होते.

१) मुलींशी वागताना, बोलताना, खोचकपणा, निंदा टाळा. व्यंगात्मक बोलण्यापासून दूर राहा. त्यांच्याशी बोलताना हे लक्षात घ्या तुमच्या बोलण्यात टोमणे नकोच. त्यांच्या वागण्यावर लक्ष केंद्रित करून त्यांना नावे ठेवण्यापेक्षा जे अपेक्षित आहे तो मेसेज नक्कीच मुलींपर्यंत पोहोचवा. मुलगी जर आक्रमक वागत असेल तर हे जरूर सांगा की तू नीट शांत वागलीस की मग बोलूया. कारण तुमची मुलगी सध्या तिच्या स्वतःच्या जगात इतकी बुडून



गेली आहे की, तिला स्वतःपलीकडेही काही जग आहे याची जाणीवच नसल्याने ती सतत मी मी असे म्हणत असते. आई-वडिलांच्या आयुष्यातले चढ-उतार तिच्या लक्षातच येत नाहीत.

२) मुलींच्या मैत्रिणीबद्दल आणि त्यांच्या दिसण्याबद्दल, त्यांच्या वागण्याबद्दल अति टीका करू नका. मुली आपल्या पसंतीचे कपडे, ज्वेलरी जशी निवडतात तशा त्यांच्या मैत्रिणीही त्यांच्यासाठी खूप महत्त्वाच्या असतात. जसे त्यांना छंद, कला, खेळ, पुस्तके त्यांच्या आवडीची हवी असतात तसेच त्या वेगवेगळ्या पर्सनॅलिटीच्या मैत्रिणीबाबतही ट्राय करून बघतात, म्हणून लगेच काही ठरवून मोकळे होऊ नका. मुलीवर टीका केली तर ती मुलींच्या मनाला दुखावते आणि मैत्रिणींना बोलले की तो अपमानच वाटतो.मुलींसाठी तुम्हीच रोल मॉडेल असता.

३) कधी कधी मुलीला अपयशाचा सामनाही करू देत. मला ठाऊक आहे हे आपल्या मुलीबाबत कोणालाच आवडणार नाही पण या चुकांतूनच मुलगी शिकते. परिस्थितीशी जुळवून घ्यायला शिकते.स्वतःवर परफेक्ट होण्याचे प्रेशर या वयात मुली टाकत असतात. इतरांना खूश करण्याचा प्रयत्न करतात. पण मुलींना सारखे जपण्याच्या नादात त्यांना अडचणींना सामोरे जाण्याची संधी आपण टाळत असतो, ते लक्षात घ्या. खरे म्हणजे अडचणींना सामोरे गेल्याने मुलींचा आत्मविश्वास वाढतो. त्या आव्हान स्वीकारायला तयार होतात.

४) मीडिया वापरण्याबाबत त्यांना मीमांसात्मक दृष्टिकोन द्या. तुमच्या मुली मीडियावर पाहत असलेले फोटो हे फिल्टर केलेले किंवा फोटोशॉप केलेले असतात. ते पाहताना मुली स्वतःची तुलना त्या फोटोशी करतात आणि एका मोहजालात अडकत जातात. त्यांची स्वप्रतिष्ठा, मानसिक आरोग्य, स्वप्रतिमा खालावत जाते. म्हणूनच स्त्रिया आणि मुली यांचा मीडियावर कसा उपयोग केला जातो याची मुलींशी चर्चा करा.

५) मुलींच्या रूम्समध्ये एक नाहीतर अनेक भावनिक वादळे घोंगावत असतात. नात्यातले गोंधळलेपण असते. आपण मुलींच्या प्रत्येक वागण्या-बोलण्याच्या कृतीवर वाद घालत बसलो, तर सारेच कठीण होऊन बसते. काही गोष्टींकडे दुर्लक्ष करायला हरकत नाही.

गप्पा करताना, काम करताना आपण जे बोलत असतो, वागत असतो त्यातूनच नाते फुलत जाते, संवाद उमलत जातो, बहरत जातो. मुलींना तुमची मते यातूनच कळत जातात.

**डॉ. स्वाती गानू**



# मनमोकळ्या संवादाचे 'व्यसन'

**'एखाद्या गोष्टीची तल्लफ येणे, तिची सवय जडणे, ती गोष्ट मिळाली नाही तर अस्वस्थता येणे ही व्यसनाची प्राथमिक लक्षणे समजली जातात. बऱ्याचदा अशी बेचैनी चुकीच्या, अपायकारक गोष्टींप्रती दिसत असल्यामुळे व्यसन' या शब्दाभोवती एक नकारात्मक कोंदण निर्माण झाले आहे. कलाकाराला हीच मनोवस्था त्याच्या आवडत्या कामाप्रतीही जाणवू शकते. तेव्हा मात्र या व्यसनाकडे सकारात्मक वळणावरून पहावेसे वाटते. आघाडीच्या काही व्यक्तिमत्त्वांना या अनुषंगाने बोलते केले असता काही व्यसने खरे जोडीदार बनतात आणि आयुष्यात नवी अनुभूती देतात, असे लक्षात येते. याच अनुभूतीची खास झलक.**

मला लोकांशी बोलायला, मनमोकळा संवाद साधायला आवडते. हे माझे व्यसनच आहे. अगदी अपरिचित व्यक्तीशी होणारा संवादही आपल्याला बरेच काही देऊन जातो, असे मला वाटते. संवाद हरवला तर आपली माणूस असल्याची ओळख पुसून जाण्याचा धोका आहे. मग एखाद्या यंत्रात आणि आपल्यात फरकच उरणार नाही. म्हणूनच हे व्यसन जपण्याचा प्रयत्न करते आणि माणसांच्या संपर्कात राहण्याचा आनंद घेते.

खरे तर व्यसन हा शब्द अजिबातच सकारात्मक नाही. किंबहुना, त्याकडे चांगल्या नजरेनिशी कधी बघितलेही जात नाही. तना-मनाला, समाजस्वास्थ्याला हानिकारक ठरणाऱ्या सवयीला आणि त्याच्या सातत्यपूर्ण अनुसरणाला व्यसन म्हटले जाते. तल्लफ आली की व्यसनी माणूस परिणामांची पर्वा न करता हवी ती गोष्ट करून मोकळा होतो. अर्थातच त्यानंतर उद्भवणारी स्थितीही त्याला सहन करावी लागते. एखाद्या चांगल्या गोष्टीचे ध्येय, त्याच कामाची पुनरावृत्ती, ती आस आणि ती अपेक्षा नेहमीच काही चांगल्या बाबी देऊन जात असते. या अर्थाने बघता मला काही गोष्टींचे 'व्यसन' आहे असेच म्हणावे लागेल.

असा विचार करता मनात येणारी पहिली बाब माझ्या वक्तशीरपणाच्या आग्रहासंदर्भातील आहे. मला आवराआवर आणि नीटनेटकेपणाचे व्यसन आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. एक व्यसन माणसे जोडण्याचेही आहे. मला माणसांशी कनेवर व्हायला, त्यांच्याबरोबर काही वेळ घालवायला मनापासून आवडते. विशेषतः समोरचा माणूस तुम्ही कोण आहात हे जाणत नसेल, तुम्हाला ओळखत नसेल तर विशेष रंगत येते.

अशांशी होणारा संवाद, त्यांच्याबरोबर होणारी विचारांची देवाणघेवाण आणि त्यातून तुम्हाला मिळणारे बरेच काही विचारांच्या कक्षा रुंदावणारे असते. प्रामुख्याने मला असणाऱ्या या व्यसनाची तल्लफ प्रवासात भागते.

मी देशाच्या अन्य भागांमध्ये आणि देशाबाहेरही बरीच फिरले आहे. अशा काही प्रवासांमध्ये आपण निनावी असतो. सहप्रवाशांना, प्रवासात भेटलेल्या लोकांना सेलिब्रिटी वा अभिनेत्री हा माझा परिचय माहिती नसतो. थोडक्यात, संभाषण साधणाऱ्या दोन्हीही व्यक्ती एकमेकांना पूर्णपणे अपरिचित असतात. अशा वेळी त्यांच्यामध्ये होणारे बोलणे, त्यामध्ये होणारी विचारांची देवाणघेवाण आणि त्यातून समृद्ध होणाऱ्या जाणिवांमध्ये मला खूप रस आहे. हे व्यसन असल्यामुळेच मला शेजाऱ्यांशी, मुलीच्या शाळेत भेटणाऱ्या पालकांशी वा माझ्याकडे माणूस म्हणून बघण्याची धमक असणाऱ्या लोकांशी बोलण्याचे व्यसन आहे असे वाटते. माझे काम आवडल्यानंतर प्रेक्षक बोलतात, पसंतीची पावती देतात. कामाचे मनापासून कौतुक करतात. त्या कौतुकाचा स्वीकार करताना होणारा आनंद वेगळाच असतो. पण त्या वर्षावात किती गुंतून पडायचे याचाही विचार मनात असतो. याउलट, मला न ओळखणाऱ्या लोकांशी होणारा संवाद यापेक्षा वेगळा असतो. कारण त्यातून बरेच वेगळे असे काही मिळत असते. एका नव्या भावविश्वाचा, व्यक्तिमत्त्वाचा, सांस्कृतिक-वैचारिक बैठकांचा अल्पपरिचय करून देणाऱ्या अशा छोट्या-मोठ्या भेटी शब्दात न सांगता येणारे बरेच काही देऊन जातात.

अगदी अलीकडचा प्रसंग सांगते. आम्ही जपानला गेलो होतो. रेल्वेच्या त्या प्रवासात कावेरीशी मस्त गप्पा सुरू होत्या. तो नवा देश जाणून घेताना, आजूबाजूचा परिसर बघताना मजा वाटत होती. तेवढ्यात शेजारी बसलेली सहप्रवासी श्री गोड हसली आणि आमच्या गप्पांमध्ये हलकेच सामील झाली. साहजिकच बोलण्यात आणखी रंग भरला. अर्थातच या छोट्याशा संवादादरम्यान तिने मला जगण्याचे फार मोठे सूत्र सांगितले असे म्हणणार नाही. तिने मला सकारात्मक दृष्टिकोन दिला, असे म्हणणेही कदाचित योग्य ठरणार नाही. मात्र त्या बोलण्यातून सांगता न येण्याजोगे काही तरी मिळाले, हे मात्र नक्की. कारण एकमेकांना ओळखत नसताना, एकमेकांविषयी पूर्णपणे अनभिज्ञ असतानाही एकमेकांशी बोलतो, संवाद साधतो तेव्हा सगळीकडे माणूस सारखा आहे आणि माणुसकी अद्याप जिवंत आहे, याची खात्री पटते. एका अर्थी ती आपण अद्याप यंत्रमानव झालो नसल्याची खूण आणि खात्री असते.

अनेकदा निरुपद्रवी बनण्याच्या नादात मागसे संवादच हरवून बसतात. बघता बघता त्यांच्यात एक तुटलेपण येते आणि काही काळातच ही दरी इतकी वाढते, की एकलकोंडेपणाने आपल्याभोवती कधी वारुळ केले हे समजतही नाही. म्हणूनच ही भीती दूर ठेवणारे बोलण्याचे व्यसन मला महत्त्वाचे वाटते. बऱ्याचदा दोन वाक्यांचा संवादही एखाद्याला मोठी सफर घडवून आणणारा ठरतो. त्याचे ते क्षणच नव्हे तर कदाचित सगळा दिवस त्या अनोख्या भ्रमंतीत, भटकंतीत निघून जातो. मध्ये असेच झाले. मी भाजी घेण्यासाठी घराखाली गेले होते. नेहमीप्रमाणे भाजीवाल्याशी गप्पा सुरू झाल्या. त्या ओघातच तुम्ही पेरू का आणत नाही, असे मी विचारले. त्याबरोबर भाजी घेणारी शेजारची बाई म्हणाली, 'ऑनलाइन मिळतात की पेरू. खरे तर हे मलादेखील ठाऊक आहे. सध्या तुम्ही हवी ती गोष्ट ऑनलाइन मागवू शकता. पण मला वा माध्यमातून भाज्यांची खरेदी करायला अजिबात आवडत नाही. खरे सांगायचे तर मला ते जमतच नाही. त्यातूनही एक सुबत्ता अशीही आहे, की आमच्या घराजवळच दररोज ताजी भाजी मिळते. त्यामुळेच अगदी संपेपर्यंत वाट न बघता आदल्या दिवशीच आले, लिंबू, कोथिंबीर आदी नेहमीच्या स्वयंपाकात लागणाऱ्या गोष्टी आणून ठेवण्याची मला सवयच आहे. हे देखील एक 'व्यसन' असल्यामुळे घाईघाईत ऑनलाइन भाजी मागवण्याची वेळ कधीच येत नाही.

सांगायचा मुद्दा असा, की त्या बाईने मला पेरू ऑनलाइन मिळतात असे सांगितले खरे, पण त्याने सुरू झालेला संवाद पुढे मस्त रंगला. त्यात भाजीविक्रेताच नाही तर भाजी घेणारी आणखी एक बाईदेखील सहभागी झाली. ती मूळची कानपूरची होती. पेरूबाबतच्या चर्चेमुळे तिलाही आपल्या भागात मिळणाऱ्या या रसरशीत आणि चविष्ट फळाची आठवण झाली आणि अतिशय अभावितपणे तिने तेथील पेरू किती छान असतात, हे सांगण्यास सुरुवात केली. अगदी आपल्या शाळेबाहेर कसे छानसे 'अमरूद मिळायचे आणि मैत्रिणींसवे तिखट-मीठ लावून खाताना किती मजा यायची हे सांगण्यात ती हरवून गेली. ते सांगताना तिच्या चेहऱ्यावरील रेषा, देहबोली, मनोवस्था बदलल्याचे स्पष्ट दिसत होते. थोडक्यात, त्या संवादाने आमच्या सगळयांच्याच बोलण्यात एकप्रकारचा मोकळेपणा आला. खरे तर मी एका मिनिटात पेरू ऑनलाइन ऑर्डर करू शकले असते, पण त्या एका मिनिटाने त्या बाईला मिळालेला आनंद, शाळेतील गमतीजमती आठवल्याने मिळालेले समाधान ऑर्डर करून नकोच मिळत नाही. असे निर्व्याज क्षण अगदी अनवधानाने, अनाहूतपणे समोर येतात आणि आपल्याला अधिक श्रीमंत करून जातात. म्हणूनच मला अशा क्षणांचे 'व्यसन' आहे. अधूनमधून ही तल्लफ येतेच. एखाद्याशी भरभरून बोलावेसे वाटते आणि कोणी बोलल्यास प्रतिसादही द्यावासा वाटतो. मात्र आधी सांगितल्याप्रमाणे संवादासाठी मी कोणतेही प्रयत्न करत नाही, कारण संवाद सहज असला पाहिजे, असे माझे मत आहे.

**सोनाली कुलकर्णी,**
प्रसिध्द अभिनेत्री

# खंडणीची धमकी

# आमदार साजिद खान पठाण यांची 'Y' श्रेणी सुरक्षेची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

*अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान मन्नान पठाण यांना आंतरराष्ट्रीय कॉलवरून १० कोटी रुपयांची खंडणी न दिल्यास जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर आमदारांनी राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तात्काळ 'Y' श्रेणी सुरक्षा देण्याची मागणी केली आहे.*



आमदार पठाण यांनी दिलेल्या निवेदनानुसार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी साडेतीन वाजता आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून फोन आला. स्वतःला लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचे सांगत शुभम लोणकर नावाच्या व्यक्तीने १० कोटी रुपयांची खंडणी मागितली. रक्कम न दिल्यास 'बाबा सिद्दीकी यांना जसे मारले तसे तुला व तुझ्या परिवारालाही मारू' अशी थेट धमकी दिल्याचा आरोप आमदारांनी केला आहे. त्यानंतर तीन-चार वेळा पुन्हा फोन आल्याचेही त्यांनी नमूद केले.

या घटनेनंतर आमदारांनी तात्काळ अकोला पोलीस अधीक्षकांशी संपर्क साधून १८ फेब्रुवारी रोजी लेखी तक्रार दाखल केली. घटनेची गंभीरता लक्षात घेता त्यांनी केंद्राचे गृहमंत्री अमित शाह यांनाही प्रत पाठविली आहे.

दरम्यान, २३ फेब्रुवारीपासून मुंबईत सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी स्वतःला उपस्थित राहावे लागणार असून, मतदारसंघातील तसेच पक्षाच्या विविध कार्यक्रमांमुळे सातत्याने दौरे करावे लागतात. त्यामुळे स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

राज्य सरकारने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन सखोल चौकशी करावी व 'Y' श्रेणी सुरक्षा त्वरित प्रदान करावी, अशी मागणी आमदार साजिद खान पठाण यांनी केली आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून, राजकीय वर्तुळातही चर्चेला उधाण आले आहे.

### नरनाळ्यात 'निसर्ग महोत्सव'चा जल्लोष

# पीकेव्हीत ५० वर्षांच्या वृक्षांची कत्तल ?

## - निसर्ग संवर्धन घोषणा आणि कृतीत तफावत
## - प्रशासनाची भूमिका गुलदस्त्यात

■ प्रतिनिधी | अकोला ■

एकीकडे जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या संकल्पनेतून मेळघाट परिसरात 'नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवा'चा गाजावाजा सुरू असताना, दुसरीकडे शहराच्या मध्यवर्ती भागातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ (पीकेव्ही) परिसरात ५० ते ६० वर्षे जुन्या वृक्षांची तोड सुरू असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. पर्यावरणप्रेमींकडून या प्रकारावर संताप व्यक्त होत असून, 'निसर्ग संवर्धन'च्या घोषणांमध्ये आणि प्रत्यक्ष कृतीत मोठी तफावत असल्याची चर्चा रंगली आहे.

तक्रारदार गणेश कुरई यांनी जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांकडे पुराव्यासह लेखी तक्रार दिल्याचा दावा केला आहे. त्यांच्या मते, पीकेव्हीमध्ये काही अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली मौल्यवान वयोवृद्ध झाडांची तोड आणि विक्री सुरू आहे. मात्र, प्रशासनाकडून तत्काळ पंचनामा किंवा ठोस कारवाई झालेली नसल्याने संशय अधिकच गडद होत आहे. तर दुसरीकडे विद्यापीठाचे कुलगुरू शरद गडाख यांच्याकडेही या प्रकरणाची माहिती देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. तरीही अद्याप कोणतीही ठोस शिस्तभंग कारवाई झालेली नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यापीठ प्रशासनाने या आरोपांवर अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही. दरम्यान, प्रशासनाकडून अधिकृत खुलासा येणे बाकी असून, या प्रकरणाची सखोल चौकशी होणार का ? की हे गंभीर प्रकरण तसेच दडपले जाणार याबाबत नागरिकांमधील उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

**'निलगिरी'च्या आडून डाव?**

दरम्यान, निलगिरीची झाडे तोडण्याच्या परवानगीसाठी वनविभागाकडे अर्ज सादर केल्याची माहिती समोर येत आहे. पर्यावरणप्रेमींचा आरोप आहे की, निलगिरीच्या नावाखाली इतर मौल्यवान वयोवृद्ध वृक्ष तोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. कागदपत्रांमध्ये 'बॅक डेटिंग'चा वापर करून प्रक्रिया वैध ठरवण्याचा डाव असल्याचाही आरोप केला जात आहे. या संदर्भात वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून अधिकृत स्पष्टीकरण मिळू शकलेले नाही.

**महोत्सव की दिखावा?**

नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवात निसर्ग संवर्धनाचे संदेश दिले जात असताना, शहरातीलच वृक्षतोडीकडे दुर्लक्ष होत असल्याचा सवाल पर्यावरणप्रेमी उपस्थित करत आहेत. 'जर प्रशासन खरोखरच निसर्ग संवर्धनाबाबत कटिबद्ध असेल, तर पीकेव्हीतील वृक्षतोड तात्काळ थांबवून दोषींवर कारवाई करावी,' अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

**प्रशासनाची भूमिका महत्त्वाची**

जिल्हा वृक्ष प्राधिकरण समितीच्या अध्यक्ष या नात्याने जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याकडून या प्रकरणात स्पष्ट भूमिका अपेक्षित आहे. आरोपांमध्ये तथ्य असल्यास कठोर कारवाई होणार का, की हा वाद केवळ आरोप-प्रत्यारोपांपुरताच मर्यादित राहणार, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.

### जुने शहर पोलीस स्टेशनची धडाकेबाज कारवाई

# घरफोडीचा गुन्हा उघड; तब्बल २१.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

सागर कॉलनी, वाशिम बायपास परिसरातील घरफोडी प्रकरणाचा छडा लावत जुने शहर पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत तब्बल २१ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका तरुणीसह चौघांना अटक करण्यात आली असून सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे.



याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर कॉलनी येथे राहणाऱ्या नेहा राजेश सावदेकर (वय ३०) यांनी १३ फेब्रुवारी रोजी तक्रार दिली होती. १२ फेब्रुवारी रोजी दुपारी घरासमोर कामानिमित्त गेल्या असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरातून सुमारे १३८ ग्रॅम सोन्याचे दागिने व ९० हजार रुपये रोख असा ऐवज लंपास केला होता. यामध्ये नेकलेस, अंगठ्या, चेन, पोत, ब्रेसलेट आदी दागिन्यांचा समावेश होता.

गुन्ह्याच्या प्राथमिक तपासात कोणताही ठोस तांत्रिक पुरावा हाती लागला नव्हता. मात्र संशयितांच्या हालचालींवर पोलिसांनी बारकाईने लक्ष ठेवत तपासाची सूत्रे फिरवली. गोपनीय माहितीनुसार ही चोरी समीक्ष गवई हिने आपल्या जुन्या प्रियकर ऋतिक श्रृंगारे व त्याच्या मित्रांच्या मदतीने केल्याचे उघड झाले. चोरीचा मुद्देमाल लपवण्यासाठी तो चिवचिव बाजार परिसरात सुपूर्द केल्याची माहिती मिळताच पोलिसांनी अमरावती येथे सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले.


चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून अंदाजे २१ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने व ५० हजार रुपयांची दुचाकी असा एकूण २१.५० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी समीक्ष अनिल गवई (१९), वैभव संजय गोपनारायण (२३), ऋतिक अजाबराव श्रृंगारे (२२) व समीर प्रदीप तेलखडे (१९) यांना अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात तपास पथकाने केली. अल्पावधीत गुन्हा उघडकीस आणत मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले असून परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

## श्री दुर्गादेवी संस्थानची पायदळ वारीला प्रतिसाद

**शिवर :** श्री दुर्गादेवी संस्थान शिवर यांच्या विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शिवर ते शेगाव पायदळ वारीला २१ फेब्रुवारी २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात शेगाव करीता रवाना झाली. शिवर येथील जागृत श्री दुर्गादेवी मंदिरातील श्री दुर्गादेवी मुर्तीचे तसेच श्री गजानन महाराजांच्या मूर्तीचे विधिवत पूजन व सामूहिक आरती करून वारीची सुरुवात करण्यात आली.

## संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त उद्या भव्य त्वचारोग तपासणी शिबीर



### गरजू रुग्णांनी चर्मरोग तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा : डॉ. अतुल सिंघानिया

■ प्रतिनिधी | अकोला ■

संत गाडगेबाबा आरोग्य सेवा अभियानाच्या वतीने गेल्या २५ ते ३० वर्षापासून व्यसनमुक्ती प्रचारक तथा संत गाडगेबाबा आरोग्य सेवा अभियानाचे प्रमुख रामकृष्ण डोंगरे यांच्या वतीने विविध रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून आतापर्यंत हजारो रुग्णांनी मोफत तपासणी' मोफत औषधी उपचाराचा लाभ घेतला आहे संत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधून सोमवार २३ फेब्रुवारी रोजी भव्य चर्मरोग तपासणी शिबीरा चे आयोजन केलेले आहे शिबिरामध्ये अकोला येथील चर्मरोग विशेषतज्ञ डॉ. अतुल सिंघानिया, M.B.B.S., (Nagpur) D.V. & D (Mumbai) Skin Specialist Leprologist & Cosmetologist चर्मरोग, गुप्तरोग, कुष्ठरोग तज्ञ व सौंदर्य तज्ञ हे गेल्या ३० वर्षापासून रुग्ण सेवा देत असल्यामुळे आयोजित केलेल्या शिबिरामध्ये रुग्णांची तपासणी करतील. या शिबिरामध्ये केस गळणे, पाढरे केस, डोक्यावरील कोंडा, कमी वयात केस पांढरे होणे, चेहऱ्यावरील काळे डाग, मुरूम (तारुण्यपिटीका), डोक्यावरील केसांचा समुळ नाश, उंद्री, खाज, खरुज, गचकरण, नायटा, सुरमी, इसबगोल (एक्झीमा) सोरायसीस (जळवात), लिकेन प्लेनस, वांग, अंजूत, सिफीलीस, परमा इत्यादी गुप्तरोगांवर तसेच ॲलर्जी टे मस, कुरुप पांढरे डाग (कोड), व लैंगिक समस्या इत्यादी आजाराच्या रुग्णांनी या भव्य चर्मरोग तपासणी शिबीर लाभ घ्यावा. सदरची तपासणी ही नाव नोंदणी झालेल्या रुग्णांना तपासणीमध्ये ५०टक्के सूट देण्यात येईल. नाव नोंदणी करिता संत गाडगेबाबा आरोग्य सेवा अभियानाचे प्रमुख रामकृष्ण डोंगरे मो. ९०२१२१५९३५ यांच्याशी संपर्क साधावा.

## ग्रामीण आयुर्वेदिक महाविद्यालयात शिवजयंती उत्सव उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | पातूर ■

डॉ.वंदनाताई ग्रामीण आयुर्वेदिक महाविद्यालय येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

डॉ.राहुल पाटील एज्युकेशनल कॅम्पस अंतर्गत डॉ.वंदनाताई जगन्नाथराव ढोणे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य व प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून श्री धनेश्वरी मानव विकास मंडळ चे संस्थापक अध्यक्ष मा.डॉ.वेद प्रकाश पाटील साहेब उपस्थित होते.त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रमास विशेष उंची प्राप्त झाली. कार्यक्रमास डॉ.साजिद शेख,डॉ.जयश्री काटोले, डॉ.अभय भुस्कळे यांची मान्यवर उपस्थिती लाभली. आपल्या भाषणामध्ये मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य कसे उभारले , रयतेसाठी कशाप्रकारे न्यायनिष्ठ व लोकाभिमुख प्रशासन उभे केले यावर सविस्तर प्रकाश टाकला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्म,जात, शपात यांचा भेदभाव न करता 'रयत हाच माझा धर्म' ही भूमिका स्वीकारली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या त्या काळातील साधनांचा कुशलतेने वापर करून,गनिमी कावा,जलद दळणवळण व्यवस्था,सशक्त गड-किल्ल्यांची बांधणी व सक्षम आरमार उभारून मुघल साम्राज्याला कशी मात दिली याचे प्रभावी विवेचन करण्यात आले.

# अकोला आरोग्य विभागात दुजाभाव?

## 'नंबर वन' रुग्णालयाचे शिल्पकार डॉ. पाटील बाजूला तर डॉ. वारे यांना वरिष्ठ पदावर नियुक्ती

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने १३ फेब्रुवारी रोजी काढलेल्या आदेशानुसार अकोल्याचे तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे आणि जिल्हा स्त्री रुग्णालयाचे तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ. जयंत पाटील यांचे निलंबन रद्द करण्यात आले. मात्र, या पुनर्नियुक्तीतील निर्णयांवरून आरोग्य विभागात दुजाभाव झाल्याची चर्चा रंगली आहे.*

*उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्याला दुय्यम पदावर पाठवण्यात आले, तर वादाच्या भोवऱ्यात असलेल्या अधिकाऱ्याला वरिष्ठ कार्यालयात नियुक्ती देण्यात आल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.*

राजकीय किंवा प्रशासकीय दबावामुळे कार्यक्षम अधिकाऱ्याला दुय्यम स्थान दिले गेले का, याची चौकशी व्हावी, अशी मागणीही पुढे येत आहे. आरोग्य विभागाने या प्रकरणात पारदर्शकता ठेवून भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**'नंबर वन' कामगिरी, तरीही उपेक्षा**

जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला (लेडी हार्डिंग) येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्यरत असताना डॉ. जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली रुग्णालयाने उत्कृष्ट रुग्णसेवेच्या जोरावर राज्यात प्रथम क्रमांक पटकावल्याची नोंद आहे. त्यांच्या कार्यकाळात रुग्णालयात अनेक सुधारणा उपक्रम राबविण्यात आले होते. तथापि, निलंबन मागे घेतल्यानंतर त्यांना पुन्हा त्याच पदावर पुनर्नियुक्ती न देता बुलढाणा येथील प्रशिक्षण केंद्रात 'वैद्यकीय अधिकारी' म्हणून बदली देण्यात आली आहे. त्यांच्या कार्यकाळाबाबत कोणतीही गंभीर तक्रार नसतानाही घेतलेला हा निर्णय अकोल्यासाठी तोट्याचा असल्याची भावना आरोग्य वर्तुळात व्यक्त होत आहे.

**डॉ. वारेंना वरिष्ठ पदावर नियुक्ती**

दुसरीकडे, तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे यांचा 'सिव्हिल सर्जन' म्हणून कार्यकाळ पूर्ण झालेला होता. त्यांच्या कार्यकाळातील काही प्रकरणांबाबत विभागीय चौकशी सुरू असल्याची माहिती आहे. असे असतानाही शासनाने त्यांची अकोला मंडळाच्या आरोग्य उपसंचालक कार्यालयात 'सहायक संचालक (वैद्यकीय)' या वरिष्ठ पदावर नियुक्ती केली आहे. या पार्श्वभूमीवर 'निकष समान होते का?' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**लेडी हार्डिंगचा कारभार प्रभारींकडे**

दरम्यान, जिल्हा स्त्री रुग्णालयाचा कारभार सध्या प्रभारी अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. नियमानुसार वैद्यकीय अधीक्षक पदासाठी विशिष्ट पात्रता आवश्यक असते. मात्र, प्रभारी नियुक्तीबाबतही नियमांची पायमल्ली झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. रुग्णालयातील नियोजनाचा अभाव, कर्मचाऱ्यांवर दबाव आणि प्रशासनातील अनियमितता यामुळे रुग्णसेवेवर परिणाम होत असल्याची चर्चा आहे.

**समान न्यायाची मागणी**

निलंबन रद्द करताना दोन्ही अधिकाऱ्यांच्या कामगिरीचा आणि पात्रतेचा तुलनात्मक विचार झाला का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. उत्कृष्ट कामगिरी करून अकोल्याचे नाव राज्यात गाजवणाऱ्या अधिकाऱ्याला मूळ पदावर पुनर्नियुक्ती देणे आवश्यक होते, अशी मागणी होत आहे.


### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- १६४/२०२५ कलम- १९ दि. ९/०१/२०२६
**सार्वजनिक न्यासाचे नाव -** रमाई बुद्ध विहार चॅरिटेबल ट्रस्ट मंदुरा, ता.मुर्तीजापूर जि. अकोला
**अर्जदार :-** उषा रामराव तेलमोरे मु.मंदुरा पो. रामटेक ता.मुर्तीजापूर जि.अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम , १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** १००१/- रुपये आहे.
**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक ०९/०१/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.



### जाहीर नोटीस
**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३५/२०२६ प्रोसेस नं.२२८३/२०२६
चौ.ता. २७/०३/२०२६ दिनांक : १७/०२/२०२६

**अर्जदार :** १. सुषमाबाई रामदास डहेनकार २. राहुल रामदास डहेनकार ३. चेतन रामदास डहेनकार ४. दिपिका रामदास डहेनकार सर्व रा. माळीपुरा, लक्कडगंज, अकोला. ता. जि. अकोला. ५. पल्लवी केतन पांढरे रा. ४०१, जय आंबेधाम, सी.एच.एस. जनता सोसायटी मार्ग, हनुमान मंदिर जवळ, रायगड चौक, घाटकोपर, ईस्ट, मुंबई, ता. जि. मुंबई.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामदास ओंकारआप्पा डहेनकार
**पत्ता :-** रा. माळीपुरा, लक्कडगंज, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामदास ओंकारआप्पा डहेनकार यांचे दि. २०/०१/२०२६ रोजी ओझोन मल्टिस्पेशालिस्ट हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ८४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ०२/२०२६ कलम- १९ दि. २३/०१/२०२६
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** श्रीकृष्ण मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट, पुनोती बु. ता. बार्शीटाकळी, जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. अविनाश कृष्णराव कावळे रा. मु.पो.एल ४०३, चंद्रेश ओयासीस, लोढा हेवन, कल्याणशिळ रोड, निळजे गाव,डोंबिवली,इस्ट,कल्याण, निळजे, ठाणे.

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन):-** रोख रक्कम रु.१००१/- श्री. अविनाश कृष्णराव कावळे ताब्यात आहे. **आ) स्थावर मिळकत (वर्णन):-** काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकाला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- २३/०१/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.



### चौकशीची जाहिर नोटीस
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ०२/२०२६ कलम- १९ दि. २३/०१/२०२६
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** श्री. वेताळ बाबा गौरक्षण संस्थान ट्रस्ट भटोरी, ता.मुर्तीजापूर जि. अकोला
**अर्जदार :-** सौ.मंगला रमेश कावरे रा.मु.पो.भटोरी,ता.मुर्तीजापूर जि.अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ )वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन):-** रोख रक्कम रु.१००१/- सौ. मंगला रमेश कावरे ताब्यात आहे.
**आ) स्थावर मिळकत (वर्णन):-** काही नाही.

ञ्सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- २३/०१/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.



### जाहीर नोटीस
**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २०२/२०२६ प्रोसेस नं.१७६४/२०२६
चौ.ता. २७/०३/२०२६ दिनांक : ०९/०२/२०२६

**अर्जदार :** १ सुमन लक्ष्मण सोळंके रा. गोणापूर, पो. दापुरा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. उज्वला लालमन सोळंके २. सोनी लालमन सोळंके ३. सुमीत लालमन सोळंके ( अज्ञान पालक अर्जदार क. २ व ३ करीता नोटीस घेणार क. १ ) तिघेही रा. गोणापूर, पो. दापुरा, ता. जि. अकोला
**मयताचा पत्ता :-** मयत : लालमन लक्ष्मण सोळंके
**पत्ता :-** रा. गोणापूर, पो. दापुरा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लालमन लक्ष्मण सोळंके यांचे दि. २४/११/२०२५ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# बोर व्याघ्र प्रकल्पमध्ये दुर्मिळ काळा बिबट

## पेट्रोलिंगदरम्यान कर्मचाऱ्यांना दर्शन; 'मेलॅनिझम'मुळे गडद रंग, वनविभागाची दक्षता वाढली

**सेलू/ जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यातील बोर व्याघ्र प्रकल्प पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. २० फेब्रुवारी रोजी नियमित गस्तीदरम्यान हिंगणी बफर रेंजमधील राहाटी सफारी गेट परिसरात दुर्मिळ काळा बिबट दिसून आल्याने वनविभागात खळबळ उडाली. दाट झाडीमधून अचानक समोर आलेल्या या बिबट्याने काही क्षण परिसरात वावर केला आणि नंतर झाडीत अदृश्य झाला. उपस्थित कर्मचाऱ्यांनी त्याचे छायाचित्र टिपल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



काळा बिबट ही स्वतंत्र प्रजाती नसून 'मेलॅनिझम' या आनुवंशिक वैशिष्ट्यामुळे त्याचा रंग गडद दिसतो. या स्थितीत त्वचेतील वर्णद्रव्य अधिक प्रमाणात असल्याने अंगावर काळसर छटा दिसून येते. महाराष्ट्रात अशा प्रकारचे दर्शन अत्यंत विरळ मानले जाते. त्यामुळे या घटनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.देशातील सर्वात लहान व्याघ्र प्रकल्प म्हणून ओळख असलेल्या बोरमध्ये वाघ, बिबट्या, अस्वल तसेच विविध वन्यजीव मोठ्या प्रमाणात आढळतात. येथे सुमारे २६४ प्रकारचे पक्षी नोंदवले गेले असून मोरांचे थवे, विविध जलपक्षी आणि बॅकवॉटर परिसर पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरतात. विशेष म्हणजे यापूर्वी बोरमध्ये ल्यूसिस्टिक स्वरूपातील अस्वल आढळल्याची नोंद आहे. त्यामुळे जनुकीय वैशिष्ट्यांमुळे दुर्मिळ प्राण्यांचे दर्शन घडणारे ठिकाण म्हणून बोरची ओळख अधिक दृढ होत आहे.दरम्यान, काळ्या बिबटाच्या दर्शनानंतर वनविभागाने संबंधित भागात गस्त वाढवली असून पर्यटकांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. वन्यजीवांच्या सुरक्षिततेसह पर्यटकांच्या सुरक्षेलाही प्राधान्य दिले जात आहे. या दुर्मिळ घटनेमुळे बोर व्याघ्र प्रकल्पातील जैवविविध्य पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून वनप्रेमींमध्ये उत्सुकता वाढली आहे.

# मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट आणि कचरा

## नगरसेवक यशवंत झाडे भडकले न.प. प्रशासनावर

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा नगरपालिकेची प्रथम सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली, ज्यात शहरातील मोकाट कुत्रे, जनावरांचा वाढता सुळसुळाट, कचरा व्यवस्थापनातील ढिसाळपणा आणि कंत्राटी कामगारांच्या समस्यांवर जोरदार चर्चा झाली. प्रभाग क्र. १३ चे नगरसेवक यशवंत झाडे यांनी प्रशासनाला धारेवर धरत त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली.

नगरसेवक झाडे म्हणाले की, शहरात शेकडो नागरिकांना कुत्र्यांच्या चाव्यामुळे अँटीरेबीज लस घ्यावी लागली. धावत्या वाहनावर कुत्रे झेपावल्यामुळे अपघातही होत आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मोकाट कुत्र्यांसाठी शेल्टर होम उभारून त्यांना तिथे ठेवावे. नसबंदी झालेल्या कुत्र्यांच्या कानावर व्ही चिन्ह किंवा टॅग लावून त्याची नोंद ठेवल्यास अधिक पारदर्शकता राहील.मोकाट जनावरांना पकडून कोंडवाड्यात ठेवावे; ठराविक मुदतीत मालकाने जनावर नेले नाही तर लिलाव करावा, अशी मागणी झाडे यांनी केली. घरगुती पाळीव कुत्र्यांसाठी नगरपालिकेचा परवाना अनिवार्य करावा, असेही ते म्हणाले.कचरा व्यवस्थापनावर टीका करत झाडे म्हणाले, घंटागाडी आणि कचरा उचल कंत्राटदारांची मनमानी सुरू असून त्यामुळे शहर 'कचरामय' झाले आहे. यावर त्वरित कार्यवाही करावी. तसेच बांधकाम मंजुरी प्रकरणे आणि फेरफार अर्ज विहित मुदतीत निकाली काढावीत, अशी मागणीही त्यांनी केली.कंत्राटी कामगारांच्या हक्कांबाबत झाडे म्हणाले, किमान वेतनानुसार पगार द्यावा, प्रॉव्हिडंट फंडाचा संपूर्ण भरणा झालेला असावा. कंत्राटदाराचा भाग न भरल्यास देय बिल मंजूर करू नये. मुख्याधिकारी यासाठी जबाबदार आहेत.सभेत मुख्याधिकारी विजय देशमुख यांनी सांगितले की, २०० कुत्र्यांची नसबंदी कंत्राटी मार्गाने झाली असून पुढील कारवाई पारदर्शक पद्धतीने पार पाडली जाईल. कंत्राटी कामगारांचे वेतन, पीएफ तसेच बांधकाम मंजुरी नियमांनुसार निकाली काढली जातील. नगरसेवक झाडे यांचे मागण्या नगरसेवक प्रशांत बुर्ले, संतोष ठाकुर, राखी पांडे, पवन राऊत, दिपीका आडेपवार, प्रफुल शर्मा यांनी समर्थन केले. सभेत नागरिकांच्या हितासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलण्याची गरज असल्याचे अधोरेखित झाले.

# शिवजयंती शोभायात्रेत वादातून हल्ला

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

शिवजयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेदरम्यान झालेल्या धकाबुकीतून उद्धवलेल्या वादाचे रुपांतर हल्ल्यात झाले. या घटनेत १७ वर्षीय युवक गंभीर जखमी झाला असून, एका अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही घटना गुरुवारी (दि. १९) रात्री साडेदहाच्या सुमारास शहरातील एचडीएफसी बँकेजवळील मुख्य मार्गावर घडली.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शहरात विविध ठिकाणी उत्साहात कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. डीजेच्या तालावर तरुणाई जल्लोषात सहभागी झाली होती. दरम्यान, नाचताना झालेल्या धकाबुकीवरून दोन गटांत किरकोळ वाद निर्माण झाला. हा वाद काही वेळातच तीव्र झाला आणि त्यातून शिवम राजू दाभणे (१७, रा. तेलंगखडी) याच्यावर कटरने वार करण्यात आले.हल्ल्यात शिवमच्या चेहरा व कानावर गंभीर जखमा झाल्या. रक्तबंबाळ अवस्थेत त्याला तत्काळ स्थानिक उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्याला महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्था, सेवाग्राम येथे हलविण्यात आले.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे. उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त ठेवला होता. मात्र, या घटनेमुळे शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

### विदर्भात विचारांची रणधुमाळी

# शिवजन्मोत्सवी वादविवाद स्पर्धेला प्रतिसाद; आधार फाउंडेशनचा उपक्रम

## प्रथम वेदांत भोयर, द्वितीय मजीद बेग मुगल, तृतीय कल्याणी चांदेकर

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

हिंदवी स्वराज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवजन्मोत्सवाच्या पावन पर्वावर आधार फाउंडेशनतर्फे आयोजित विदर्भस्तरीय वादविवाद स्पर्धा उत्साहात पार पडली. नंदोरी रोड येथील साई मंदिर सभागृहात भरलेल्या या स्पर्धेत नागपूर, अमरावती, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ आदी जिल्ह्यांतील विद्यार्थी व युवक-युवतींनी दमदार सहभाग नोंदवत विचारांची चुरस रंगवली.

कार्यक्रमाची सुरुवात शिवप्रतिमेचे माल्यार्पण व दीपप्रज्वलनाने झाली. संस्थापक



अध्यक्ष अतुलभाऊ वांदिले अध्यक्षस्थानी होते, तर पोलीस निरीक्षक अनिल राऊत यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कार्यकारी अध्यक्षा माधुरी विहीरकर, सचिव सुनील डांगरे तसेच विविध शैक्षणिक संस्थांचे संचालक मान्यवर उपस्थित होते.नैतिक नेतृत्वाचा अभाव आजच्या समाजातील मोठी समस्या आहे, नाही या विषयावर स्पर्धकांनी समर्थ, अभ्यासपूर्ण आणि परखड मांडणी केली. मुद्देसूद युक्तिवाद, ऐतिहासिक दाखले आणि वर्तमानकालीन संदर्भ यामुळे सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.स्पर्धेत प्रथम क्रमांक वेदांत भोयर यांनी पटकावला, द्वितीय मजीद बेग मुगल तर तृतीय कल्याणी चांदेकर ठरल्या. प्रोत्साहनपर पारितोषिक साहिल फटिंग व श्रावणी अंबुलकर यांना देण्यात आले. विजेत्यांना रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.परीक्षक म्हणून ॲड. इब्राहिम बख्श व प्रा. अभय दांडेकर यांनी तटस्थ परीक्षण केले. शिवरायांचे नेतृत्व आजच्या तरुणाईसमोर आदर्श ठरावे, असे मत अतुल वांदिले यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गिरीधर काचोळे यांनी केले, तर आभार सुहास घिनमीने यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशासाठी फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# आज तरोडा येथे विशाल हिंदू संमेलन

**वर्धा/ जनमाध्यम**

तरोडा नगरी आज हिंदू ऐक्याच्या घोषणांनी दुमदुमणार आहे. सकल हिंदू समाज तरोडा यांच्या वतीने आयोजित भव्य हिंदू संमेलन आज, रविवारी सायंकाळी ५ वाजता बाजार चौकात पार पडणार आहे. परिसरात सकाळपासूनच तयारीची लगबग सुरू असून व्यासपीठ उभारणी आणि सजावटीचे काम पूर्णत्वाकडे गेले आहे. सनातन संस्कृतीचा अभिमान आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्यासाठी या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील विविध घटकांनी एकत्र येत संघटित शक्तीचे दर्शन घडवावे, असा आयोजकांचा मानस आहे.या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ संलग्न लोककल्याण समिती, नागपूरचे सचिव माधव उराडे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच राजेश शेंडे (हिंगणघाट), कुमार पाटेकर महाराज (सास्ताबाद) आणि भवानी माता देवस्थान साकुर्लीचे अध्यक्ष बाबाराव चौधरी यांचीही उपस्थिती राहणार आहे.सर्व हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संमेलन यशस्वी करावे, असे आवाहन सकल हिंदू समाज तरोडा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गजानन महाराज मंदिर प्रकरणात राजकीय वळण

## घटना जुनी, निर्णय आधीच पार पडला - मोहनबाबू अग्रवाल

**वर्धा/ जनमाध्यम**

श्री संत गजानन महाराज मंदिराचे अध्यक्ष मोहन बाबू अग्रवाल यांनी शालीग्राम टिबडीवाल यांना संस्थेतून हटवण्याच्या निर्णयावर स्पष्ट वक्तव्य केले आहे. अध्यक्षाच्या मते, ही घटना आता जुनी झाली असून संबंधित निर्णयावर आधीच पांघरून घालून पार पडला आहे. मंदिराच्या कार्यकारी मंडळाने बहुमताने हा निर्णय घेतला होता, ज्यामध्ये मंदिराच्या हितासाठी आणि भक्तांच्या भावना जपण्यासाठी योग्य ती कारवाई करण्यात आली.

मात्र, काही लोक या प्रकरणावर राजकारण करत असल्याच्या चर्चांना चालना देत आहेत. मंदिरावर राजकीय वळण देण्याचा प्रयत्न कोणत्या हेतूसाठी केला जात आहे, हे सध्या कोडेच राहिले आहे.मोहनबाबू अग्रवाल यांनी जनमाध्यम शी बोलताना सांगितले की, संस्थानातील सर्व निर्णय धार्मिक आणि भक्तांच्या हितासाठी घेतले जातात; राजकारणाचा या ठिकाणी काहीही संबंध नाही.टिबडीवाल यांनी मुकूटासाठी दिलेली १ किलो ९०० ग्रॅम चांदी परत न केल्याने कार्यकारी मंडळाने कठोर कारवाई केली. एक वर्षानंतर त्यांनी १ किलो २०० ग्रॅम चांदी परत केली, मात्र ही कृती मंडळाच्या निर्णयाच्या विरोधी ठरली आणि भक्तांच्या भावनांना दुखावणारी मानली गेली. त्यामुळे टिबडीवाल यांना कार्यकारी मंडळातून बाहेरचा रस्ता दाखवला गेला.स्थानिक भक्त आणि सामाजिक मंडळी म्हणतात, धार्मिक स्थळांचे राजकारण करणे अनैतिक आहे, मंदिरातील शांतता आणि भक्तांचा विश्वास जपणे आवश्यक आहे. चर्चांच्या राजकीय पोकळवट्यामुळे मंदिराची प्रतिष्ठा धोक्यात येऊ नये, यासाठी प्रशासन आणि कार्यकारी मंडळ सतर्क आहे.मंदिराचे अध्यक्ष मोहन बाबू अग्रवाल, सचिव ज्ञानेश्वर पहाडे, कोषाध्यक्ष व्यास, संचालक शेखर शेंडे, डॉ. नारायण निकम व मधुसूदन अग्रवाल यांनी या निर्णयात सहभागी होऊन भक्तांच्या हितासाठी ठोस पावले उचलली आहेत.

**NAME IN CHANGE**

My Old Name as per Passport is **Taukir Makbool Chini** and My New Name as per Aadhar and PAN is **Tauvkir Makbool Chini**, Address: Wardha-442001

**NAME IN CHANGE**

My Old Name as per Passport is **Tanjim Makbulbhai Chini** and My New Name as per Aadhar and PAN is **Tanjim Makbool Chini**, Address: Wardha-442001

**NAME IN CHANGE**

My Old Name as per Passport is **Makbulhusen Anwar Chini** and My New Name as per Aadhar and PAN is **Makbool Haji Anwar Chini**, Address: Wardha-442001

# उच्चशिक्षित तरुण एलसीबीच्या जाळ्यात

**वर्धा/ जनमाध्यम**

शहरातील बेद ले-आऊट परिसरात घडलेल्या घरफोडीप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने वेगवान कारवाई करत एका तरुणास अटक केली. आरोपीकडून सोन्या-चांदीचे दागिने व मोबाईल असा एकूण ६ लाख ५७ हजार १९८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आशिष श्रीनिवास रेड्डीमल्ला (वय २६, रा. चंद्रपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. बेद ले-आऊट येथील रहिवासी रोमा अरुण पटले यांच्या घरातून अज्ञात चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने असा सुमारे ३ लाख ४४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. गोपनीय माहितीच्या आधारे संशयिताला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीकडून ४८.८५० ग्रॅम वजनाचा पिवळ्या धातूचा लगड, ५१.८५० ग्रॅम वजनाच्या दोन जोड पांढऱ्या धातूच्या पायल्या व एक मोबाईल असा एकूण ६ लाख ५७ हजार १९८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.जुगाराच्या व्यसनातून घडली घरफोडी आरोपी उच्चशिक्षित असून तो चंद्रपूर येथे एम.टेकचे शिक्षण घेत आहे.

# डाळ मिल कार्यालय फोडले १.०६ लाखांचा ऐवज लंपास

## आजंती एमआयडीसीत सलग चोरींनी भीतीचे सावट

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

आजंती एमआयडीसी परिसरातील डाळ मिलच्या जुन्या कार्यालयात अज्ञात चोरट्याने शटर फोडून १ लाख ६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे औद्योगिक परिसरात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

श्री साई कृपा इंडस्ट्रीज येथील जुन्या कार्यालयाचे शटर उचकटून चोरट्याने आत प्रवेश केला. टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली १ लाख रुपयांची रोख रक्कम तसेच सुमारे ६० ग्रॅम वजनाची चांदीची साईबाबांची मूर्ती आणि ३५ ग्रॅम वजनाची श्री गणेशाची मूर्ती चोरून नेण्यात आली. चोरीची घटना लक्षात येताच रिकेश दीपक दुब्बानी (रा. सिंदी कॉलनी) यांनी हिंगणघाट पोलिस ठाणे येथे तक्रार नोंदविली.दरम्यान, माऊली पार्क परिसरातील डी-मार्टजवळील साई एजन्सी'चे शटर तोडल्याची घटनाही उघडकीस आली, मात्र तेथून कोणताही ऐवज चोरीस गेला नसल्याचे सांगण्यात आले.औद्योगिक व व्यापारी भागात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. संबंधित परिसरात पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी व्यापाऱ्यांकडून होत आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# तिरळे कुणबी समाजाचा उपवधू परिचय मेळावा

**पुलगाव/ जनमाध्यम**

स्थानिक पुलगाव येथे तिरळे कुणबी समाज सेवा संघ यांनी विदर्भस्तरीय उपवधू परिचय मेळावा आयोजित केला. याच कार्यक्रमात उपवधू परिचय पुस्तकाचे विमोचन देखील करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होता, मेळावा पार्श्वनाथ मंगल कार्यालय येथे झाला.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष सारंग ढोक (लायन्स क्लब, नागपूर), प्रमुख पाहुणे म्हणून खा.अमर काळे, नगराध्यक्षा कविता ब्राह्मणकर, तसेच दिलीप अग्रवाल, पुंडलिक पांडे, रुपराव ठाकरे (धामणगाव), प्रशांत डफळे, अमर घारफरकर, दामोदर ठाकरे, कृष्णाभाऊ इंगळे (भद्रावती), सुरेश गणेशपुरे आणि विधी सल्लागार छाया धांदे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. प्रास्ताविकात समाजसेवा संघाचे अध्यक्ष प्रशांत डफळे यांनी मागील पंधरा वर्षातील संघाच्या कामकाजाचा अहवाल सादर केला आणि पुढील वर्षी किमान पाच दांपत्यांचा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला.उपवधू परिचय पुस्तकाचे विमोचन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उपवधू परिचय पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.

यावेळी समाजकार्याला मदत करणाऱ्या विविध व्यक्तींना व संस्थांना सत्कार करण्यात आला. यात देवेन्द्र हर्षे, सुरेश गणेशपुरे, गजानन सरदार, कुणाल काळे, संदीप बोरकुटे, स्वप्नील येवले, सचिन चौधरी यांचा समावेश होता.सत्काराला उत्तर देताना कविता ब्राह्मणकर यांनी संघाला शुभेच्छा दिल्या आणि पुढील वाटचालीस मार्गदर्शन केले. खासदार अमर काळे यांनी उपवधूंना तडजोड, सामंजस्य व सहनशीलतेचा मार्ग सांगितला तसेच पुलगावमध्ये समाजमंदिर उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. अध्यक्षीय भाषणात सारंग ढोक यांनी कुणबी समाजातील वर्तमान परिस्थितीवर प्रकाश टाकला आणि समाजबांधवांना मार्गदर्शन केले. यानंतर मोठ्या संख्येने उपस्थित उपवधूंनी आपापला परिचय दिला. आभार प्रदर्शन सेवा संघाचे कार्याध्यक्ष प्रशांत कुडे यांनी केले, तर सूत्रसंचालन सौ. स्वाती विजय गोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संघाचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले.मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला, ज्यामध्ये समाजातील युवक, महिला आणि वरिष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे नवे नियम

## सौर ग्राहकांमध्ये संभ्रम; 'झिरो बिल'च्या गणितावर परिणाम

**सेलू/ अभय बेदमोहता**

राज्यात सौर ऊर्जेला प्रोत्साहन देण्याच्या धोरणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितने १३ फेब्रुवारी २०२६ पासून लागू केलेल्या नव्या नियमांमुळे सौर ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. नव्या अटींमुळे सौर प्रकल्प उभारणीचे आर्थिक गणित बदलण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

महावितरणच्या निर्णयानुसार सौर प्रकल्पाची क्षमता आता ग्राहकाच्या गरजेनुसार न ठरता कंपनीच्या निकषांवर निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे इच्छेनुसार अधिक क्षमतेचा प्रकल्प उभारून अतिरिक्त वीज निर्मिती करण्याचा पर्याय मर्यादित झाला आहे. पूर्वी ग्रीडमध्ये अतिरिक्त वीज दिल्यास त्याचा लाभ मिळत होता, मात्र नव्या नियमानुसार त्यावर दंडात्मक आकारणी होण्याची तरतूद करण्यात आली आहे.नवीन सौर कनेक्शनसाठी मागील एका वर्षाचा वीज वापर अनिवार्य केल्याने नव्याने घर किंवा उद्योग सुरू करणाऱ्यांसमोर अडचणी उभ्या राहण्याची शक्यता आहे. तसेच व्यावसायिक (कमर्शियल) मीटरधारकांसाठी



मर्यादा घालण्यात आल्याची माहिती आहे.सेलू तहसील सोलर असोसिएशनने या निर्णयाबाबत चिंता व्यक्त केली आहे. अनेक मध्यमवर्गीय ग्राहकांनी कर्ज घेऊन सौर प्रकल्प उभारले आहेत. नव्या अटींमुळे त्यांचे अपेक्षित बचतीचे सौर ऊर्जेच्या लाभावर काही गणित बदलू शकते. तसेच या क्षेत्रात कार्यरत असलेल्या तरुण उद्योजकांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे, असे असोसिएशनच्या प्रतिनिधींनी सांगितले.दरम्यान, राज्य सरकारच्या सौर ऊर्जाविषयक धोरणाशी सुसंगतपणे नियमांचा पुनर्विचार व्हावा, अशी मागणी करण्यात येत आहे. महावितरणकडून या निर्णयामागील उद्देश आणि अंमलबजावणीबाबत अधिकृत स्पष्टीकरण अपेक्षित आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ८७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# थकीत कर वसुलीसाठी महानगरपालिका-मजीप्राचा ऐतिहासिक करार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील थकीत महसूल वसुलीला गती देण्यासाठी अमरावती महानगरपालिका आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) यांच्यात महत्त्वपूर्ण करार करण्यात आला. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या करारावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले. अमरावती शहरात पाणीपुरवठा व्यवस्था पाहणारी एजन्सी म्हणून मजीप्रा कार्यरत असून, त्यानुसार महसूल वसुली प्रभावी करण्यासाठी हा संयुक्त उपक्रम राबविण्यात येत आहे.



महानगरपालिकेकडे मालमत्ता कराची तर मजीप्राकडे पाणीपट्टीची मोठ्या प्रमाणात थकबाकी प्रलंबित आहे. या अवाढव्य थकबाकीच्या प्रभावी वसुलीसाठी दोन्ही संस्थांनी संयुक्त कारवाईचे धोरण निश्चित केले आहे. करारानुसार, कोणतीही नागरी सेवा घेण्यासाठी संबंधित नागरिकांनी दुसऱ्या विभागाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करणे बंधनकारक राहील. मालमत्ता कर थकीत असल्यास मजीप्रा सेवा देणार नाही, तर पाणीपट्टी थकीत असल्यास महानगरपालिका सेवा रोखू शकते. तसेच मालमत्ता कर थकविणाऱ्या नागरिकांचा पाणीपुरवठा खंडित करण्यासाठी मजीप्रा थेट सहकार्य करेल. संबंधित झोन अधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळाल्याशिवाय पाणीपुरवठा पुन्हा सुरू केला जाणार नाही.

शहरातील अवैध नळजोडण्या आणि कर न आकारलेल्या मालमत्ता शोधण्यासाठी संयुक्त डिजिटल डॅशबोर्ड तयार करण्यात येणार आहे. कर किंवा पाणीपट्टी न भरणाऱ्यांविरुद्ध दोन्ही संस्था संयुक्तपणे कायदेशीर जप्ती व वसुली कारवाई करतील. महसूल वाढविणे, थकबाकी कमी करणे आणि सेवा वितरणात शिस्त आणणे या उद्देशाने करण्यात आलेला हा संयुक्त करार शहर प्रशासनासाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. प्रशासनाने नागरिकांना तातडीने थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टी भरण्याचे आवाहन केले आहे.

# श्री समर्थ विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती स्थानिक श्री समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक धनंजय पाठक तसेच प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे उपमुख्याध्यापक सचिन देवळे, पर्यवेक्षक मधुसूदन वटक आणि कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सुवर्णा गणोरकर उपस्थित होत्या. मुख्याध्यापक धनंजय पाठक ,उपमुख्याध्यापक सचिन देवळे , पर्यवेक्षक मधुसूदन वटक व वक्त्या सुवर्णा गणोरकर यांच्या हस्ते छत्रपती श्री शिवाजी महाराज तसेच शाळेचे आराध्य दैवत समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

शालेय विद्यार्थिनी पलक कदम , ईश्वरी खसारे यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंग व त्यांच्या कार्याची माहिती आपल्या भाषणातून दिली.



छत्रपती शिवाजीराजे महाराज हे अनन्यसाधारण व्यक्तिमत्वाचे धनी होते. त्यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी सवंगड्यां सोबत रायरेश्वर मंदिरात स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली.धैर्य, जिद्द ,संयम, साहसाद्वारे स्वराज्य स्थापन केले.समर्थ रामदास स्वामी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना जाणता राजा ही उपाधी दिली असे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचा आदर्श आपल्यासमोर ठेवावा असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सुवर्णा गणोरकर यांनी केले. याप्रसंगी शालेय विद्यार्थी राशी रायबोले, परी साखरकर, पलक कदम, वरदा ठाकरे, ईश्वरी खसारे, ईश्वरी सरोदे, पार्थ गणोरकर, रुद्र मरकाम सक्षम डोंगरे, फाल्गुनी जवने, जय गावंड, व एंजल गजभिये यांनी हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा, सक्षम डोंगरे या विद्यार्थ्याने माझ्या राजा रं तसेच शाळेचे पर्यवेक्षक व संगीत शिक्षक मधुसूदन वटक व सुषमा गिरासे यांनी 'वेडात मराठे वीर दौडले सात' हे गीत सादर करून वातावरण निर्मिती केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष धनंजय पाठक यांनी शिवाजी महाराजांचे चरित्र आणि कर्तृत्व सांगत 'वेडात मराठे वीर दौडले सात' या गीताच्या पार्श्वभूमीवर सरसेनापती श्री.प्रतापराव गुजर यांची कथा विद्यार्थ्यांना सांगितली. छत्रपती शिवाजी महाराजांना समर्थांनी 'श्रीमानयोगी' संबोधले होते , ते संबोधन राजांसाठी किती सार्थ होते याचे सहजसोपे विश्लेषण मुख्याध्यापक धनंजय पाठक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले.शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेली भाषणं व गीतांबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे कौतुक केले. शाळेतील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक अमित कापगते यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. मुख्य लिपिक मिलिंद देशपांडे यांच्या मार्गदर्शनात सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी यांनी शिवललकारीने छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाआरती व खाऊवाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन वरदा ठाकरे या विद्यार्थिनीने केले तसेच आभार प्रदर्शन डॉ. मनिषा ठाकरे यांनी केले.कार्यक्रमप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महानगरपालिकेत बाळशास्त्री जांभेकर जयंती साजरी

**अमरावती प्रतिनिधी-** शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी,२०२६ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. या निमित्य मा. महापौर श्रीचंद तेजवाणी यांचे शुभहस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. यावेळी



उपमहापौर सचिन भेंडे, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, गटनेता अविनाश मार्डीकर, गटनेता नाना आमले, गटनेता शेख हमिद शेख वाहेद, गटनेता डॉ. राजेंद्र तायडे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सन्मा. नगरसेवक, सन्मा. नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित

# विभागीय माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**अमरावती/प्रतिनिधीः-** मराठी पत्रकारितेचे जनक, 'दर्पणकार'आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त विभागीय माहिती कार्यालयात आज उपसंचालक (माहिती) अनिल आलुरकर यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी सहायक संचालक (माहिती) विजय राऊत, प्रदर्शन सहाय्यक विश्वनाथ धुमाळ, वरिष्ठ लिपिक सुनील काळे, दिनेश धकाते, छायाचित्रकार मनीष झिमटे, कॅमेरा सहाय्यक कुमार हरदुले, कनिष्ठ लिपिक जयप्रकाश बानाईत, प्रगती कल्पेकर, सिध्दांत गौरखेडे, सुधीर पुनसे, अनिल वाडाणे, स्वप्नील महल्ले, गजानन पवार, दिपाली ढोमणे, कांचन अंधारे आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# कारच्या पैशासाठी वृद्धावर चाकूने हल्ला

## वरुड येथील घटना, ४ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

**वरूड/प्रतिनिधीः-** शहरातील मिरची प्लॉट मध्ये कारच्या उरलेल्या पैशासाठी झालेल्या वादात एका ६० वर्षीय वृद्धावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी अनुराग विश्वनाथ द्विवेदी (वय ६०) यांच्या तक्रारीवरून ४ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार अनुराग द्विवेदी यांनी २०२५ मध्ये धामणगाव गढी येथील आरोपी राजेंद्र पन्नालाल अग्रवाल (वय ६०) यांना आपली स्विफ्ट डिझायर कार विकली होती. आरोपीने वाहन खरेदी करतेवेळी काही पैसे दिले होते. त्यांच्याकडून अजून पैसे घेणे बाकी होते. कारच्या उरलेल्या पैशावरून द्विवेदी यांचा अग्रवाल सोबत वाद झाला.



या वादात आरोपी अग्रवाल ने आपल्या ३ साथी दारांसोबत मिळून द्विवेदीवर चाकूने हल्ला केला. त्यांच्या डोक्यावर चाकूने वार करण्यात आला. यानंतर आरोपींनी त्यांना मारहाण केली आणि फरार झाले. तेथे उपस्थित काही लोकांनी द्विवेदी यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच पोलीस तिथे पोहोचले. पंचनामा करून अनुराग यांचे बयान घेतले. त्यांच्या बयान आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारावर चारही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला आहे.

# जिल्हा माहिती कार्यालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**अमरावती/प्रतिनिधीः-** मराठी पत्रकारितेचे जनक, 'दर्पणकार' आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात आज (दि.२०) अभिवादन करण्यात आले. जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार यांनी आचार्य जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी माहिती अधिकारी अपर्णा यावलकर, वरीष्ठ लिपिक मनोज थोरात, योगेश गावंडे, कनिष्ठ लिपिक कोमल भगत, साजिद शेख आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.



# विभागीय आयुक्तालयात आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती

**अमरावती/प्रतिनिधीः-** मराठी पत्रकारितेचे जनक, 'दर्पणकार', आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज (दि.२०) विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी अपर आयुक्त सुरज वाघमारे, संजय जाधव, उपायुक्त रवींद्र हजारे, संतोष कवडे, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# शनिवारी शारीरिक चाचणीत ६०१ उमेदवार उत्तीर्ण

## -अमरावती ग्रामीण पोलीस भरती प्रक्रिया

**अमरावती/प्रतिनिधीः-**

अमरावती ग्रामीण पोलीस भरती प्रक्रियेअंतर्गत शनिवारी २१ फेब्रुवारी रोजी शारीरिक चाचणीसाठी एकूण २००० उमेदवारांना बोलाविण्यात आले होते. त्यापैकी १२२४ उमेदवार उपस्थित राहिले, तर ७७६ उमेदवार अनुपस्थित होते. उपस्थित उमेदवारांपैकी ११३० जणांनी प्रत्यक्ष शारीरिक चाचणीत सहभाग घेतला. यामधून ६०१ उमेदवार उत्तीर्ण ठरले, तर ५२९ उमेदवार अनुत्तीर्ण घोषित करण्यात आले. याशिवाय शारीरिक मापदंड (मापन चाचणी) दरम्यान ९० उमेदवार अपात्र ठरले. दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेत ४ उमेदवार अपात्र आढळले. भरती प्रक्रिया पारदर्शक व नियमांनुसार पार पाडण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### जाहिरनामा / सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक :- २५४/२०२६ पुढील तारीख २५.०३.२०२६

**पद्मजा व इतर विरूध्द निरंक**

अर्जदार- **1. Padmaja Prabhakar Ghirnikar** Age: 81 yrs, Occ-Housewife R/o Infront of Home Guard Karyalay, Shri Colony Congress Nagar Rukhmini nagar Amravati
**2. Nilima Paresh Deshpande** Age-50 yrs Occ-HouseholdR/o DTPS Nagar Room No. B-04/04, Power Station, Dahanu Road West Thane
**3. Shrikant Prabhakar Ghirnikar** Age-47 yrs Occ-Service R/o Flat no. b-404, Imperial Residence Nagar Road Near Aghakhan Palace Kalyani nagar, Yerwada Pune
**4. Prarthana Vivek Ghirnikar**Age-45 yrs Occ-Service R/o Near Home Guard Karyalay, Shri Colony Congress Nagar Rukhmini nagar Amravati
**5. Shubhra Vivek Ghirnikar** Age-18 yrs Occ-Student R/o Shree Colony Congress Nagar Rukhmini Nagar Amravati
**6. Aarav Vivek Ghirnikar** Age-12 Occ-Student R/o 2/1 Padmaparabha Shree Colony Near Home Guard office Congress Nagar Rukhmini nagar Amravati

**विरुध्द- निरंक- गैरअर्जदार**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत प्रभाकर बाळकष्ण घिरनकर हे दि. ०१.०७. २०१३** रोजी अमरावती, येथे मयत झाले. अर्जदार पद्मजा व इतर विरूध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पद्मजा व इतर विरूध्द** निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १६.०२.२०११ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

### जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकाराने १) सुरेखा चंद्रभान शुक्ला, रा. महेंद्र कॉलनी, अमरावती, २) केशरबाई प्रेमप्रसाद मिश्रा, रा. महेंद्र कॉलनी, अमरावती, ३) ताराबाई चंद्रभान मिश्रा, रा. महेंद्र कॉलनी, अमरावती, ४) शारदा राजेश तिवारी, रा. वार्ड क्र. ३, मानकपुरा, धामणगाव गढी, ता. अचलपूर जि. अमरावती रा. महेंद्र कॉलनी, अमरावती ५) दुर्गा शंभू उपाध्याय, रा. व्ही.एम.व्ही. रोड, अमरावती, ६) मीना भानुप्रसाद तिवारी महेंद्र कॉलनी, अमरावती, ७) गंगाबाई घनश्याम तिवारी रा. महेंद्र कॉलनी, अमरावती, ८) सौ. रेखा प्यारेलाल तिवारी रा. मुर्तीजापूर, अकोला, यांच्याकडून त्यांच्या सामाईक मालकीची व ताब्यातील निम्नवर्णित मालमत्ता, विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचे वर्णन-** **'मौजे - शेगाव, येथील नझुल शिट नं. १७, नझुल प्लॉट नं. ९९५, एकुण क्षेत्रफळ ५०२.५० चौ.मि., व नझुल शिट नं. १८, नझुल प्लॉट नं. ११९६, एकुण क्षेत्रफळ २२०.५० चौ.मि. याची चर्तुसिमा नझुल नकाशाप्रमाणे..'**

वरील मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कुळ, जप्ती, गहाण, बोझा, वारसहक्क, कर्ज, रिझर्वेशन, ताबा, कचेरीवाद, डी.पी. सिमांकीत वाद व हितसंबंध अथवा कोणताही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास ही नोटीस प्रकाशीत झाल्यापासून चौदा (१४) दिवसाचे आत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी अथवा समक्ष भेटावे तसे न केल्यास माझे पक्षकार ठरल्यानुसार खरेदीखत करून घेतील व त्यानंतर कोणताही उजर चालणार नाही.

अमरावती
दिनांक : १९.०२.२०२६

शिक्का

**ॲडव्होकेट. व्ही. जी. लखोटिया,**
डॉ. पारवानी हॉस्पीटलचे बाजुला, बालाजी प्लॉट, अमरावती मोबा : ९४२२१ ५८२४०

### जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि.श्री. आर. आर. सामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,. अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक :-१७०/२०२६ नूरुददीन २ वि निरंक पुढील तारीख ०७.०३.२०२६

अर्जदार-**1-Nooruddin Zakiuddin Holawala** Age-: 66 Years, Occu: Business
**2-Abizar Holawala Nooruddin Holawala** Age: 34 Years, Occu: Business
**3-.Tasneem Norruddin Holawala** Age: 31 Years, Occu: Household
All R/o Kholapuri Gate, Near Bohara Masjid, Nawab Pura, Amravati Tq. and Distt. Amravati

विरुध्द
गैरअर्जदार-NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Arefa Nooruddin Honawala** हे दि. ०५.०८.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Nooruddin Zakiuddin Holawala +2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

तर या त्यापेक्षा **Nooruddin Zakiuddin Holawala +2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १३.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

### जाहीर नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ (RMJC) अर्ज क्र. : २७/ २०२६ नेमलेली तारीख : ०२/०३/२०२६

**चंद्रभागा + २ वि. निरंक**

**१. चंद्रभागा महादेव वाडेकर** रा.वार्ड नं. ३ टेकडीपुरा ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.
**२. निलेश महादेव वाडेकर** रा.वार्ड नं. ३ टेकडीपुरा ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती.
**३. दिगांबर महादेव वाडेकर** रा. वार्ड नं. ३ बुधवारा चौक मुंडनिशांकराव ता. नांदगाव खंडेश्वर

ज्याअर्थी, **मयत आत्माराम सखाराम वाडेकर** यांचा **मृत्यु दि.०९/०६/२०२६** रोजी **मुंडनिशांकराव नांदगाव खंडेश्वर** ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती येथे झाला. तसेच आत्माराम यांचे **पत्नी नामे कृष्णाबाई आत्माराम वाडेकर** यांचा **मृत्यु दि. २३/०५/२००४** रोजी नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती येथे झाला. तसेच **आत्माराम व कृष्णाबाई यांचा मुलगा नामे महादेव आत्माराम वाडेकर** यांचा **मृत्यु दि. ०९/०५/२०२१** रोजी ग्रामीण रुग्णालय नांदगाव खंडेश्वर येथे झाला. मयत आत्माराम व कृष्णाबाई यांचे अर्जदार क्र. १ ही सुन आहे व अर्जदार क्रं २ व ३ हे नातु आहे.. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

आज दिनांक : २९जानेवारी २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

### जाहीरनामा/सायटेशन

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१९९/२०२६
**श्रीमती शिवानी अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२४.०३.२०२६

**अर्जदार :** १. शिवानी श्याम भागडे, वय २६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. रुद्र श्याम भागडे, वय ०३ वर्षे, व्यवसाय - निरंक
अर्जदार नं.१ ही स्वतःकरीता व अ.पा.क.आई म्हणून अर्जदार नं.२ करीता
लग्नापुर्वीचा पत्ता - रा.शिवणगांव, ता.तिवसा, जि.अमरावती
लग्नानंतरचा पत्ता - दोन्ही रा.शंकर नगर, न्यू कॉटन मार्केटजवळ, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत श्याम श्रीराम भागडे** यांचे दिनांक **१८.१२.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार शिवानी अधिक एक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शिवानी अधिक एक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

### जाहीर नोटीस

**वि. २ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर)**
**दर्यापूर अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्जक. १०३/२०२६ ने.ता. २७/०३/२०२६

**अर्जदारः- १.मृणालिनी नंदकिशोर आकोटकर**,वय -४८ वर्ष, व्यवसाय -घरकाम
**२.धनश्री नंदकिशोर आकोटकर**,वय -२३ वर्ष, व्यवसाय -शिक्षण
**३.शुभम नंदकिशोर आकोटकर**, वय -१५ वर्ष, व्यवसाय-शिक्षण
अ.पा.क. आई अ.क्र.१ **मृणालिनी नंदकिशोर आकोटकर**,
अ.क्र.१ ते ३रा.त्रिमुर्ती नगर नागपूर ता.जि. नागपूर
४. सुनंदा मारोतराव आकोटकर वय- ७० वर्ष
व्यवसाय -घरकाम रा. उपराई, ता. दर्यापूर, जि. अमरावती

**गैरअर्जदारः-**
**निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **नंदकिशोर मारोतराव आकोटकर** हे दिनांक १६/०५/२०२५ रोजी मरण पावले आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत कधी आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल

**मालमत्तेचे वर्णन : नंदकिशोर मारोतराव आकोटकर** यांचे नावे मौजा उपराई, ता. पर्यापूर जि अमरावती येथील शेत गट क २३०, १ हे ८४ आर, आ.रु. २० प्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजारभाव किंमत २०,००० रु. आहे.

आज दि. २१/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन) दिवाणी न्यायालय व स्तर दर्यापूर**

### जाहिरनामा / सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्रीमती. एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक २४६/२०२६ निरंक पुढील तारीख १८.०३.२०२६

**श्रीमती. नलिनी अधिक दोन विरुध्द**

अर्जदार- **1. Nalini Subhash Pathare** Age 69 yrs, Occu. Housewife,
**2. Nilesh Subhashrao Pathare** Age 42 yrs, Occu. Service Applicant No. 1 and 2 R/o Near Shiv Mandir, Hariom Nagar, Kathora Road, V.M.V. Amravati, Tq. & Dist. Amravati.
**3. Sau. Sonali Dhiraj Chore Maiden** Name: Ku. Sonali Subhashrao Pathare Age 43 yrs, Occu. Service R/o Shivra, Tq. Nandgaon Khandeshwar Dist. Amravati.

**विरुध्द- गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत सुभाष भगवंत पाथरे हे ३०.११.२०२५ रोजी अमरावती ता. जि. अमरावती येथे मयत झाले. अर्जदार नलिनी अधिक दोन विरूध्दध निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्छु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा **श्रीमती. नलिनी अधिक दोन विरूध्दध निरंक** वरीलप्रमाणे सदर्ह मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की ज़र सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्दू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि. १६.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

### जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय व. स्तर, दर्यापूर**
**वि. २ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर)**
**दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

ने.ता. २३/०३/२०२६ किरकोळ अर्ज क. ९५/२०२६

अर्जदारः- **१. वर्षा संजय खेडकर,** वय ३७ वर्ष, व्यवसाय - काही नाही
**२. कार्तिक संजय खेडकर,** वय २० वर्ष, व्यवसाय - काही नाही
**३.समृद्धी संजय खेडकर,** वय २० वर्ष, व्यवसाय - काही नाही
सर्व रा. नांदरूण, ता. दर्यापूर, जि. अमरावती

**-विरूध्द --**
**गैरअर्जदारः-**
**निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **अन्नपूर्णा शांताराम खेडकर ह्या दिनांक ०४/११/२०२३** रोजी मरण पावल्या आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII) १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २०/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन) दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १६६
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ठिकठिकाणी शिवजयंती साजरी

## स्वराज्य चौक



**अंजनगाव बारी -** तालुक्यातील मालखेड (रेल्वे) येथील स्वराज्य चौकात युवा तरुण व महिला मंडळींच्या पुढाकारातून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी घरोघरी रांगोळी काढून तसेच फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. गोडधोड पदार्थांचे वाटप करून विद्यार्थ्यांना शिवचरित्राची प्रेरणादायी माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली असून संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## आसेगाव बसस्थानक



**आसेगाव पूर्णा -** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आसेगाव नगरीत चिमुकल्या मावळ्यांनी रॅली काढून आसेगाव बस स्थानकावर उभारण्यात आलेल्या मंडपातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून चिमुकल्या मावळ्यांनी त्रिवार वंदन करत मानाचा मुजरा केला.यावेळी चिमुकल्या मावळ्यांनी शिवगर्जना देत वातावरण शिवमय केले. जय भवानी जय शिवाजी अशा चिमुकल्यांच्या जयघोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## अंजनगाव बारी चावडी चौक



**अंजनगाव बारी -** श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा चावडी चौक, अंजनगाव बारी येथे उत्साहात साजरा करण्यात आला. जन्मोत्सवाचे आयोजन नवशक्ती नवदुर्गोत्सव मंडळ चावडी चौक यांच्याकडून करण्यात आले होते. यावेळी चौकातील तरूण युवकांनी सहभाग घेत शिवाजी महाराजांनी मुर्तीचे पुजन करून राजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष अक्षय वाईकर, विकास वाईकर, उमेश डकरे, जगदीश अंबाडकर, हर्षल हटवार, वेदांत टवलारे, मंगेश चांदूरे, अभिजित श्रीखंडे, गौरव श्रीखंडे, शैलेश तिखे, वैभव तिखे, प्रविण टवलारे, पूर्वेस श्रीखंडे, ऋतिक वाईकर, सुरज वाईकर, इशांत श्रीखंडे, नंदकिशोर श्रीखंडे, सुनिल श्रीखंडे, सुधीर श्रीखंडे, युवराज राऊत, आशिष धर्माळे, अंकुश तिखे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सार्वजनिक वाचनालय



**ब्राह्मणवाडा थडी -** ब्राह्मणवाडा थडी येथील जिल्हा परिषद शाळा आवारातील सार्वजनिक वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. राहुल अहिर होते. प्रमुख पाहुणे म्हणून साधना काळे, वसंत वसुले, दिनेश अमझरे, सुशीला प्रतीके, सुरेखा दामेधर आणि पायल प्रतीके उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज तसेच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. अध्यक्षीय भाषणात डॉ. राहुल अहिर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश विद्यार्थ्यांना दिला. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा मंत्र त्यांनी उपस्थितांना दिला.या कार्यक्रमात लहान चिमुकल्यांचा उत्स्फूर्त सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. विद्यार्थ्यांनी भाषणे, घोषवाक्ये आणि देशभक्तीपर सादरीकरणातून वातावरण भारावून टाकले.कार्यक्रमास प्रज्वल दामेधर, राजेश इखार, विदर्भ प्रकाशचे संपादक संदीप वानखडे, पत्रकार अक्षय गुर्जर, चक्रधर तायडे, सुशील काळे तसेच कार्यक्रमाचे आयोजक राजेश खडसे आदींसह मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## लावण्या बहुउद्देशीय संस्था



**अमरावती-** श्री छत्रपती शिवाजी महाराज गेट महाजनपुरा या ठिकाणी श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस हार अर्पण तसेच दीप प्रज्वलित करून महाआरती करण्यात आली. या कार्यक्रमाला लावण्य बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष पूजा पिहूल विजयकर, उपाध्यक्ष अमोल विजयकर, प्रभाग क्रमांक १७ मधील नवनिर्वाचित नगरसेवक श्री योगेश विजयकर, अर्चना पांडे, भूषण पाटणे, अशोक पांडे, राहुल कामनापुरे, शुभम कामनापुरे, मनोज विजयकर, यश देशमुख, नयन विजयकर, आदित्य धनवटे, निषादसिंह जोध, योगेश पिडेकर, पवन विजयकर, नरेंद्र रावेकर, युवराज विजयकर, प्रशांत आठवले, अजय रावळे, ऋतुजा हिरपुरकर, मैथिली गणेशकर, नंदिनी सावरकर, कृत्तिका नांदुरकर, श्रुती योगेश विजयकर, आदी मान्यवर उपस्थित होते. महाआरती नंतर निषादसिंह जोध यांनी उपस्थित सर्व नागरिकांना धर्म संरक्षक श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान मास याविषयी मार्गदर्शन करून बलिदान मास प्रत्येक व्यक्तीने पाळावा, असे सांगितले. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, तरुण वर्ग, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'श्रद्धा-रियल होलसेल मॉल'चे आज लोकार्पण

### शहरातील मान्यवरांसह 'तारक मेहता फेम' बबीता यांची उपस्थितीत, १.२० लाख चौ. फूटमधील मेगा फॅशन डेस्टिनेशन

**अमरावती/का.प्र.**

श्रद्धा आणि विश्वासाने केलेले कार्य नेहमीच यशस्वी होते, या भावनेतून २००६ साली 'श्रद्धा साडी'ची सुरुवात झाली. आता त्याच व्यवसायाचा विस्तार करत १.२० लाख चौ. फूटमध्ये उभारण्यात आलेल्या भव्य 'श्रद्धा रियल होलसेल मॉल'चे लोकार्पण २२ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.०० वाजता होणार आहे. या सोहळ्यासाठी 'तारक मेहता' फेम कलाकारांची उपस्थिती कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.

स्थानिक बोरगाव धर्माळे येथील बिजीलॅन्डमधील लेन क्र. एल-३ व एल-४ येथे उभारलेल्या या मॉलच्या उद्घाटनावेळी सब टीव्हीवरील लोकप्रिय मालिका तारक मेहता का उल्टा चश्मा मधील बबिता अय्यर अर्थात मुनमुन दत्ता, सोनूची भूमिका साकारणारी खुशी माली आणि टप्पूची भूमिका करणारा नितीश भलूनी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या उपस्थितीत मॉलचे भव्य-दिव्य लोकार्पण होणार आहे.कार्यक्रमास अंजनगाव सुर्जी येथील श्रीनाथ मठाचे पीठाधीश्वर स्वामी जितेंद्रनाथ महाराज, संत साई डॉ. संतोषकुमार महाराज, खासदार बलवंत वानखडे, आ. संजय खोडके, सुलभा खोडके, आ. राजेश वानखडे, पोलिस आयुक्त राकेश ओला, महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, माजी खा. नवनीत राणा,




माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर, नानक आहुजा, अनिल अग्रवाल, विलास मराठे, बिजीलॅन्ड इन्फ्रा. प्रा. लि.चे जयराज बजाज आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या मेगा फॅशन डेस्टिनेशनमध्ये ग्राहकांना फॅशन, क्वालिटी आणि वैविध्यपूर्ण कलेक्शन एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. मॉलमध्ये किड्स झोन, स्वतंत्र फीडिंग रूम, वातानुकूलित विश्रांती व्यवस्था, बाहेरगावाहून येणाऱ्यांसाठी डायनिंग हॉल, सुमारे १५० जणांची बसण्याची व्यवस्था तसेच २२ हजार चौ. फूट पार्किंग सुविधा देण्यात आली आहे.ग्राऊंड फ्लोअरवर किड्स, मेंस व लेडीज वेअर, टी-शर्ट व वेस्टर्न वेअर, पहिल्या मजल्यावर वधूसाठी साड्या, दुसऱ्या मजल्यावर एथनिक कलेक्शन (कोट-सूट, जोधपुरी, कुर्ता-पायजमा, ब्रायडल सेक्शन), तर तिसऱ्या मजल्यावर होलसेल साड्या, हँडलूम, गारमेंट्स व मॅचिंग सेंटर असे विभाग असतील.मॉलचे इंटेरिअर आयडीज इंटेरिअरचे विजय लुल्ला यांनी केले असून, कॅपे डिझाइन स्टुडिओचे आर्किटेक्ट रोहित पुन्शी व आरसीसी कन्सल्टंट पंकज देशमुख यांचे सहकार्य लाभले आहे. या लोकार्पण सोहळ्यास शहरवासीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**जितके खरेदी कराल**

**तितके फ्री मिळणार**

नांदगाव पेठ येथील बिजीलॅन्ड कॉम्प्लेक्समधील 'श्रद्धा फॅमिली शॉप'चा विस्तार करून 'श्रद्धा रियल होलसेल मॉल' नव्या स्वरूपात सुरू होत आहे. लोकार्पण दिनी म्हणजेच रविवार, २२ फेब्रुवारी रोजी ग्राहकांसाठी विशेष एकदिवसीय ऑफर जाहीर करण्यात आली आहे 'जितके खरेदी कराल तितके फ्री मिळवा. उदाहरणार्थ, १ लाख रुपयांपर्यंत खरेदी केल्यास १ लाख रुपयांचे फ्री खरेदी कूपन देण्यात येईल, जे पुढील ३० दिवसांत वापरता येईल. ही ऑफर फक्त लोकार्पणाच्या दिवशीच उपलब्ध राहणार असल्याचे संचालकांनी सांगितले आहे.

# संत गुलाबपूरी महाराज पुण्यतिथी महोत्सव

**लेहेगाव/वार्ताहर**

येथे संत गुलाबपूरी महाराज यांच्या १०२ व्या पुण्यतिथी महोत्सवाला अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावाने प्रारंभ झाला आहे. पहाटे काकड आरतीने सप्ताहाची सुरुवात झाली. मंदिर परिसरात वेदघोष, हरिनामाचा अखंड गजर, टाळ-मृदुंगाचा नाद आणि 'जय गुलाबपूरी महाराज' च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

श्री समर्थ गुलाबपुरी महाराज संस्थान यांच्या वतीने दि. २१ ते २८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित या पुण्यतिथी सप्ताहात विविध धार्मिक, सामाजिक आणि भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी अभिषेक व पूजन, दुपारी अन्नदान तर सायंकाळी हरिपाठ, भजन आणि कीर्तन कार्यक्रम पार पडत आहेत.गावातील महिला भगिनींनी मंदिर परिसरात आकर्षक रांगोळ्या काढून तसेच फुलांची सजावट करून संपूर्ण वातावरण प्रसन्न केले आहे. युवक मंडळाच्या स्वयंसेवकांनी भाविकांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था आणि शिस्तबद्ध रांगा यांचे नियोजन केले आहे. परिसरातील तसेच



बाहेरगावाहून आलेले भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून संतांच्या चरणी नतमस्तक होत आहेत.महोत्सवाच्या निमित्ताने संतांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला जात असून त्यांच्या समाजप्रबोधन, सेवा आणि सद्भावनेच्या संदेशाची उजळणी केली जात आहे. संत गुलाबपूरी महाराजांनी दिलेल्या साधेपणा, परोपकार आणि समाजएकतेच्या शिकवणीमुळेच आजही हजारो भक्त त्यांच्या स्मृतीशी जोडलेले आहेत.एकादशी निमित्त विशेष फराळ कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी महाप्रसाद (पुरणपोळी) वितरणाचा भव्य कार्यक्रम होणार आहे. हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार असून संस्थानतर्फे सर्व भक्तांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या पुण्यतिथी सप्ताहामुळे नेरपिंगळाई गाव खऱ्या अर्थाने भक्तीरसात न्हाऊन निघाले असून श्रद्धा, सेवा आणि एकतेचा संदेश देणारा हा आध्यात्मिक सोहळा ठरत आहे.

# नरेंद्र गोरे यांचे निधन



**तिवसा -** येथील कमल कॉलनी स्थित रहिवासी नरेंद्र पांडुरंग गोरे (काका) यांचे २१ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले.मृत्यूसमयी ते ६८ वर्षाचे होते.अनेक सामाजिक, धार्मिक कार्यात त्यांचे मदतकार्य सुरू राहायचे.तिवसा शहरातील ते एक प्रेमळ, हसतमुख व दानशूर व्यक्तिमत्त्व होते.त्यांच्या मृत्यू पश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.

# मंजिरी इंगोले हिचा सत्कार

**अंजनगाव बारी** - येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच माजी शिकवणी शिक्षक स्व. प्रदीप शाहूराव इंगोले यांची कन्या मंजिरी प्रदिप इंगोले हिने सत्र २०२५-२६ प्रा.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा येथील इन्फर्मेशन टेक्नोलोजी विभागातून अमरावती विद्यापीठ हिवाळी परीक्षेत वरिष्ठ श्रेणीत' उत्तीर्ण होऊन यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल अभियांत्रिकी विद्यालय स्नेहसंमेलन एन्जॉय-२०२६ मध्ये महाराष्ट्राची हास्य जत्रा सिने



अभिनेते समिर चौगुले व प्रियदर्शीनी इंदलकर याचे हस्ते प्रशस्तीपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन जाहिर सत्कार करण्यात आला.यावेळी विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटी, अमरावती अध्यक्ष डॉ. नितिन धांडे, उपाध्यक्ष ॲड.उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराज सिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितिन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, गजानन काळे, संयोजक डॉ. आशीष कडू, डॉ. वैशाली धांडे, विद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे तसेच मान्यवर, प्राध्यापक तसेच संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वमन चिकित्सा शिबीराचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

शहरातील गाडगेनगर स्थित कावरे आयुर्वेद, पंचकर्म हॉस्पीटल द्वारा डॉ पंकज कावरे यांनी फेब्रुवारी ते एप्रिल २०२६ पर्यंत सलग तीन महिन्याचे नि:शुल्क तपासणीसह वमन शिबीराचे आयोजन केले आहे. तरी या शिबीराचा लाभ सर्वसामान्य रुग्णांनी घ्यावा असे जनहितार्थ आवाहन डॉ पंकज कावरे यांनी केले आहे.



या शिबीरामध्ये दमा, ॲसिडीटी (आम्लपित्त), सर्दीचा होणारा प्रादुर्भाव, अस्थमा, घश्यातील टॉन्सिल्स वाढणे, चेह-यावरील पिंपल्स, चेह-यावरील वांग, काळे डाग, त्वचा रोग, सोरियासिस या आजाराचे निदान निःशुल्क तपासणीद्वारा केले जाणार आहे.या विविध आजारांना प्रतिबंधीत करण्यासाठी आयुर्वेदात पंचकर्म चिकित्सा प्रतिपादीत केली आहे.गेल्या पंचवीस वर्षापासून डॉ कावरे आयुर्वेद व पंचकर्म चिकित्सा करीत असून अनेक सर्वसामान्य रुग्णांना आपण या चिकित्सेद्वारे दिलासा दिला आहे असे त्यांनी सांगितले आहे.

याचसोबत वर्षभरातून बरेच वेळा मधुमेह नियंत्रण कार्यशाळा, पंचकर्म चिकित्सा शिबीराचे आयोजन आपण करीत असतो त्यामुळे ३० एप्रिल पर्यंत सुरु असलेल्या या शिबीराचा लाभ सर्वसामान्य रुग्णांनी घ्यावा असे जनहितार्थ आवाहन डॉ कावरे यांनी केले आहे.

# नवनिर्वाचित नगरसेवक द्वारे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम



**अमरावती/का.प्र.**

स्थानिव अवधूत मंदिर सभागृह महाजनपुरा १७ फेब्रुवारी मंगळवार रोजी या वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेकरिता मार्गदर्शनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाकरिता प्रमुख तज्ञ मार्गदर्शकअनंत निंबाळे मुख्याध्यापक न्यू हायस्कूल मेन विद्यालय, अमरावती. प्रभाग क्रमांक १७ मधील नवनिर्वाचित नगरसेवकयोगेश विजयकर तसेच अशोक पांडे, ज्ञानार्जन कोचिंग क्लासेस चे संस्थापक मनोज विजयकर आदी मान्यवर उपस्थित होते.

अनंत निंबाळे सर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या तज्ञ मार्गदर्शनातून परीक्षेला जाताना घ्यावयाची काळजी तसेच परीक्षे संदर्भात सविस्तर माहिती दिली.

अशोक पांडे यांनी विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करण्या संदर्भात माहिती दिली. नगरसेवक योगेश विजयकर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षे करिता शुभेच्छा देऊन निकाल जाहीर झाल्यानंतर अकरावी प्रवेश प्रक्रिया करिता सुद्धा असेच मार्गदर्शन करण्याकरिता कार्यक्रम आयोजित करू असे सांगितले.

मनोज विजयकर यांनी विद्यार्थ्यांना आपले आरोग्य जपण्यास तसेच मानसिक स्वास्थ उत्तम ठेवण्यास मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी वर्ग, पालक वर्ग व परिसरातील नागरिक उपस्थित होते. मनोज विजयकर यांनी कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन केले.

# छ. शिवाजी महाराजांचा शिवजन्मोत्सव सोहळा

### शिव - निबंध लेखन स्पर्धेतून शिवरायांचा अलौकिक कार्य व विविधांगी पैलूंचा उलगडा

**भातकुली/वार्ताहर**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रायतेचे थोर कल्याणकारी जाणता राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी शिवजयंती साजरी करण्यात आली.

शिवजयंती म्हणजे तमाम शिवप्रेमी व शिवभक्तांकरिता एका उत्सवाची पर्वणी असल्याने शहरीभाग असो अथवा ग्रामीण भागात सर्वच ठिकाणी, भातकुली तालुक्यातील जळका हिरापूर येथे शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा अर्पण करीत शिवोत्सव साजरा करण्यात आला.

सर्व प्रथम श्री. गुरुदेव सेवा मंडळ येथे सामुदायिक प्रार्थना व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

शिवजयंती निमित्य शिवनिबंध स्पर्धेचे आयोजन सुद्धा करण्यात आले. ज्यामध्ये अ गट वर्ग ३ ते ५, ब गट वर्ग ६ ते ८ तसेच गट क मध्ये वर्ग वर्ग ९ व त्यापुढील खुल्या गटातून



विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झालेत. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी निबंध लेखन करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्र, शौर्य-पराक्रम, माँसाहेब जिजाऊंची शिकवण, मावळ्यांची साथ, महाराजांच्या स्वाऱ्या व मोहीम, राज्याभिषेक, तसेच रयतेचे कल्याणकारी राजे, अशा आशयाची मांडणी करून शिवचरित्राचे वर्णन केले. दरम्यान श्री.गुरुदेव सेवा मंडळाच्या बालकलाकारांनी शिवाजी महाराज यांचे जन्मोत्सवाची नाट्यमय प्रस्तुती देऊन शिवकालीन प्रसंगांचे दर्शन घडविले. यावेळी शिवजन्मसोहळ्याचा सजीव देखावा पाहून उपस्थित सर्व शिवप्रेमीचे हृदय सुद्धा स्वराज्य रक्षणाच्या भावनेने ओतप्रत झाले. शिवजयंती निमित्य बाल कलावंतानी बालशिवबा, जिजाऊ, मावळे, अशा वेशभूषा साकारून संपूर्ण परिसर शिवमय करून सोडला.

स्पर्धकांवर आकर्षक बक्षिसांची लयलूट सुद्धा करण्यात आली. कार्यक्रमाला जळका हिरापूर येथील शिवप्रेमी प्रामुख्याने उपस्थित होते. शिव जन्मोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी निखिल कडू, कृष्णा कडू, रोहित ठाकरे, मंगेश भोरे, अभिजित कडू, ज्ञानेश्वर केंडर, साक्षी गायकी, वैष्णवी ठाकरे आदींसह मित्र मंडळी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमा दरम्यान जय भवानी जय शिवाजी चा जयघोष करताच संपूर्ण परिसर शिवमय झाला.

# संत गाडगे महाराज महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**अमरावती/का.प्र.**

वलगाव येथील संत गाडगे महाराज महाविद्यालयात १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय वाघ यांची उपस्थिती लाभली. शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन तसेच हारार्पण करण्यात आले.संचालन राधा चौधरी बी. ए .भाग १ ची विद्यार्थीनी तर आभार प्रदर्शन दिव्या मोरे हिने केले.

आजच्या पिढीला शिवरायांचे विचार आत्मसात करून त्यावर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या विषयी भाषणे दिली. विद्यार्थीनी अनुष्का गडलिंग ने शिवाजी महाराज बद्दल सामाजिक माहिती आपल्या भाषणाद्वारे सादर केली.





महाविद्यालयाचे उपस्थित प्रा. नितीन सोळंके यांनी शिवरायांचे विचार आजच्या काळाची एक गरज आहे याबाबत सांगितले. त्याचप्रमाणे रौराळे सरांनी शिवराज्य पुन्हा व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. अध्यक्ष वाघ यांनी शिवरायांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमला महाविद्यालयाचे प्रा. प्रिया खोरगडे, प्रा नितीन सोळंके, प्रा. शार्दुल निचित, प्रा. पवन पाटील ,प्रा. रौराळे उपस्थित होते.तसेच ह्या कार्यक्रमाला विद्यार्थी प्राध्यापकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# स्वीकृत नगरसेवक निवडीवरून भाजपमध्ये खदखद

## मुख्यमंत्र्यांचे मामेभाऊ कलोती यांची नाराजी

### -सोशल मीडिया वरील पोस्ट चर्चेत



**अमरावती/प्रतिनिधीः-** महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकांची शुक्रवारी निवड करण्यात आली. यात भाजपने विधितज्ज्ञ प्रशांत देशपांडे आणि क्रीडा क्षेत्रातील संजय तिरथकर यांना संधी दिली. पण, या निवडीनंतर भाजपमध्ये असंतोष उफाळून आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ विवेक कलोती यांनी तर उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. 'उमेदवारी न मिळाल्याने घरात बाईसारखे रुसून बसणाऱ्या आणि पक्षाच्या उमेदवारांच्या विरोधात काम करणाऱ्यांना बक्षीस' अशी पोस्ट विवेक कलोती यांनी समाज माध्यमावर प्रसारीत केली होती. या पोस्टची चर्चा रंगली. यामाध्यमातून त्यांनी उघडपणे आपली नाराजी व्यक्त केली आहे.

विवेक कलोती हे महापालिकेच्या निवडणुकीत बुधवारा प्रभाग क्रमांक १४ मधून भाजपतर्फे रिंगणात होते. मात्र, त्यांचा ☞(पान २ वर)

# विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा सोमवारी

## १२२ सुवर्ण,२२ रौप्य, २४ रोख पारितोषिक

### -४२,३१७ विद्यार्थ्यांना पदवी, २५५ पदविका

### -निकिता पुनसेला ६, पल्लवी राठोड ५, तेजस्विनी भगत व साईईश्वरी इंदुरकरला ४ सुवर्ण



**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उद्या सोमवार २३ फेब्रुवारीला सकाळी दहा वाजता पासून विद्यापीठ परिसरात होणार आहे. कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या सोहळ्यामध्ये माजी भारतीय लष्कर प्रमुख मनोज पांडे, प्र कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यामध्ये ४२,३१७ विद्यार्थ्यांना पदवी व २५५ विद्यार्थ्यांना पदविका प्रदान करण्यात येणार आहे. ४६६ जणांना आचार्य पदवी दिली जाणार आहे. १२२सुवर्ण, २२ रोप्य, २४ रोख पारितोषिक असे एकूण १६८ पारितोषिकं वितरित करण्यात येणार आहे. नेहरू कला वाणिज्य महाविद्यालय नेरची निकिता किशोर☞(पान २ वर)

**■ समारंभाचे लाईव्ह प्रक्षेपण-**

दीक्षांत समारंभाचे लाईव्ह प्रक्षेपण फेसबुक लाईव्ह व युट्युब वर करण्यात येणार आहे. सकाळी दहा वाजेपासून कार्यक्रम संपेपर्यंत थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. यामुळे विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ लाईव्ह बघण्याची सुविधा विद्यार्थी व पालकांना झालेली आहे. तसेच मंडपात डिजिटल स्क्रीन लावण्यात आली आहे.

# नवीन नियमामुळे ६० टक्के सोलर ग्राहकांवर परिणाम,उद्योगावर संकट

### रिनोवेबल एनर्जी असो.चा पत्रकार परिषद मध्ये आरोप



**अमरावती/प्रतिनिधीः-** महावितरणच्या एमएसईडीसीएलच्या नवीन नियमामुळे ६० टक्के सोलर ग्राहकांवर परिणाम होत असल्याचा आरोप रिनेव्हल एनर्जी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आज शनिवार २१ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषदेमध्ये केला आहे.महावितरण ग्राहकांना सोलर क्षमतेची स्वीकृती देणे बंद केले आहे. त्यामुळे सोलर उद्योगावर फार मोठे संकट आले आहे. राज्यातील ६० टक्के हून अधिक सोलर योजनेची बुकिंग रद्द होण्याची शक्यता आहे. प्रधानमंत्री सूर्य घर योजने अंतर्गत नागरिकांना सोलर योजना लावण्याचा प्रचार करण्यात येत आहे. प्रत्यक्षात पंतप्रधानाच्या नावावर सुरू असलेल्या या योजनेला गालबोट लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. अनेक ग्राहक विजेची ☞(पान २ वर)

# दर्यापूर तालुक्यात ११ केंद्रावर दहावीच्या परीक्षेला सुरवात


## पहिल्याच पेपरला ३८ विद्यार्थ्यांची दांडी

### २२३७ विद्यार्थी परिक्षेसाठी प्रविष्ट



**खल्लार/प्रतिनिधीः-** २० फेब्रुवारी पासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या परीक्षेला सुरवात झाली आहे. दर्यापूर शहर व तालुक्यातील एकूण ११ केंद्रावर परीक्षा होत असून मराठी माध्यम १८६५ व उर्दू माध्यम ३७२ असे असून एकूण २ हजार २३७ समाविष्ट विद्यार्थी परिक्षेसाठी प्रविष्ट आहेत. पहील्याच दिवशी मराठी व उर्दू या भाषेच्या ☞(पान २ वर)

# बांधकामस्थळी आढळला कुजलेला मृतदेह



**परतवाडा/प्रतिनिधीः-** शहरातील मुख्य मार्गावर स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्या जवळ निर्माणाधीन इमारतीमध्ये एका अज्ञात इसमाचा कुजलेला मृतदेह आज शनिवार २१ फेब्रुवारीला सकाळी आढळल्याने खळबळ उडाली. माहितीनुसार एसबीआय बँकेजवळ इमारतीचे बांधकाम सुरू आहे. शनिवारी सकाळी जेव्हा मजूर कामासाठी इमारतीमध्ये आले तर त्यांना परिसरात घाणेरडा वास आला. त्यांनी आत ☞(पान २ वर)

# 'धर्माच्या आधारावर आरक्षण शक्य नाही'

### मुस्लिम ५ टक्के आरक्षण रद्द प्रकरण याचिकेवर खासदार डॉ.अनिल बोंडे यांचं वक्तव्य



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र सरकारने शिक्षण व नोकरीमधील मुस्लिमांसाठीचे ५ टक्के आरक्षण रद्द केल्यानंतर वादाला नवे वळण मिळाले आहे. या निर्णयाविरोधात अधिवक्ता सय्यद एजाज नकवी यांनी न्यायालयात याचिका दाखल करत संविधानाचे उल्लंघन झाल्याचा दावा केला आहे.

या पार्श्वभूमीवर भाजप खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी मोठं विधान केलं आहे. 'धर्माच्या आधारावर आरक्षण शक्य नाही' असं बोंडे म्हणाले, संविधानानुसार मुस्लिमांना धर्माच्या आधारावर आरक्षण मिळणं कधीही शक्य नाही. त्यामुळे ही याचिका कोर्टात टिकणार नाही.'

त्यांच्या मते, धर्मनिहाय आरक्षण देणे हे संविधानाच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे. बोंडे यांनी ५ टक्के मुस्लिम आरक्षणावर टीका करत म्हटले की, मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण देणे हे वांशिक भेदभावाचे प्रतीक होतं.' त्यांनी पुढे स्पष्ट केले की, आरक्षणाची संकल्पना ही सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणावर आधारित आहे, धर्मावर नाही.

बाबासाहेबांच्या विचारांचा संदर्भ बोंडे यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा दाखला देत म्हटले 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षण जातीच्या सामाजिक मागासलेपणावर दिलं. धर्माच्या आधारावर आरक्षण संविधानात कुठेही नमूद नाही.' त्यांनी हेही नमूद केले की, अल्पसंख्यांकांसाठी इतर शिफारसी व योजना देता येऊ शकतात; मात्र नोकरी आणि शिक्षणातील आरक्षण कोणत्याही धर्माच्या नावावर देता येणार नाही.

**धर्मांतर आणि आरक्षणावर मोठी मागणी-**

बोंडे यांनी आणखी एक ठोस भूमिका मांडली आहे. 'उलट हिंदू धर्मातील एखादी जात दुसऱ्या धर्मात जात असेल, तर त्याचं ☞(पान २ वर)

# ऑक्सिजन पार्कमधील वृक्षतोडीमुळे खळबळ

### वीज विभागावर गंभीर आरोप - पर्यावरण संघटनांचा तीव्र आक्षेप



**■ हरित संतुलन राखण्याचे आवाहन-**

सामाजिक संघटना व जागरूक नागरिकांनी प्रशासनाला आवाहन केले आहे की, शहरातील खुल्या व हरित जागांचे संरक्षण प्राधान्याने करण्यात यावे. विकासकामे करताना पर्यावरण संवर्धनाचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. वृक्षतोड झाल्यास त्याऐवजी समान संख्येने वृक्षारोपण करणे व त्यांची योग्य निगा राखण्याची जबाबदारी निश्चित करावी, अशीही जोरदार मागणी करण्यात येत आहे.

**अचलपूर/प्रतिनिधीः-** शहरातील ऑक्सिजन पार्क परिसरात अलीकडेच मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेल्या वृक्षतोडीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमींचा आरोप आहे की, वीज वाहिन्यांच्या देखभालीच्या नावाखाली गरजेपेक्षा अधिक हिरवीगार झाडे तोडण्यात आली असून, यासाठी आवश्यक शासकीय परवानगीही घेण्यात आलेली नाही. या प्रकारामुळे ऑक्सिजन पार्कसारख्या महत्त्वाच्या हरित क्षेत्राच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटनेचे वनश्री अध्यक्ष ☞(पान २ वर)

# एसटीच्या धडकेत कुष्ठरोगी गंभीर

### माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख धावले मदतीला

जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल



**-गर्ल्स हायस्कूल चौकातील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गर्ल्स हायस्कूल चौकात शनिवारी (दि.२१) दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास एसटी बसने एका कुष्ठरोगी व्यक्तीला चिरडले. या अपघातात संबंधित व्यक्ती गंभीर जखमी आहे. विशेष म्हणजे, अपघात झाला तेव्हा कोणीही मदतीला येत नसताना माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी माणुसकी दाखवत केले. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच १४ एमटी ☞(पान २ वर)

# मुर्तीजापूरच्या श्रेया ने रुग्णालयात दिला गणिताचा पेपर



### -अमरावती मंडळाचा पुढाकार

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारा घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. बारावी विज्ञान शाखेचा शनिवारी गणित विषयाचा पेपर होता. पेपर देण्यासाठी मूर्तिजापूर येथील अनंतराव देशमुख कॉलेज सेंटरवर पोहचलेली श्रेया गुणवंत देशमुख हिची अचानक प्रकृती बिघडली आणि ती बेशुद्ध होऊन खाली पडली. सेंटर वरील कर्मचाऱ्यांनी तिला तत्काळ रुग्णालयात दाखल केले. मात्र तिचे वर्ष ☞(पान २ वर)

# विद्यार्थिनीवर अत्याचार करून व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी

### दोन भावांविरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील रहाटगाव परिसरातील एका हॉटेलमध्ये एमएससीआयटीच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थिनीला शीतपेयातून गुंगीचे औषध देऊन तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ काढून तो व्हायरल करण्याची धमकी देत पाच लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी बडनेरा येथील दोन सख्ख्या भावांविरुद्ध पोलिसांनी (दि.२१) गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेली माहितीनुसार, पीडित तरुणी मूळची आर्वी येथील असून ती अमरावतीत राहून एमएससीआयटीचा कोर्स करत आहे. या कोर्समध्ये सोबत शिकणाऱ्या चेतन आणि आकाश (दोन्ही रा. जुनी वस्ती, बडनेरा) यांनी तिला २६ मे २०२५ रोजी रहाटगाव येथील शतायु ग्रँड हॉटेलमध्ये पार्टीसाठी बोलावले होते. ओळखीचे असल्याने आणि बॅचचे गेट-टुगेदर असल्याचे ☞(पान २ वर)

# दोन वेगवेगळया अपघातांत दोघांचा मृत्यू

### वरुड व तळेगाव दशासर पोलीस ठाणे हद्दीतील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील वरुड व तळेगाव




दशासर पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या दोन वेगवेगळ्या रस्ते अपघातांत दोन तरुणांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वरुड तालुक्यातील आलोडा येथील शुभम राजेंद्र लोखंडे (वय २४) हे आपल्या दुचाकी (क्रमांक एमएच २७/बी ०५७०) ने जात असताना त्यांच्या मोटारसायकलीची बैलगाडीला धडक बसली. या अपघातात शुभम लोखंडे गंभीर जखमी झाले होते. ☞(पान २ वर)

# सामदा येथील नागरिकांचे तहसिल कार्यालयासमोर आंदोलन

### शेकडो नागरिकांचा सहभाग

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील सामदा कासमपूर येथील घरकुल धारक लाभार्थ्यांना रेती मिळणे, शेती रस्ते व शिव रस्त्याचे मातीकाम करण्याबाबत अनेक वेळा निवेदने देऊन प्रशासन कोणतेही लक्ष देत नाही. परिणामी नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून शासनाने आदेश दिल्यावरही कोणतेही काम होत नाही. यामुळे संतापलेल्या ग्रामस्थांनी (दि. २०) ला दर्यापूर तहसिल कार्यालयासमोर शेकडोच्या संख्येने एकत्र येत लक्षवेधी आंदोलन केले.



सामदा कासमपूर येथील घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी ५ ब्रास रेतीच्या पासेस मिळणे, ग्रा. पं. सामदा ☞(पान २ वर)

गेल्या वर्ष भरापासून सामदा येथील ग्रामस्थ तहसिलदार यांना समस्यांकरीता विनवण्या करत आहेत मात्र केवळ दुर्लक्ष केल्या जात आहे.घरकुल लाभार्थी रेतीसाठी वाट बघत असून शेती रस्ते व शिव रस्ते यांचे मातीकाम सुद्धा थंड बस्त्यात आहे. प्रशासन काय करत आहे. ग्रामस्थांच्या अडचणी वाढत आहेत.आता यापुढे उग्र आंदोलन करू.

**-प्रभाकर चौरपगार, आंदोलन कर्ते**

# भरधाव वाहन उलटले, आठ जनावरे दगावली

### मोर्शी-चांदूर बाजार मार्गावरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी–चांदूर बाजार रस्त्यावर गुरांची बेकायदेशीर व क्रूर वाहतूक सुरू असल्याचा गंभीर प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. भरधाव वेगात जाणारी बोलेरो गाडी उलटून झालेल्या अपघातात आठ गुरांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन गुरांचे प्राण वाचविण्यात पोलिसांना यश आले.




चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोर्शी–चांदूर बाजार रस्त्यावर गोविंदप्रभू मंदिराजवळ भरधाव वेगात जाणारी बोलेरो पिकअप गाडी उलटून भीषण अपघात झाला. या गाडीत क्रूरपणे कोंबलेली एकूण अकरा गुरे होती. त्यापैकी आठ गुरांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन गुरांन☞(पान २ वर)

सारांश
जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय
❑ रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ ❑ E-paper - www.janmadhyam.com

**आयटी क्षेत्रासाठी यंदाचा अर्थसंकल्प सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना यामुळे हे क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनामध्ये आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल.**



# सातत्यपूर्ण पाठबळ हवे

भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९०च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा ?नॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये. २०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण. सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येते, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाउड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परदेशी क्लाउड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो. यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे. स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे.

आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादेत न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते. यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत यांचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे. अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. योग्य अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.

**डॉ. दीपक शिकारपूर**

# गडचिरोलीत नक्षलवाद्यांची स्मारके उद्ध्वस्त...

गडचिरोली जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलीस दल आणि गडचिरोली जिल्हा पोलीस यांच्या संयुक्त कारवाईत ४४ माओवादी स्मारके उद्ध्वस्त करण्यात आलेली आहेत. यात ८०० जवानांनी भाग घेतला आणि ही कारवाई पार पाडली आहे. त्यामुळे आता या जिल्ह्यातला नक्षलवाद शेवटचे आचके देतो आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. इथला नक्षलवाद समूळ संपला, तर तिथे विकासाची नवी पहाट होईल यात कोणती शंका नाही.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत १०९ गैरप्रकार झाले असून कोकण विभागीय मंडळामध्ये एकही गैरप्रकार झालेला नाही. तेव्हा परीक्षा मंडळाने अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल.**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत १०९ गैरप्रकार झाले असून कोकण विभागीय मंडळामध्ये एकही गैरप्रकार झालेला नाही. तेव्हा परीक्षा मंडळाने अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल. त्यासाठी पालकांनी परीक्षेच्या कार्यकाळात परीक्षा सुरू असताना मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

परीक्षेचे वेळापत्रक जसजसे जवळ येते तसतसे मुलांचा ताण वाढण्याला मदत होत असते. जी मुले नियमित अभ्यास करतात त्यांना कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. तेव्हा आई-वडिलांनी मुलांची केवळ परीक्षेपुरती काळजी न घेता नियमितपणे काळजी घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा परीक्षा जवळ आली की मुलांची डोकेदुखी, पोटदुखी, अंगदुखी, झोप न येणे, मूल चिडचिडे होणे असे दिसून येते. अशा वेळी पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन सकारात्मक दृष्टिकोन मुलांबरोबर ठेवावा. याचा परिणाम म्हणून त्यांना प्रोत्साहन मिळून ती अधिक जोमाने अभ्यास करून तणावमुक्त होऊन परीक्षेला आनंदाने सामोरे जातील. पालकांनी आपली मुले परीक्षेत यशवंत होण्यासाठी परीक्षेच्या कालावधीत मुलांच्या मनात तणाव वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तेव्हा मुलांच्या अभ्यासातील प्रगतीचा भूतकाळ कसा होता किंवा त्यांनी काय केले याची उजळणी न करता त्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याशी सुसंवाद साधावा. मुलांच्या परीक्षेविषयी त्यांच्या मनातील भीती दूर करावी. त्यांना आनंदित ठेवावे. पालकांनी अभ्यासासाठी जास्त सक्ती करू नये. मुलांनासुद्धा आपल्या परीने अभ्यास करू द्यावा. तेव्हा आपल्यावरती आता धाक नाही असे मुलांनी न समजता अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. यात आपलेच नुकसान होणार आहे, याची मुलांनी दक्षता घ्यावी. यासाठी मुलांनी आज्ञाधारक राहिले पाहिजे.

महत्त्वाची बाब म्हणजे, आपले मूल परीक्षेच्या काळात पुरेसे जेवण करीत आहे का? याकडे सुद्धा पालकांनी लक्ष द्यायला हवे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. त्यासाठी त्यांना संतुलित आहार नियमित मिळणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांची ऊर्जा टिकून राहते. परीक्षा काळात मुलांच्या जेवणात बदल करू नये. तसेच त्यांना पुरेशी झोप घेण्यास सहकार्य करावे.


मुलांना पुरेशी झोप मिळाल्यामुळे ते अधिक एकाग्रतेने अभ्यास करू शकतात. त्यात टीव्ही पाहणे आणि आरोग्यासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा असतो. काही पालक रात्रभर अभ्यास करा असे मुलांना सांगत असतात किंवा अभ्यासिकेत पाठविले जाते. अशा वेळी पालकांनी सुद्धा मुलांचा कल लक्षात घेणे गरजेचे असते. कारण इतरांपेक्षा आपल्या मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहिती असतात. अभ्यासाबरोबर आरामाचीसुद्धा मुलांना नितांत आवश्यकता असते. याकडे सुद्धा पालकांनी अधिक लक्ष द्यायला हवे. याचा जास्त फायदा आपल्या मुलांना होत असतो. याची कल्पना पालकांना असायला हवी. अभ्यासाबरोबर घराचीसुद्धा स्वच्छता जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर पालकांनी स्वत: शांत राहणे महत्त्वाचे असते. परीक्षा काय दररोज होत नाहीत. मात्र परीक्षेचा काळ मुलांप्रमाणे पालकांसाठीही महत्त्वाचा असतो. या कार्यकाळात मुलांना तणावमुक्त होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते, मात्र यात जास्त वेळ घालवू नये.

मुलांच्या अभ्यासासाठी कशी मदत होईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. यात जास्त वेळ घालवू नये. परीक्षेच्या काळात मुलांचा ताण वाढल्यास मुलांनी त्याचा सामना कसा करावा याचा योग्य सल्ला घ्यावा. या काळात मुलांना अभ्यास करताना व्यत्यय येणार नाही याची पालकांनी काळजी घ्यावी. आरामात अभ्यास करेल अशा जागेत त्याला अभ्यास करण्यासाठी बसवावे. परीक्षा सुरू असल्याने आपल्या मुलांना प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहित करावे. विद्यार्थी आणि परीक्षा यांचा कसा सबंध असतो. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर आपले ध्येय सहज पार करू शकतो याची आठवण मुलांना करून द्यावी. काही वेळा परीक्षा काळात मुलांना चिंताग्रस्त होणे साहजिकच आहे. मात्र सकारात्मक दृष्टिकोन मुलांनी ठेवायला पाहिजे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया असून त्यावर सहज मात करता आली पाहिजे. यासाठी वर्षभरात झालेला अभ्यास दरदिवशी करणे आवश्यक आहे. अभ्यास झाला असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता अधूनमधून अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. म्हणजे त्या अभ्यासक्रमाची उजळणी होऊन मुलांच्या मनात तणाव निर्माण होत नाही. यात अभ्यासात चुकारपणा मुलांनी करू नये. अभ्यासासाठी मुलांवर दबाव वाढवू नये तर मुलांच्या समस्या सुद्धा पालकांनी समजून घेणे गरजेचे असते. परीक्षा झाल्यावर पेपरमध्ये कठीण प्रश्न कोणते होते? किती लिहिलाय? पेपर पूर्ण लिहिलाय काय? असे अनेक प्रश्न विचारत बसण्यापेक्षा आता पुढील परीक्षा कोणत्या विषयाची आहे.

त्या विषयावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. परीक्षेला घरातून जाताना मुलांना आधार दिला पाहिजे. तसेच त्यांना धीर द्यावा म्हणजे मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त परीक्षा देऊ शकतात. तेव्हा मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त होण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन द्यावे.

# आवाज हरपण्याचे दिवस संपले

भारतामध्ये डोके व मान कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. या कर्करोगांमध्ये तोंड, घसा (आवाजपेटी), थायरॉईड, सायनस, नाक तसेच लाळग्रंथी यांचा समावेश होतो. यापैकी आवाजपेटीचा कर्करोग हा तोंडाच्या कर्करोगानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. अनेक वर्षे या कर्करोगावर संपूर्ण आवाजपेटी काढून टाकणे (टोटल लॅरिंजेक्टॉमी) हा सर्वोत्तम उपचार मानला जात होता. जरी यामुळे कर्करोग बरा होण्याचे प्रमाण चांगले होते, तरी रुग्णाचा आवाज कायमचा हरपायचा. मात्र आजच्या प्रगत तपासणी आणि उपचारांमुळे बहुतेक रुग्णांमध्ये आवाजपेटी जपण्यावर भर दिला जातो. धूम्रपान आणि मद्यपान ही आवाजपेटीच्या कर्करोगाची दोन प्रमुख



कारणे आहेत. हा कर्करोग प्रामुख्याने ५० ते ७० वयोगटातील पुरुषांमध्ये अधिक आढळतो. सततचा घसा बसणे किंवा आवाजात बदल होणे हे याचे सुरुवातीचे आणि महत्त्वाचे लक्षण आहे. कर्करोग लवकर ओळखला गेला तर ट्रान्सओरल लेझर मायक्रोसर्जरी (टीएलएम) या आधुनिक पद्धतीने उपचार करता येतात. लेझरच्या साहाय्याने आवाजपेटीतील लहान गाठी काढल्या जातात. या उपचारामुळे सुमारे ९० टक्के रुग्ण पूर्णपणे बरे होतात, आवाज व गिळण्याची क्षमता टिकून राहते, खर्च तुलनेने कमी असतो आणि बहुतेक वेळा हा उपचार डे-केअर पद्धतीने केला जातो.

मध्यम टप्प्यातील कर्करोगात रेडिएशन थेरपीसोबत केमोथेरपी दिली जाते. या उपचारपद्धतीमुळे अवयव जपण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून ८० टक्क्यांहून अधिक रुग्णांचा नैसर्गिक आवाज कायम राहतो. प्रगत अवस्थेतील रुग्णांना अजूनही संपूर्ण आवाजपेटी काढण्याची शस्त्रक्रिया करावी लागू शकते. मात्र आजच्या घडीला आवाज पुनर्वसनासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. व्हॉइस प्रोस्थेसिस, इलेक्ट्रॉनिक लॅरिंक्स किंवा अन्ननलिकेच्या सहाय्याने बोलण्याचे प्रशिक्षण. यामुळे अशा रुग्णांनाही पुन्हा संवाद साधता येतो. आधुनिक उपचार आणि समर्पित पुनर्वसनामुळे कर्करोगामुळे आवाज गमावणे आता अटळ राहिलेले नाही. आज बहुतेक रुग्ण आपला नैसर्गिक आवाज जपू शकतात आणि ज्यांना मोठी शस्त्रक्रिया करावी लागते, तेही योग्य प्रशिक्षणामुळे पुन्हा बोलू शकतात.

वेळेवर तपासणी आणि योग्य उपचारांमुळे प्रत्येक रुग्णाला केवळ आपला आवाजच नव्हे, तर आत्मविश्वास आणि जीवनाचा द जाही पुन्हा मिळवण्याची संधी मिळू शकते.

**डॉ. कणव कुमार**

# राजपालचा नाचतानाचा व्हिडीओ व्हायरल

तिहारमधून बाहेर आल्यानंतर अभिनेता राजपाल यादव तातडीने उत्तर प्रदेशमधील शाहजहांपूर येथे त्याच्या भाचीच्या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी रवाना झाला. त्याने एक इन्स्टा पोस्ट करून सर्वांचे आभार मानले आहेत.



कोट्यवधी रुपयांच्या कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या बॉलिवूड अभिनेता राजपाल यादवने कर्जाची थोडी रक्कम परत करण्यासाठी दिलेला चेक बाऊन्स झाला. या प्रकरणात न्यायालयाने आदेश दिल्यानंतर शरण आलेला आणि तिहार तुरुंगात शिक्षा भोगत असलेला राजपाल अखेर जामीन मिळवून तुरुंगाबाहेर आला आहे. न्यायालयाने राजपाल यादवला १८ मार्च २०२६ पर्यंत सशर्त जामीन दिला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने राजपाल यादवला ९ कोटी रुपयांच्या कर्जाच्या प्रकरणात हंगामी जामीन दिला आहे. जामीन मिळताच राजपालने न्यायालयाचे आभार मानले.

कायदा पाळेन आणि न्यायालयाने घातलेल्या सर्व अटींचे तंतोतंत पालन करेन अशी ग्वाही त्याने न्यायालयात दिली. यानंतर काही तासांनी राजपाल तुरुंगाबाहेर आला.

खटला उच्च न्यायालयात सुरू आहे.

वकील भास्कर उपाध्याय माझ्यावतीने युक्तिवाद करत आहेत. मी त्यांच्या सल्ल्याने लवकरच पत्रकार परिषद घेऊन माझी बाजू जनतेसमोर मांडेन, असे राजपालने सांगितले. चाहते आणि बॉलिवूडमधील अनेक सहकाऱ्यांनी दिलेल्या पाठिंब्यासाठी त्याने सर्वांचे जाहीर आभार मानले.

# लव्ह ट्रॅप, छळ आणि धर्मांतर

२०२३ मध्ये बॉक्स ऑफिसवर वादळ निर्माण करणाऱ्या 'द केरळ स्टोरी' या चित्रपटानंतर आता निर्मात्यांनी याच्या सीक्वेलची घोषणा केली आहे. 'द केरळ स्टोरी २' चा अंगावर शहारे आणणारा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, यात कथेची आणखी एक भीषण आणि गडद बाजू मांडण्यात आली आहे. चित्रपटाची कथा सत्य घटनांपासून प्रेरित असल्याचे निर्मात्यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले आहे. विविध राज्यांमधील हिंदू मुलींना लक्ष्य करून त्यांचे होणारे शोषण आणि सक्तीने केले जाणारे धर्मांतर, हा या सीक्वेलचा मुख्य विषय आहे. या चित्रपटात अभिनेत्री अदा शर्मा पुन्हा एकदा या संवेदनशील विषयात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. पहिल्या भागावर झालेल्या टीकेनंतरही या चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता, त्यामुळे आता या दुसऱ्या भागाबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

**'पुढील २५ वर्षांत भारत इस्लामिक स्टेट होईल...';**

'द केरळ स्टोरी'च्या यशानंतर आता या चित्रपटाचा सीक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येत असून, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ट्रेलरने सोशल मीडियावर वादाला तोंड फोडले आहे. 'इन्शाल्लाह, पुढील २५ वर्षांत पूर्ण भारत एक इस्लामिक स्टेट असेल...' या अत्यंत वादग्रस्त आणि खळबळजनक संवादाने या ट्रेलरची सुरुवात होते, ज्यामुळे कथेतील संघर्षाची तीव्रता स्पष्ट होत आहे. ट्रेलरमध्ये राजस्थानमधील एका १६ वर्षीय हिंदू मुलीचे बळजबरीने धर्मांतर केल्याचे दाखवण्यात आले असून, तिचे कुटुंब पोलीस ठाण्यात 'पोक्सो' अंतर्गत तक्रार दाखल करण्यासाठी धडपडत असल्याचे दिसते. कथेचा पुढचा भाग मध्य प्रदेशाकडे वळतो, जिथे एका हिंदू तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून




तिची फसवणूक केली जाते. विश्वासाचा फायदा घेऊन तिचे धर्मांतर करणे आणि त्यानंतर होणारे भीषण शोषण याचे चित्रण ट्रेलरमध्ये करण्यात आले आहे. धर्मांतर, विश्वासघात आणि शोषणाचे हे 'भीषण वास्तव' पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर मांडण्यासाठी निर्माते सज्ज झाले आहेत. सत्य घटनांवर आधारित असल्याचा दावा करणाऱ्या या चित्रपटामुळे पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे.

**चित्रपट कधी होणार रिलीज ?**

चर्चेत असलेल्या 'द केरळ स्टोरी २' चा ट्रेलर सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून, त्यातील तिसऱ्या कथेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. यावेळी कथा पुन्हा केरळच्या पार्श्वभूमीवर फिरते, जिथे एका मुस्लिम तरुणाने हिंदू तरुणीला 'लिव्ह-इन रिलेशनशिप'चा प्रस्ताव दिल्यानंतर उद्भवणारा संघर्ष दाखवण्यात आला आहे. जेव्हा तरुणी धर्मांतर करण्यास ठाम नकार देते, तेव्हा तिला कोणत्या भयानक छळाला सामोरे जावे लागते, याची अंगावर काटा आणणारी झलक ट्रेलरमध्ये दिसते.

दिग्दर्शक कामाख्या नारायण सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटात उल्का गुप्ता, अदिती भाटिया आणि ऐश्वर्या ओझा या अभिनेत्रींनी मुख्य भूमिका साकारल्या आहेत.

हा बहुचर्चित चित्रपट येत्या २७ फेब्रुवारी रोजी चित्रपट गृहात प्रदर्शित होणार आहे.

# मुंबईसह लंडनमध्ये आहे आलिशान घरे

बॉलीवूडमधील सेलिब्रिटी एका चित्रपटासाठी कोट्यवधी रुपये मानधन घेतात. त्यांची लाइफस्टाइलही खूप महागडी असते. अनेकदा ते आलिशान गाड्यांमधून प्रवास करताना दिसतात. इंडस्ट्रीत अनेक कलाकारांची कोट्यवधींची संपत्ती आहे. यापैकीच एक नाव म्हणजे काजोल देवगण. काजोल बॉलीवूडमधील लोकप्रिय सेलिब्रिटी आहे. ती सतत कुठल्या न कुठल्या कारणामुळे चर्चेत असते. अभिनेत्रीने आतापर्यंत अनेक चित्रपटांत काम करत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. अलीकडेच तिचा 'माँ' हा चित्रपट प्रदर्शित झालेला. ९०च्या काळातील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी ती एक आहे. काजोल अशा कलाकारांपैकी एक आहे, जे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. काजोल अनेकदा इंडस्ट्रीतील सहकलाकारांबद्दल, तिच्या अनुभवांबद्दल स्पष्टपणे बोलताना दिसते. काजोल गेली अनेक वर्षे इंडस्ट्रीत काम करत आहे.

ती अनेक नामांकित ब्रँडच्या जाहिरातींमध्येही झळकते. परंतु, तुम्हाला माहीत आहे का अभिनेत्रीची नेटवर्थ किती आहे आणि ती एका जाहिरातीचे, चित्रपटाचे किती पैसे घेते. काजोलच्या संपत्तीबद्दल आणि तिच्या मानधनाबद्दल सविस्तर जाणून घेऊयात.

काजोलची नेटवर्थ किती?

'टाइम्स नाउ'च्या अहवालानुसार काजोलची एकूण नेटवर्थ २४० कोटी इतकी आहे. चित्रपटांव्यतिरिक्त काजोल जाहिराती आणि सोशल मीडिया पार्टनरशिपमधूनही चांगले पैसे कमावते. कालोज एका चित्रपटासाठी कोट्यवधी रुपये मानधन घेते. काजोलच्या मानधनाबद्दल सांगायचं झालं तर ती एका चित्रपटाचे १५ कोटी रुपये मानधन घेते असं म्हटलं जातं.

काजोल अनेक नामांकित ब्रँड्सची एंबेसडरही आहे; ज्यामध्ये ब्युटी, हेल्थ आणि फॅशनच्या प्रॉडक्टचा समावेश असतो.




काजोल चित्रपटांप्रमाणे ब्रँडच्या जाहिरातींसाठीही कोट्यवधी रुपये घेते. ती एका ब्रँड एंडोर्समेंटचे तब्बल ३-४ कोटी रुपये मानधन घेते, त्यामुळे चित्रपटांव्यतिरिक्तही काजोल जाहिरातींमधून कोट्यवधी रुपये कमावते.

काजोलकडे मुंबईतील जुहू येथे एक बंगला आहे, ज्याची किंमत ६० कोटी रुपये असल्याचं म्हटलं जातं. यासह परदेशातही अभिनेत्रीचं आलिशान घर आहे.

काजोलचं लंडनमध्ये स्वत:चं घर आहे, ज्याची किंमत ५४ कोटी रुपये असल्याचं म्हटलं जातं. यासह तिच्याकडे आलिशान गाड्यांचं कलेक्शनही आहे.

काजोलच्या महागड्या गाड्यांच्या कलेक्शनबद्दल बोलायचं झालं तर तिच्याकडे बी.एम.डब्ल्यू ही गाडी आहे, जिची किंमत १.६ कोटी इतकी आहे. यासह तिच्यकर्डे WV9० ही गाडीसुद्धा आहे, ज्याची किंमत ८७.९ लाख रुपये इतकी आहे. यासह तिच्याकड ऑडी Q7 आहे, ज्याची किंमत ८० लाख रुपये आहे.

# मराठमोळ्या शिव ठाकरेने जिंकला 'द ५० शो'



सध्या देशभरात गाजत असलेल्या ऊप ५० या शो चे शूटिंग पूर्ण झाले असून नुकताच त्याचा फिनाले पार पडला. या फिनाले मध्ये मराठमोळ्या शिव ठाकरेने ४९ स्पर्धकांना मागे टाकत बाजी मारल्याचे समजते. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अंतिम फेरीत शिवने काका, रजत दलाल, फैजू, कृष्णा श्रॉफ यांना हरवत विजेतेपद पटकावले. ५० स्पर्धकांपासून सुरू झालेल्या या शोचे शूटिंग १५ दिवसात पूर्ण झाले आहे. या शो मध्ये निकी तांबोळी, शिव ठाकरे, जान्हवी किल्लेकर हे मराठी कलाकार होते.

अंतिम सामन्यात चारही स्पर्धकांना एक कोड घालण्यात आले होते असे समजते. ते कोडे शिवने सर्वात कमी म्हणजेच १० मिनिटात सोडवलं

# थलैवा निवृत्ती घेणार....?



दक्षिण भारतीय चित्रपट सृष्टीतील मेगास्टार रजनीकांत हे गेली अनेक दशके आपले मनोरंजन करत आहेत. देशासह परदेशातही रजनीकांत यांचा फॅन क्लब आपल्याला पाहायला मिळतो. वयाच्या ७५ व्या वर्षीही रजनीकांत यांचा जलवा कायम आहे. रजनीकांत यांना दक्षिण भारतात देव मानले जाते. त्यांच्या नवीन चित्रपटाची घोषणा होणं म्हणजे अनेकांसाठी आनंदाची पर्वणी असते. परंतु गेल्या काही महिन्यांपासून मात्र प्रेक्षकांचा हा सुपरस्टार निवृत्ती घेणार असल्याच्या बातम्या कानी येत आहेत. रजनीकांत सध्या त्यांच्या ब्लॉकबस्टर चित्रपट जेलरचा सिक्वेलच्या शूटींगमध्ये व्यस्त आहेत. असे म्हटंले जात आहे की, जेलर २ नंतर ते निवृत्ती घेण्याची घोषणा करणार आहेत. याबाबत अधिकृत वृत्त नसले तरी निवृत्तीच्या बातम्या या जोरदार चर्चिल्या जात आहेत. जेलर २ मध्ये त्यांच्यासोबत तगडी स्टारकास्ट असणार आहे. यामध्ये मोहनलाल, शिव कुमार, राजकुमार आणि विद्या बालन देखील दिसणार असल्याचे वृत्त आहे. रजनीकांत यांनी त्यांच्या निवृत्तीबाबत कोणतेही अधिकृत विधान अजूनही केलेले नाही. तसेच आगामी काळात रजनीकांत आणि कमल हासन हे दोघेही एकाच चित्रपटात आपल्याला दिसणार आहेत. हे दोघे एकत्र आल्यास, ४० वर्षांनंतर दोघेही एकत्र स्क्रीनवर दिसणार आहेत.

या चित्रपटाचे नाव अजूनही निश्चित झाले नसले तरी, तात्पुरते नाव हे थलायवा 174&sKh238 असे असणार आहे. वलाई पेचूच्या वृत्तानुसार, रजनीकांत शेवटच्या चित्रपटामध्ये मुलीसोबत काम करणार आहेत.

खास निवृत्तीसाठी सौंदर्या रजनीकांत या रजनीकांत यांच्या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळणार आहेत किंवा निर्माती असणार आहे असे म्हटले जात आहे.

# 'कधीच बॉलीवूड सोडायचं नव्हतं पण...',

बॉलीवूडमध्ये असे अनेक कलाकार आहेत जे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. इंडस्ट्रीतील त्यांच्या अनुभवांबद्दल, त्यांच्या संघर्षाबद्दल तसेच समाजातील मुद्द्यांवर ते स्पष्टपणे बोलत असतात. त्यांच्या प्रतिक्रिया वेळोवेळी व्यक्त करत असतात. यापैकीच एक नाव म्हणजे प्रियांका चोप्रा.





# रश्मिका-विजयच्या लग्नात फोनवर बंदी



विजय देवरकोंडा रश्मिका मंदाना हे दोघे २६ फेब्रुवारीला लग्न बंधनात अडकणार आहेत. राजस्थानच्या उदयपूर येथे दोघांचे कुटुंब आणि निवडक मित्रमंडळीच्या उपस्थितीत हा लग्न सोहळा पार पडणार आहे. प्री-वेडिंग कार्यक्रम २४ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून २६ फेब्रुवारीला लग्नसोहळा पार पडणार आहे. या लग्नासाठी खूपच निवडक लोकांना बोलावले जाणार आहे. लग्नात फोन आणि भेटवस्तू आणण्यास बंदी घालण्यात आली आहे. चित्रपट इंडस्ट्रीजमधील लोकांसाठी ४ मार्चला हैदराबादला रिसेप्शन ठेवले जाणार आहे.

# 'जय सोमनाथ'साठी बॉलिवूडचे दिग्गज करणार महायुती



ऐतिहासिक सोमनाथ मंदिरावर १०२६ मध्ये पहिल्यांदा हल्ला झाला. यानंतर वारंवार हल्ले झाले. या सर्व हल्ल्यांतून तावून सुलाखून सोमनाथ मंदिर आजही उभे आहे. वारंवार जीर्णोद्धार झाला पण सोमनाथावरील भाविकांची श्रद्धा तसूभरही कमी झाली नाही. सोमनाथावरील पहिल्या हल्ल्याला एक हजार वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन झाले होते. याप्रसंगी पंतप्रधानांनी उपस्थितांना हिंदू धर्माचे महात्म्य आणि सोमनाथचा इतिहास याविषयी सोप्या भाषेत सविस्तर सांगितले होते. या पार्श्वभूमीवर आता बॉलिवूड एकटवटले आहे. सोमनाथ मंदिराचा इतिहास लवकरच हिंदी चित्रपटाच्या रुपाने मोठ्या पडद्यावर दिसणार आहे. नियोजनानुसार हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित होणार आहे.

जय सोमनाथ या हिंदी चित्रपटासाठी लार्जन चॅन लाईफ चित्रपटांचे दिग्दर्शक म्हणून लोकप्रिय असलेल्या संजय लील भन्साळीनं माहितीपर क्षेत्रातील (डॉक्युमेंटरी) दिग्गज केतन मेहतांसोबत युती केली आहे. भारतीय सिनेसृष्टीतील दोन प्रभावशाली आणि सर्जनशील दिग्दर्शक – संजय लीला भन्साळी आणि केतन मेहता हे दोघे संयुक्तपणे 'य सोमनाथ'वर काम करणार आहेत.

'जय सोमनाथ'ची कथा प्रेक्षकांना इ.स. १०२५ - १०२६ या कालखंडात घेऊन जाणार आहे. त्या वेळी गझनीच्या महमूदने गुजरातमधील सोमनाथ मंदिरावर आक्रमण करून त्याची लूट केली होती. भारतीय इतिहासातील हा प्रसंग विनाशानंतर पुन्हा उभे राहण्याच्या जिद्दीचे प्रतीक मानला जातो. विशेष म्हणजे या घटनेला यंदा एक हजार वर्षे पूर्ण होत आहेत. अशा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारित चित्रपट प्रथमच मोठ्या पडद्यावर साकारला जात आहे.

या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे भन्साळी आणि मेहता यांची सर्जनशील भागीदारी. भव्य सेट्स, नेत्रदीपक दृश्यरचना आणि भावनिक कथनशैलीसाठी ओळखले जाणारे भन्साळी, तर ऐतिहासिक दृष्टिकोन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या चित्रपटांसाठी प्रसिद्ध असलेले केतन मेहता – या दोघांची सांगड 'जय सोमनाथ'मध्ये पाहायला मिळणार आहे. दोन्ही दिग्दर्शकांचा गुजरातशी असलेला संबंध लक्षात घेता, या कथेत वास्तव आणि भावनांचा प्रभावी संगम दिसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

'जय सोमनाथ'ची निर्मिती भन्साळी प्रोडक्शन्स आणि केतन मेहता यांच्या माया मूव्हीज या बॅनरखाली होत आहे. चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शनाची जबाबदारी केतन मेहता स्वतः सांभाळणार आहेत. हा भव्य ऐतिहासिक चित्रपट २०२७ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

# हसा आणि निरोगी रहा!



हास्ययोग म्हणजे मन आणि शरीराचा एकत्रित व्यायाम. हसताना शरीरातील अनेक स्नायू काम करतात, श्वासोच्छ्वास वेगाने होतो आणि फुफ्फुसांना चांगला व्यायाम मिळतो. त्यामुळे शरीर अधिक कार्यक्षम बनते.‘हसा आणि जग तुमच्यासोबत हसेल’ असे आपण नेहमी ऐकतो. हसण्यामुळे मन हलके होते, ताण कमी होतो आणि शरीरात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. म्हणूनच आज जगभरात हास्ययोगाचे क्लब सुरू झाले आहेत. या क्लबमध्ये लोक एकत्र येऊन विविध प्रकारचे हास्ययोग करतात. पूर्वी हास्ययोग फक्त ज्येष्ठ नागरिकांसाठी आहे, अशी समजूत होती. पण आता मुले, तरुण, प्रौढ आणि ज्येष्ठ असे सर्वजण यात सहभागी होत आहेत. काही शाळांमध्येही हास्यसंघ सुरू झाले आहेत. हास्ययोग म्हणजे मन आणि शरीराचा एकत्रित व्यायाम. हसताना शरीरातील अनेक स्नायू काम करतात, श्वासोच्छ्वास वेगाने होतो आणि फुफ्फुसांना चांगला व्यायाम मिळतो. त्यामुळे शरीर अधिक कार्यक्षम बनते.

**‘फ’ हास्य म्हणजे काय?**

‘फ’ हास्य हा एक खास प्रकार आहे. हे हास्य करण्यासाठी पाय थोडे अंतरावर ठेवून उभे राहायचे. कमरेतून पुढे वाकत दोन्ही हात खाली घ्यायचे आणि ओठ घट्ट मिटायचे. त्यानंतर हळूहळू वर येत हात खांद्याच्या रेषेत पसरवायचे आणि मागे थोडे झुकायचे.

यावेळी ओठ उघडून मोठ्याने ‘फफऽऽ’ असा फुत्कार करायचा. मग डोळे बंद करून ‘हाहाहा’ असे हळूहळू हसायचे.

ही प्रक्रिया तीन वेळा करायची. या वेळी शरीरातील अशुद्ध हवा बाहेर टाकली जाते आणि फुफ्फुसात शुद्ध हवा भरते. त्यामुळे रक्तशुद्धीकरण चांगले होते आणि मेंदूला अधिक प्राणवायू मिळतो. हात, खांदे, कंबर आणि मान यांनाही चांगला व्यायाम होतो. छातीचा पिंजरा रुंदावतो आणि हृदय-फुफ्फुसांचे कार्य सुधारते. म्हणूनच या हास्याला ‘महाहास्य’ असेही म्हणतात.

**हार्दिक हास्य आणि त्याचे फायदे**

हार्दिक हास्यामध्ये छाती वरच्या दिशेने ताणली जाते, तर ‘फ’ हास्यामध्ये ती आडवी रुंदावते. हे दोन्ही प्रकार एकत्र केल्यास फुफ्फुसांची क्षमता वाढते. श्वसनक्रिया सुधारते आणि शरीरातील थकवा कमी होतो.

**सिंहमुद्रा हास्य**

या हास्यात सिंहासारखा आविर्भाव करायचा असतो. एक पाय पुढे टाकून, जीभ बाहेर काढून, डोळे मोठे करून मोठ्याने गर्जना करायची. कमरेतून डावीकडे-उजवीकडे वळायचे आणि शेवटी मोठ्याने हसायचे. या प्रकारामुळे चेहरा, जीभ, घसा, मान आणि कंबर यांना उत्तम व्यायाम मिळतो. घशातील थायरॉईड ग्रंथीचे कार्य सुधारते. मनातील राग आणि ताण कमी होतो.

**नृसिंह हास्य**

नृसिंह हास्यात सिंहासारखा उग्र चेहरा करून पाय पुढे टाकत मोठ्याने गर्जना करायची. हात सिंहाच्या पंज्यासारखे पुढे फेकायचे आणि शेवटी मोठ्याने हास्य करायचे.या हास्यामुळेही शरीरातील स्नायूंना व्यायाम मिळतो. मनातील नकारात्मक भावना बाहेर पडतात. आत्मविश्वास वाढतो आणि मानसिक ताकद मजबूत होते.

**हास्ययोगाचे महत्त्व**

हास्ययोगामुळे ताणतणाव कमी होतो, रक्ताभिसरण सुधारते आणि शरीरात सकारात्मक ऊर्जा वाढते. सामूहिक हास्यामुळे सामाजिक बंध अधिक मजबूत होतात. हसण्याने आनंद द्विगुणित होतो आणि मन प्रसन्न राहते.मात्र हे सर्व प्रकार योग्य पद्धतीने आणि मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे. रोज काही मिनिटे हास्ययोग केल्यास शरीर आणि मन दोन्ही निरोगी राहू शकतात.

# स्मरणशक्ती नैसर्गिकरित्या वाढवायची आहे का?

स्मरणशक्ती वाढवण्यासाठी मोठे बदल करण्याची गरज नाही. छोट्या सवयी, नियमित ध्यान, निसर्गात वेळ घालवणे आणि संतुलित आहार या गोष्टी मेंदूला नैसर्गिकरित्या मजबूत करतात. सातत्य ठेवल्यास काही आठवड्यांतच फरक जाणवू शकतो.

आजच्या धावपळीच्या आयुष्यात ताण, अपुरी झोप, सततचा मोबाईल वापर आणि मल्टिटास्किंग यामुळे आपल्या स्मरणशक्तीवर मोठा परिणाम होत आहे. अनेकांना नावं विसरणं, कामं लक्षात न राहणं किंवा अभ्यास केलेली गोष्ट पटकन विसरणं अशा समस्या जाणवतात. यासाठी काही जण औषधं किंवा सप्लिमेंट्स घेतात. मात्र, स्मरणशक्ती नैसर्गिक पद्धतीनेही वाढवता येते. जपानमधील काही सवयी आणि जीवनशैलीचे उपाय मेंदूला शांत, एकाग्र आणि सक्रिय ठेवण्यास मदत करतात.

**१) इकिगाई** - इकिगाई ही जपानी जीवनतत्त्वज्ञानातील महत्त्वाची संकल्पना आहे. याचा अर्थ ‘जगण्यामागचं कारण’ असा होतो. जेव्हा आपल्याला आपल्या आयुष्याचा उद्देश स्पष्ट असतो, तेव्हा मेंदू अधिक फोकस्ड राहतो. दररोज स्वतःला प्रश्न विचारा, मला काय आवडतं? मी कोणत्या गोष्टीत चांगला/चांगली आहे? मी समाजासाठी काय करू शकतो/शकते? अशा विचारांमुळे मेंदू सकारात्मक दिशेने काम करतो आणि स्मरणशक्ती सुधारते.

**२) काईझेन**

Kai&wen म्हणजे सतत छोट्या सुधारणा करत राहणे. मोठे बदल करण्याऐवजी दररोज छोट्या सवयी लावा. उदाहरणार्थ,



रोज १० मिनिटे वाचन करा, ५ नवीन शब्द शिका किंवा एखादी छोटी कोडी सोडवा. हे छोटे प्रयत्न मेंदूला सतत सक्रिय ठेवतात. त्यामुळे मेंदूवर ताण न येता स्मरणशक्ती हळूहळू मजबूत होते.

**३) शिनरिन-योकू**

Shinrin-yokd म्हणजे जंगलात किंवा निसर्गात शांतपणे फिरणे. हिरवळ, झाडे आणि ताजी हवा यामुळे ताण कमी होतो. ताण कमी झाला की मेंदू माहिती अधिक चांगल्या प्रकारे साठवतो. दररोज किमान १५-२० मिनिटे मोबाईलशिवाय उद्यानात किंवा निसर्गात फेरफटका मारा. यामुळे मन आणि मेंदू दोन्ही ताजेतवाने राहतात.

**४) जाझेन ध्यान**

जाझेन ही सोपी ध्यान पद्धत आहे. यात शांत बसून श्वासावर लक्ष केंद्रित केले जाते. ध्यान केल्याने मेंदूतील अनावश्यक विचार कमी होतात, एकाग्रता वाढते आणि नवीन माहिती लक्षात ठेवणे सोपे जाते. दिवसातून ५-१० मिनिटे जरी ध्यान केले तरी त्याचा सकारात्मक परिणाम दिसू शकतो.

**५) जपानी आहार पद्धत**

जपानी लोक त्यांच्या आहारात मासे, भात, हिरव्या भाज्या आणि फर्मेंटेड पदार्थांचा समावेश करतात. मासे ओमेगा-३ फॅटी अ?सिडने भरपूर असतात, जे मेंदूच्या पेशींसाठी फायदेशीर असतात. भाज्या आणि फळांतील अँटीऑक्सिडंट्स मेंदूला निरोगी ठेवतात. आठवड्यातून २-३ वेळा मासे, भरपूर भाज्या आणि कमी प्रक्रिया केलेले अन्न खाण्याची सवय लावा.

**आहार पद्धत**

एकूणच, स्मरणशक्ती वाढवण्यासाठी मोठे बदल करण्याची गरज नाही. छोट्या सवयी, नियमित ध्यान, निसर्गात वेळ घालवणे आणि संतुलित आहार या गोष्टी मेंदूला नैसर्गिकरित्या मजबूत करतात. सातत्य ठेवल्यास काही आठवड्यांतच फरक जाणवू शकतो.

# तुमच्या रिल्सचा ‘रिच’ वाढवण्यासाठी....



इन्स्टाग्रामवर रील बनवणे जितके सोपे, पण रिल व्हायरल करणे कठीण झालंय. कधीकधी व्हिडीओवर अगदी थोडे व्ह्यूज येतात. अशा वेळी क्रिएटर्सनी स्मार्ट ट्रिक्स वापराव्या.

तुमच्या व्हिडीओची सुरुवात इतकी दमदार हवी की लोकांनी स्क्रोल करणं थांबवलं पाहिजे. व्हिडीओच्या पहिल्या ३ ते ५ सेपंदात असा काही ‘हुक’ किंवा सस्पेन्स ठेवा.

ट्रेंडिंग गाणं, हॅशटॅग आणि चॅलेंजेस जरूर वापरा, पण त्यामध्ये तुमचा स्वतःची क्रिएटिव्हिटी दाखवा. लोकांचे कॉपी केलेले व्हिडीओ अनेकदा गर्दीत हरवून जातात.

नवीन काहीतरी देण्याचा प्रयत्न करा. योग्य वेळी पोस्टिंगची करा. कितीही चांगला व्हिडीओ बनवला आणि तो चुकीच्या वेळी पोस्ट केला तर त्याला व्ह्यूज मिळणार नाहीत.

व्हिडीओच्या जोडीला प्रभावी कॅप्शन आणि योग्य हॅशटॅग असणं गरजेचं आहे.

कॅप्शनमध्ये असा काही प्रश्न विचारा ज्यामुळे लोक कमेंट करायला प्रवृत्त होतील.

# खाद्यपदार्थांतील रसायने आणि वाढती ॲलर्जी

साखर शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत काही रसायनांचा वापर केला जातो. काही संवेदनशील व्यक्तींमध्ये यामुळे त्वचेवर पुरळ, खाज, लाल चट्टे किंवा श्वसनाचा त्रास दिसू शकतो. तसेच वनस्पती तूप, हायड्रोजेनेटेड तेल (डालडा) किंवा रिफाइंड तेल तयार करताना विविध रासायनिक प्रक्रिया केल्या जातात. या तेलांचा अतिरेक केल्यास पचनाच्या तक्रारी, घशात खवखव किंवा अ?सिडिटीसारखे त्रास होऊ शकतात. त्यामुळे शक्यतो ताजं, घरगुती आणि कमी प्रक्रियायुक्त तेल वापरण्याचा सल्ला दिला जातो.



आजकाल अ?लर्जीचा त्रास लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेकांना होताना दिसतो. पण यामागची कारणं शोधण्याकडे आपण फारसं लक्ष देत नाही. तज्ज्ञांच्या मते, बाजारात मिळणाऱ्या अनेक प्रक्रियायुक्त (प्रोसेस्ड) पदार्थांमध्ये विविध रसायनांचा वापर केला जातो. ही रसायने शरीराला न पटल्यास ॲलर्जी, त्वचेचे विकार, श्वसनाचे त्रास किंवा पचनाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

साखर शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत काही रसायनांचा वापर केला जातो. काही संवेदनशील व्यक्तींमध्ये यामुळे त्वचेवर पुरळ, खाज, लाल चट्टे किंवा श्वसनाचा त्रास दिसू शकतो. तसेच वनस्पती तूप, हायड्रोजेनेटेड तेल (डालडा) किंवा रिफाइंड तेल तयार करताना विविध रासायनिक प्रक्रिया केल्या जातात. या तेलांचा अतिरेक केल्यास पचनाच्या तक्रारी, घशात खवखव किंवा ॲसिडिटीसारखे त्रास होऊ शकतात. त्यामुळे शक्यतो ताजं, घरगुती आणि कमी प्रक्रियायुक्त तेल वापरण्याचा सल्ला दिला जातो.

फ्लेवर्स आणि प्रिझर्व्हेटिव्हज

आइस्क्रीम, बिस्किटे, जॅम, जेली, सॉस, लोणची यांसारख्या पदार्थांमध्ये टिकवण्यासाठी प्रिझर्व्हेटिव्हज वापरले जातात. काही लोकांना यामुळे पोटदुखी, गॅस्ट्रिक समस्या किंवा त्वचेच्या ॲलर्जी होऊ शकतात.

तसेच कृत्रिम फ्लेवर्स (उदा. व्हॅनिला फ्लेवर) हे नैसर्गिक घटकांऐवजी कृत्रिमरीत्या तयार केलेले असतात. संवेदनशील व्यक्तींमध्ये यामुळेही ॲलर्जिक प्रतिक्रिया दिसू शकतात.

# गरोदरपणात आणि बाळंतपणानंतरचा रक्तक्षय

रक्तक्षय म्हणजे शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे. हिमोग्लोबिन ऑक्सिजन शरीरभर पोहोचवते. ते कमी झाल्यास थकवा, गरगरणे, धाप लागणे, पांढरट त्वचा, डोकेदुखी अशी लक्षणे दिसतात. गरोदरपणात महिलांच्या शरीराला जास्त रक्ताची गरज असते. त्यामुळे सौम्य रक्तक्षय (ॲनिमिया) सामान्य मानला जातो. मात्र हिमोग्लोबिन खूप कमी झाले, तर आई आणि बाळ दोघांच्याही आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. प्रसूतीनंतरही अनेक महिलांना रक्तक्षयाचा त्रास होतो, कारण त्या बाळाच्या काळजीत स्वतःच्या तब्येतीकडे दुर्लक्ष करतात. रक्तक्षय म्हणजे शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे.



हिमोग्लोबिन ऑक्सिजन शरीरभर पोहोचवते. ते कमी झाल्यास थकवा, गरगरणे, धाप लागणे, पांढरट त्वचा, डोकेदुखी अशी लक्षणे दिसतात. रक्तक्षयाच्या चार पायऱ्या असतात. सुरुवातीला शरीरातील लोहसाठा कमी होतो. पुढे लाल रक्तपेशी कमी तयार होतात. तिसऱ्या टप्प्यात हिमोग्लोबिन घटते. चौथ्या टप्प्यात गंभीर लक्षणे जाणवतात.

रक्तक्षयाचे मुख्य प्रकार म्हणजे-१. लोहाच्या कमतरतेमुळे होणारा रक्तक्षय – सर्वाधिक आढळणारा प्रकार. २. फोलेटच्या कमतरतेमुळे रक्तक्षय – बाळाच्या विकासावर परिणाम होऊ शकतो. ३. जीवनसत्व ँ-१२ च्या कमतरतेमुळे रक्तक्षय – विशेषतः शाकाहारी महिलांमध्ये दिसतो.

कारणे कोणती? आहारात लोह, फोलिक ॲसिड कमी असणे, प्रसूतीदरम्यान जास्त रक्तस्राव, जुळी गर्भधारणा, वारंवार गरोदरपण, पचनसंस्थेचे आजार, मलेरिया किंवा इतर संसर्ग ही काही प्रमुख कारणे आहेत.

उपाय काय? आहारात चिकन, मटण, मासे, अंडी, डाळी, कडधान्ये, हिरव्या पालेभाज्या यांचा समावेश करावा. लिंबूवर्गीय फळे, टोमॅटो, किवी यांसारखे जीवनसत्व ण् युक्त पदार्थ घ्यावेत. चहा कमी घ्यावा, कारण तो लोहाचे शोषण कमी करतो. भरपूर पाणी प्यावे.

डॉक्टरांच्या सल्ल्याने लोह, फोलिक ॲसिड आणि ँ-१२ सप्लिमेंट घ्याव्यात. पुरेशी विश्रांती घ्यावी.

# प्लेटलेट्स कमी-जास्त होणे धोकादायक

आलीकडच्या काळात डेंग्यू, हिवताप आणि चिकुनगुनिया यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. या आजारांमध्ये शरीरातील प्लेटलेट्सची संख्या झपाट्याने कमी होऊ शकते. प्लेटलेट्स म्हणजे रक्तातील एक महत्त्वाचा घटक. शरीरात कुठेही जखम झाली किंवा अंतर्गत रक्तस्राव सुरू झाला तर तो थांबवण्याचे काम प्लेटलेट्स करतात. त्यामुळे त्यांची संख्या योग्य मर्यादेत असणे अत्यंत गरजेचे आहे.

प्लेटलेट्सची निर्मिती शरीरात ‘थ्रोम्बोपोइटिन’ या हार्मोनमुळे होते. या पेशी साधारण सात ते दहा दिवस जिवंत राहतात आणि त्यानंतर नष्ट होतात. शरीरात सतत त्यांची निर्मिती सुरू असते. निरोगी व्यक्तीच्या एका घनमिलीमीटर रक्तात सुमारे दीड लाख ते चार लाख प्लेटलेट्स असतात. त्यांची संख्या ३० हजारांपेक्षा कमी झाली तर अंतर्गत रक्तस्रावाचा धोका वाढतो. नाकातून, कानातून किंवा शौचावाटे रक्त येऊ शकते. स्थिती गंभीर झाल्यास मेंदू, हृदय किंवा इतर अवयवांवर परिणाम होऊ शकतो.

प्लेटलेट्स कमी होण्याला ‘थ्रोम्बोसायटोपेनिया’ असे म्हणतात. डेंग्यू, हिवताप, चिकुनगुनिया यांसारख्या विषाणूजन्य आजारांमध्ये ही समस्या अधिक दिसते. काही वेळा विशिष्ट औषधे, केमोथेरपी, कर्करोग, अनुवंशिक आजार किंवा मद्याचे अतिसेवन यामुळेही प्लेटलेट्स कमी होतात. प्लेटलेट्सची संख्या १० हजारांपेक्षा खाली गेल्यास तातडीने उपचारांची गरज भासते.

दुसरीकडे, प्लेटलेट्सची संख्या गरजेपेक्षा जास्त वाढली तर ‘थ्रोम्बोसायटोसिस’ ही अवस्था निर्माण होते. अशा वेळी रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे हृदयविकाराचा झटका, अर्धांगवायू किंवा मूत्रपिंडाचे कार्य बिघडण्याची शक्यता असते. काही वेळा रक्ताल्पता, संसर्ग किंवा शरीरातील सूज यामुळेही प्लेटलेट्स वाढू शकतात.

अनेकांना वाटते की प्लेटलेट्स देणे म्हणजे धोकादायक प्रक्रिया आहे. मात्र



आजकाल रुग्णालयांमध्ये ‘इम्युनोसेपरेशन’ यंत्राद्वारे प्लेटलेट्स वेगळ्या करण्याची प्रक्रिया सुरक्षितपणे केली जाते. तंदुरुस्त व्यक्तीच्या शरीरातून मशीनद्वारे रक्त घेतले जाते, त्यातून प्लेटलेट्स वेगळ्या केल्या जातात आणि उर्वरित रक्त पुन्हा शरीरात परत दिले जाते. त्यामुळे दात्याच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत नाही. तरीही माहितीअभावी अनेकजण प्लेटलेट्स दान करण्यास कचरतात.डेंग्यू किंवा हिवताप झालेल्या रुग्णांची प्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळे डॉक्टर अशा रुग्णांच्या प्लेटलेट्सच्या संख्येवर सतत लक्ष ठेवतात. त्यांना भरपूर द्रवपदार्थ घेण्याचा सल्ला दिला जातो. शरीरात पाणी कमी झाल्यास प्लेटलेट्सची संख्या आणखी घसरू शकते. त्यामुळे नारळपाणी, लिंबूपाणी, सूप, फळांचे रस यांचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरते.

आहारात हिरव्या पालेभाज्या, आवळा, चिकू, काजू, ब्रोकोली, व्हिटॅमिन के आणि व्हिटॅमिन सीयुक्त पदार्थ घेणे गरजेचे आहे. आयर्न आणि हिमोग्लोबिन कमी असल्यास प्लेटलेट्स कमी होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे संतुलित आहार अत्यावश्यक आहे.

आयुर्वेदातही काही घरगुती उपाय सांगितले जातात. गुळवेलीचे सत्त्व मधासोबत घेणे, गुळवेल पाण्यात भिजवून त्याचे पाणी पिणे, सुदर्शन चूर्ण घेणे यांचा उपयोग होऊ शकतो. पपईचा रस प्लेटलेट्स वाढवण्यासाठी उपयुक्त मानला जातो. तसेच बकरीचे दूध पचायला हलके असून प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करते.

एकंदरीत, प्लेटलेट्सची संख्या कमी-जास्त होणे दोन्हीही धोकादायक ठरू शकते. त्यामुळे ताप, अंगदुखी, रक्तस्राव यांसारखी लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. योग्य वेळी तपासणी आणि उपचार केल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते.

# भात खाणे सोडू नका, फक्त तांदूळ बदला!

वजन कमी करायचं म्हटलं की सर्वातआधी अनेकजण आपल्या आहारातून भात पूर्णपणे बंद करतात. ‘भात खाल्ल्याने वजन वाढतं’ ही समजूत इतकी पक्की झाली आहे की डाएट करताना भात हा कितीही आवडत असला तरीही तो शक्यतो टाळलाचं जातो. वजन वाढेल किंवा पोटाची ढेरी दिसेल तसेच जाडजूड मांड्या यामुळे आपण वेटलॉस करताना भात खायला नक्कोच्च म्हणतो. पण खरंच, भात खाल्ल्याने वजन वाढते का? की आपली भात खाण्याची पद्धत आणि योग्य तांदळाची निवड चुकीची ठरते? असे अनेक प्रश्न आपल्यापैकी अनेकांना पडतात.



बाजारांत अनेक प्रकारचे तांदूळ असतात त्यापैकीच, एकीकडे पॉलिश केलेला, दिसायला सुंदर पण पोषकतत्वे गमावलेला ’व्हाईट राईस’, तर दुसरीकडे आरोग्याचा खजिना मानला जाणारा ’ब्राऊन राईस’ पण या दोघांपैकी वेटलॉस करण्यासाठी नेमक्या कोणत्या प्रकारच्या तांदुळाची निवड करावी हे समजत नाही. आजकाल व्हाईट राईस की ब्राऊन राईस ? वजन कमी करण्यासाठी नेमका कोणता पर्याय योग्य, याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम असतो. काहीजण ब्राऊन राईस अधिक हेल्दी मानतात, तर काहींना व्हाईट राईस पचायला हलका वाटतो. मग खरेच वजन नियंत्रणासाठी कोणता भात खाणं फायदेशीर? योग्य तांदुळाची निवड करून वजन वाढू न देता आहार कसा संतुलित ठेवायचा ते पाहूयात...

ब्राऊन राईस हा एक भरड धान्याचा प्रकार आहे. यात वरची पातळ साल (ब्रॅन) काढले जात नाहीत, ज्यामध्ये फायबर, व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स भरपूर प्रमाणात असतात. तर व्हाईट राईस प्रोसेस करून तयार केला जातो, ज्यामध्ये ही बाहेरील सालं काढून टाकली जातात.



# भारतीय शेतीची चिंता

**भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापार करारावरून देशभरात तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. हा करार भारतीय शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, लोकशाही प्रक्रिया आणि जागतिक राजकारण यांच्याशी थेट संबंधित आहे. भारत-अमेरिका व्यापार कराराच्या प्रारूपानंतर अनेक शेतकरी संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांच्या चिंता केवळ सोयाबीन तेल, धान्य किंवा सफरचंदावरील आयात शुल्क सवलतीपुरत्या मर्यादित नाहीत.**

भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापार करारावरून देशभरात तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. हा करार भारतीय शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, लोकशाही प्रक्रिया आणि जागतिक राजकारण यांच्याशी थेट संबंधित आहे. भारत-अमेरिका व्यापार कराराच्या प्रारूपानंतर अनेक शेतकरी संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांच्या चिंता केवळ सोयाबीन तेल, धान्य किंवा सफरचंदावरील आयात शुल्क सवलतीपुरत्या मर्यादित नाहीत. या चिंता विश्वास, पारदर्शकता आणि भारतीय शेतीच्या भवितव्याशी संबंधित आहेत. सरकारकडून वारंवार आश्वासन दिले जात आहे की, शेती आणि दुग्ध उद्योग संरक्षित राहतील; परंतु कराराच्या मजकुरात अनेक कृषी आणि अन्नपदार्थांवरील शुल्क कमी करण्याची आणि गैरशुल्क अडथळे हटवण्याची तरतूद असल्याचे सांगितले जात असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

**राजकीय विषयांवरील पुस्तके**

याआधी युरोपियन युनियन आणि न्यूझीलंडसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारांमुळे स्वस्त आयात मोठ्या प्रमाणावर वाढली आणि त्याचा फटका स्थानिक उत्पादकांना बसला. मुक्त व्यापार करारांचा इतिहास पाहिला तर, ते अनेकदा जागतिक व्यापाराच्या विस्तारासाठी महत्त्वाचे साधन ठरले आहेत. जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) स्थापनेनंतर टॅरिफ कमी करणे, बाजारपेठा खुल्या करणे आणि बहुपक्षीय व्यापार व्यवस्था निर्माण करणे हे जागतिक धोरण बनले.

परंतु जागतिक दक्षिणेकडील अनेक देशांचा अनुभव असा आहे की मुक्त व्यापार करारांचा लाभ मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, निर्यातदार आणि प्रगत अर्थव्यवस्था यांना मिळतो, तर लहान शेतकरी, स्थानिक उद्योग आणि असंघटित कामगार वर्गावर त्याचा विपरीत परिणाम होतो. एफएओ आणि यूएनसीटीएच्या अभ्यासानुसार, अनेक विकासशील देशांमध्ये कृषी बाजार खुला केल्यानंतर ग्रामीण उत्पन्नातील असमानता वाढली आणि लहान शेतकऱ्यांचे स्थिर उत्पन्न घटले. सफरचंद उद्योगाचे उदाहरण विशेष उल्लेखनीय आहे.

**भारतीय इतिहास पुस्तके**

हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडमध्ये सफरचंद हे केवळ पीक नसून संपूर्ण पर्वतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अमेरिकन सफरचंदांवरील आयात शुल्क कमी झाल्यास आणि किमान आयात मूल्य वाढवल्यास हे सफरचंद भारतीय प्रीमियम सफरचंदांच्या किमतीत बाजारात उपलब्ध होतील. परिणामी, भारतीय ग्राहक समान किमतीत अधिक दर्जेदार आयातीत सफरचंदांना पसंती देतील आणि स्थानिक उत्पादकांचा बाजार हिस्सा घटेल. कोल्ड स्टोरेजमध्ये सफरचंद साठवणे तोट्याचे ठरू शकते आणि स्थानिक उद्योग संकटात सापडू शकतो. सोयाबीन आणि धान्याच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. भारतात सोयाबीन उत्पादन प्रामुख्याने लहान आणि सीमांत शेतकऱ्यांद्वारे होते. एक एकर जमिनीत साधारणतः १ मेट्रिक टन सोयाबीन उत्पादन होते, तर अमेरिकेत जीएम सोयाबीनच्या माध्यमातून ३ मेट्रिक टनपर्यंत उत्पादन होते. ही उत्पादकतेची दरी भारतीय शेतकऱ्यांसाठी असमान स्पर्धा निर्माण करते.

त्यातच अमेरिकन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर सरकारी सबसिडी मिळते. अमेरिकन शेतकऱ्यांना दरवर्षी सरासरी ६६ हजार डॉलर इतकी सबसिडी मिळते आणि २०२६ साठी १२ अब्ज डॉलरचा विशेष सहाय्य कार्यक्रम प्रस्तावित आहे. याच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांना मिळणारी मदत मर्यादित आहे आणि अनेकदा एमएसपीपेक्षा ३० ते ४० टक्के कमी दरात उत्पादन विकावे लागते.

अशा परिस्थितीत मुक्त व्यापार म्हणजे असमान मैदानावर खेळण्यासारखे आहे. हा करार केवळ आर्थिक नसून राजकीयही आहे.

अमेरिकेत मध्यावधी निवडणुका जवळ आल्या आहेत आणि कृषी क्षेत्र हा अमेरिकन राजकारणातील प्रभावी घटक आहे. चीनसोबतच्या व्यापार युद्धामुळे अमेरिकन शेतकऱ्यांना मोठे नुकसान झाले आणि निर्यात बाजार घटला. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाला नवीन बाजारपेठांची गरज आहे. भारत हा १४० कोटी लोकसंख्येचा विशाल बाजार असल्यामुळे अमेरिकेसाठी अत्यंत आकर्षक आहे. त्यामुळे भारताशी व्यापार करार हा अमेरिकन राजकीय रणनीतीचा महत्त्वाचा भाग मानला जातो. ग्रामीण अमेरिकेतील असंतोष कमी करणे आणि शेतकरी लॉबीला संतुष्ट करणे हे ट्रम्प प्रशासनासाठी राजकीयदृष्ट्या आवश्यक आहे.

या कराराचा सर्वात गंभीर पैलू म्हणजे पारदर्शकतेचा अभाव. शेतकरी संघटना, विरोधी पक्ष आणि काही राज्य सरकारांनी कराराचा संपूर्ण तपशील संसदेसमोर सादर करण्याची मागणी केली आहे. व्यापार करारांचा परिणाम देशांतर्गत कायद्यांइतकाच गंभीर असतो. कारण, ते लाखो लोकांच्या उपजीविकेवर परिणाम करतात. त्यामुळे संसदीय चर्चा, सार्वजनिक सल्लामसलत आणि प्रभाव मूल्यांकन आवश्यक आहे. लोकशाही प्रक्रियेशिवाय मोठ्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी केल्यास लोकांचा विश्वास ढासळतो आणि सामाजिक असंतोष वाढतो.

भारतीय शेती आधीच अनेक संकटांशी झुंज देत आहे. कर्जबाजारीपणा, हवामान बदल, वाढते उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि धोरणात्मक अनिश्चितता यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. आर्थिक सहयोग व विकास संघटना ओईसीडीच्या अहवालानुसार २००० ते २०२५ या कालावधीत भारतीय शेतकऱ्यांना १११ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत स्वस्त आयातीत उत्पादनांची लाट आली तर स्थानिक बाजार कोसळण्याची शक्यता आहे.

भारतीय इतिहास पुस्तके

कापूस आयातीवरील शुल्क कमी केल्यानंतर देशांतर्गत किमती घसरल्याचे उदाहरण आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. अन्नपदार्थांची आयात म्हणजे ग्रामीण रोजगाराची घट आणि बेरोजगारीत वाढ, असे अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. भारतासाठी शेती हा केवळ आर्थिक उत्पादनाचे क्षेत्र नाही, तर तो ग्रामीण रोजगाराचा मुख्य स्त्रोत, सामाजिक स्थैर्याचा आधारस्तंभ आणि अन्नसुरक्षेचा कणा आहे.

भारतात सुमारे ४५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण भारतात शेती आणि संबंधित क्षेत्रे मिळून सुमारे १८ टक्के योगदान देतात; परंतु रोजगारातील वाटा याहून अधिक आहे. त्यामुळे शेतीवर परिणाम करणारा कोणताही व्यापार करार हा केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय निर्णय ठरतो.

भारतीय आणि अमेरिकन शेतकऱ्यांमधील सर्वात मोठा फरक म्हणजे अनुदान आणि पायाभूत सुविधा. अमेरिकेत कृषी उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर सरकारी सहाय्य दिले जाते. कृषी संसाधन व्यवस्थापन सर्वेक्षण २०२० नुसार, एका अमेरिकन शेतकऱ्याला सरासरी ६६,३१४ डॉलर वार्षिक अनुदान मिळते. याशिवाय, अमेरिकन प्रशासनाने २०२६ मध्ये १२ अब्ज डॉलरचे अतिरिक्त सहाय्य जाहीर केले आहे. यामुळे अमेरिकन शेतकरी बाजारातील चढ-उतारांपासून संरक्षण मिळवतात आणि कमी किमतीतही उत्पादन विकू शकतात.

याउलट, भारतीय शेतकऱ्यांना मर्यादित अनुदान, अपुरी सिंचन सुविधा, कमकुवत साठवणूक व्यवस्था आणि बाजारातील अस्थिरता यांचा सामना करावा लागतो. भारतातील लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न इतर देशांच्या शेतकऱ्यांच्या तुलनेत १० ते १५ पट कमी आहे. किमान आधारभाव (एमएसपी) अनेकदा बाजारात प्रत्यक्षात मिळत नाही आणि अनेक पिकांसाठी एमएसपीपेक्षा ३० ते ४० टक्के कमी दर मिळतो. अशा परिस्थितीत अनुदानित अमेरिकन उत्पादनांशी स्पर्धा करणे भारतीय शेतकऱ्यांसाठी अत्यंत अवघड आहे.

या करारामुळे जीएम पिकांचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. अमेरिकन शेती मोठ्या प्रमाणावर जीएम पिकांवर आधारित आहे. भारतात जीएम पिकांबाबत सामाजिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक चिंता आहेत. मुक्त व्यापारामुळे जीएम अन्नपदार्थांचा प्रवेश सुलभ झाल्यास अन्न सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण होतो. अन्न सार्वभौमत्व म्हणजे देशाला स्वतःच्या अन्न प्रणालीवर नियंत्रण असणे.

जर भारताचा अन्न बाजार बहुराष्ट्रीय कंपन्या आणि विदेशी उत्पादकांच्या ताब्यात गेला,

तर देशाची अन्न सुरक्षा आणि ग्रामीण स्वायत्तता धोक्यात येईल. जागतिक पातळीवर हा करार नव्या व्यापार व्यवस्थेचा भाग म्हणून पाहिला जात आहे. ट्रम्प प्रशासनाचा व्यापार धोरणांचा कल दबाव आणि शक्तीच्या वापरावर आधारित आहे.

**विकास मेश्राम**

# नारळ लागवडीतून कोकणच्या अर्थव्यवस्थेला बळ

समुद्रकिनारी असलेल्या नागरिकांनी जास्तीत जास्त नारळाची लागवड करावी. यामुळे नारळ प्रक्रिया उद्योगाला चालना मिळून स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना जोडधंदा मिळणार आहे. कामगारांच्या रिकाम्या हातांना काम मिळणार आहे. नारळ विक्रीमुळे व्यापारी वर्ग निर्माण होणार असून नवनवीन नारळ उद्योजक निर्माण होणार आहेत. त्यामुळे कोकणची वेगळी ओळख जगात होणार आहे. जगामध्ये जवळजवळ ९३ देश नारळाचे उत्पादन घेतात. आपल्या महाराष्ट्र राज्यात नारळ उत्पादनाचा विचार करता राज्यात ३३ हजार हेक्टरवर नारळाचे लागवडीखाली क्षेत्र असून १७ हजार ९२९ हेक्टर सर्वाधिक क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे, तर कोकणात दरवर्षी अंदाजे नारळाचे रुपये १८.६३ कोटींचे उत्पादन होत असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात रुपये १ हजार ४५७ लाख नारळाचे उत्पादन होत असते. ही माहिती प्रादेशिक नारळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता डॉ. किरण मालशे यांनी २०२३ साली दिली होती. म्हणजे अजून चांगल्या प्रकारे नारळाची लागवड केल्यास नारळाच्या उत्पादनात वाढ होऊन कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल.

आज नारळाचा विचार केल्यास नारळाच्या उत्पादनात घट होऊन नारळाच्या किमती जवळजवळ तिप्पट झालेल्या दिसत आहेत. तर नारळाच्या तेलाची किंमत रुपये ६०० प्रति लिटर झाली आहे. याला कारण रोगराई, बदलते हवामान, अपुरे पाणी आणि माकडांचा वावर होय. असे असले तरी कोकणात चांगले नारळाचे उत्पादन होते. तेव्हा नारळ उत्पादनाकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहिल्यास उत्तम प्रकारे बळ कोकणच्या अर्थव्यवस्थेला मिळू शकते. त्यासाठी योग्य प्रकारे नारळाची लागवड करायला हवी. म्हणजे



नारळाच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे कोकणच्या उत्पन्नात अधिक चांगल्याप्रकारे वाढ होऊ शकते. तेव्हा नारळ कितीही महाग झाला तरी कोकणी माणूस खोबऱ्याशिवाय जेवण करीत नाही. नारळाचा विचार केल्यास अनेक लोकांचा संसार नारळाच्या व्यवसायावर अवलंबून असतो. सध्यातरी हा व्यवसाय कोकणात शेतकऱ्यांचा पूरक जोडधंदा म्हणून ओळखला जातो. काही शेतकरी शेतीच्या बाजूने नारळाची रोपे लावतात. काहींची तर नारळाची स्वतंत्र बाग आहे. एक माड जरी असला तरी त्याचा अनेक प्रकारे उपयोग होऊ शकतो. तेव्हा नारळाच्या व्यवसायामुळे अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यासाठी नारळाची अधिक प्रमाणात लागवड करणे गरजेचे आहे. आपण नारळ जरी म्हणालो असलो तरी त्याच्या विविध भागांचा उपयोग नागरिकांच्या उपयोगासाठी होत असतो. त्यामुळे नारळाच्या झाडाला 'कल्पवृक्ष' म्हणतात. असे आपण प्राथमिक शाळेत शिकलो आहोत. तेव्हा नारळाच्या झाडाचे योग्य प्रकारे संगोपन आपल्याला करावे लागेल. कारण त्याच्या प्रत्येक भागाचा उपयोग वेगवेगळ्या प्रकारे केला जातो. आता आपण नारळाच्या झाडांच्या विविध भागांचा उपयोग कसा केला जातो किंवा नागरिकांना होतो याविषयी माहिती घेऊ. त्यामुळे नारळाच्या झाडाला खऱ्या अर्थाने कल्पवृक्ष म्हणतात हे वाचक वर्गाच्या लक्षात येईल.

घाटमाथ्यावर आवडीने शेंगदाणे जेवणात वापरतात त्याप्रमाणे कोकणात ओल्या खोबऱ्याचा जेवणात वापर केला जातो. कोवळ्या नारळाचे पाणी लोक आवडीने पितात. कोकणात त्याला शहाळे असेही म्हणतात. खोबऱ्यापासून तेल व दुधसुद्धा तयार करतात. तेल काढल्याने सुखी पेंडसुद्धा मिळते. करवंटीचा वापर डवली व कोळशासाठी केला जातो. नारळ सोलल्यानंतर त्यांची सोडणा मिळतात ती पाण्यात फुगत घातली जातात. त्यानंतर त्याचा काथ्या तयार केला जातो. त्यापासून दोरी, ब्रश, जाळी, चटई इत्यादी वस्तू तयार केले जातात. नारळाच्या पानापासून सुंदर छप्पर किंवा जाळी बनवली जातात. त्याच्या हिरापासून झाडू बनवितात. हिराच्या झाडूलासुद्धा बाजार पेठेत बऱ्यापैकी मागणी असते. नारळाचे जे खोड असते त्यापासून घरासाठी वासे तयार केले जात असून आकर्षक फर्निचरसुद्धा तयार करतात. कोकणात खाडीशेजारी जी बैठी घरे आहेत त्यांना सर्रास माडाचे वासे दिसतील. खारी हवा असल्यामुळे वासेसुद्धा जास्त दिवस टिकतात. तेव्हा नारळाचा विचार केल्यास शेतकऱ्यांसाठी उपयुक्त शेतीला जोडधंदा आहे. तसेच उपजीविकेचे प्रमुख साधन आहे असे म्हणावे लागेल.

कोकणात नदी-नाल्यांच्या कडेला, खाडी व समुद्राच्या काठावर डोलणारी नारळाची झाडे दिसतील तशी त्याची काळजीसुद्धा घेतली जाते. विशेष म्हणजे खारी हवा नारळाला पोषक असते. समुद्र किंवा खाडीच्या कडेला जी नारळाची झाडे डोलताना पाहिल्यावर कल्पना येते. तेव्हा सध्याच्या काळात नारळाची किंमत विचारात घेता नारळाची लागवड करणे फायदेशीर ठरणार आहे. नारळाच्या बटू व उंच जातीचा विचार केल्यास बटू जात ३ ते ५ वर्षांत, तर उंच जाती ५ वर्षांनंतर नारळ धरायला लागतात. बटू नारळाला कमी, तर उंच नारळाला जास्त आयुष्य असते. माडाला नारळ लागल्यावर जवळजवळ ९ महिन्यांत नारळ परिपक्व होतात. मात्र त्या आधी सुद्धा नारळ काढू शकतो. जमीन, योग्य खत, पाणी आणि माडाची काळजी घेतल्यास नारळाचे उत्पादन वाढण्याला मदत होते. आज जे शेतकरी संकटात आहेत त्यांनी नारळाची लागवड बिनधास्तपणे करावी. आजच्या घडीला कोकणात शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.

समुद्र किनारी असलेल्या नागरिकांनी जास्तीत जास्त नारळाची लागवड करावी. यामुळे नारळ प्रक्रिया उद्योगाला चालना मिळून स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना जोडधंदा मिळणार आहे. कामगारांच्या रिकाम्या हातांना काम मिळणार आहे. नारळ विक्रीमुळे व्यापारी वर्ग निर्माण होणार असून नवनवीन नारळ उद्योजक निर्माण होणार आहेत. त्यामुळे कोकणची वेगळी ओळख जगात होणार आहे. त्यासाठी केवळ घरापुरते नारळाचे उत्पादन न करता व्यावसायिक दृष्टिकोनातून नारळाच्या उत्पादनाकडे कोकणवासीयांनी पाहावे. तसेच शासन स्तरावर नुकसानग्रस्त नारळ बागायतदारांना योग्य सुरक्षा विमा कवच आणि नारळ प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन वेळीच दिले गेले पाहिजे. त्यामुळे नारळ लागवडीतून कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल हे मात्र निश्चित.

# एकमेव अन्न आत्मनिर्भर देश

एखादा देश स्वतला लागणारे अन्न स्वतच पिकवतो असे सांगितले तर विश्वास बसेल का? पण हो, या देशाने हे करून दाखवले आहे. कसं केलं त्या देशाने सगळं? हे इतरांनाही शक्य आहे का? आजच्या जागतिकीकरणाच्या युगात जेव्हा जगातील महासत्ता असलेले देशही अन्नासाठी एकमेकांवर अवलंबून आहेत, तेव्हा दक्षिण अमेरिकेतील एका छोट्याशा देशाने संपूर्ण जगासमोर एक आदर्श घालून दिला आहे. गयाना असे या देशाचे नाव आहे. जगातील १८६ देशांच्या अभ्यासात असे दिसून आले आहे की, गयाना हा एकमेव असा देश आहे जो आपल्या गरजेच्या सातही श्रेणींमधील अन्नपदार्थ स्वतच पिकवतो. विशेष म्हणजे, या देशाचा भारताशी अतिशय जवळचा संबंध असून येथील संस्कृतीवर भारतीय ठसा उमटलेला आहे. गयानाने मिळविलेला हा विजय एक स्पष्ट धोरणात्मक, आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या समन्वयातून घडलेला यशप्राप्त अनुभव आहे.

'नेचर फूड' या प्रतिष्ठित मासिकात प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार, गयाना हा अन्नधान्य उत्पादनात १०० टक्के स्वयंपूर्ण ठरला आहे. तांदूळ, गहू, मका यासारखी तृणधान्ये, कडधान्ये, फळे आणि भाज्या, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, मांस (पोर्क, बीफ, पोल्ट्री), मासळी आणि तेलबिया अशा महत्त्वाच्या सातही विभागांत हा देश कुणावरही अवलंबून नाही. जगातील बडे देश जसे की अमेरिका (केवळ ४ श्रेणीत सक्षम), ब्रिटन (२ श्रेणी) आणि चीन (६ श्रेणी) देखील ही किमया साधू शकलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर गयानाचे यश डोळे दिपवणारे आहे.

गयाना हे दक्षिण अमेरिकेच्या कॅरिबियन किना?यावर वसलेले एक छोटे, पण फलदायी राष्ट्र आहे. याची लोकसंख्या सुमारे ८ लाख इतकी असून, निसर्गाची अनुकूलता आणि कृषी रणनीती यांचा योग्य संगम मिळून या देशाने अद्वितीय प्रगती साधली आहे. गयानाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ४० टक्के लोक (सुमारे ३.५ लाख) भारतीय वंशाचे आहेत. १९ व्या शतकात ब्रिटीश राजवटीत उत्तर प्रदेश आणि बिहारमधून अनेक भारतीयांना गयानामध्ये ऊसतोड कामगार म्हणून नेण्यात आले होते. आज त्यांचे वंशज या देशाचे मुख्य आधारस्तंभ आहेत. गयानातील जेवणात आजही बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशची चव मिळते. 'दाल पुरी', 'कढी-भजी', 'बारा' (वडा) आणि 'सात भाजी' हे येथील लोकप्रिय खाद्यप्रकार आहेत.

गयानाचे भौगोलिक क्षेत्रफळ भारताच्या गुजरात राज्याइतके आहे, मात्र लोकसंख्या त्यामानाने अत्यंत कमी आहे. या देशाने केवळ नैसर्गिक साधन संपत्तीवर अवलंबून न राहता धोरणात्मक निर्णय घेतले. गेल्या काही वर्षांत



गयाना सरकारने कृषी क्षेत्रावरील खर्चात तब्बल ४६८ टक्क्यांनी वाढ केली आहे. केवळ तांदूळ किंवा साखर या पारंपरिक पिकांवर लक्ष न देता, त्यांनी मका, सोयाबीन आणि दुग्ध व्यवसायालाही प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर सिंचन व्यवस्था, रस्ते, साठवणूक क्षमता आणि शेतकरी प्रशिक्षण यावर त्यांनी सातत्याने गुंतवणूक केली. दक्षिण अमेरिकेतील अनेक देश शेतीसाठी जंगल तोडत असताना गयानाने आपल्या ८५ टक्के भागातील जंगले सुरक्षित ठेवून उपलब्ध जमिनीचा जास्तीत जास्त वापर केला आहे. विषुववृत्ताजवळ असलेल्या गयानाला वर्षभर पाऊस, आर्द्रता आणि अमेझॉन नदी प्रणालीमुळे प्राप्त झालेली सुपीक जमीन लाभली आहे. या नैसर्गिक वरदानाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यांनी हा मैलाचा दगड गाठला आहे.

फक्त पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता, गयानाने विविध पिकांच्या उत्पादनाला प्राधान्य दिले. जसे की, भात, कॉर्न आणि सोया, मसाले, हळद, अद्रक, भाज्या व फळे, मत्स्यपालन आणि दुग्धजन्य उत्पादने, मधमाश्या पालन. या सर्व क्षेत्रांना सक्षम करून गयानाने विविधकरणामुळे अन्नचक्र अधिक स्थिर व सुरक्षित केले आहे.

गयानामध्ये युवा, महिला आणि लहान शेतक?यांना प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य देणारे कार्यक्रम सुरू केले गेले. विविध सरकारी योजना आणि उपक्रमांद्वारे नवयुवक कृषि उद्योगात रुजू केले असून, अनेकांना स्वतचा व्यवसाय उभा करण्यास मदत झाली आहे. हे निर्णय राष्ट्रीय अन्न मूल्य साखळीला मजबुती देतात.

पूर्ण स्थानिक अन्न पुरवठा झाल्यामुळे गयानाचे परकीय बाजारांवरील अवलंबित्व कमी झाले आहे. नवीन पिके, प्रशिक्षण कार्यक्रम आणि रोजगार संधींमुळे ग्रामीण भागात तरुण वर्गात कृषी व्यवसायात रस वाढला आहे. गयानाचा हा आत्मनिर्भर पॅटर्न वाखाणण्याजोगा आहे. अर्थात गयानापुढे अजूनही आव्हाने कायम आहेत. जसे की, हवामान बदलामुळे काही क्षेत्रात पिकांचे नुकसान, सुविधा, संरक्षण आणि निर्यातीसाठी अधिक गुंतवणूक, मागास भागात सामाजिक समावेश सुनिश्चित करणे. गयानाने पुढील दशकात कॅरिबियनच्या अन्न उत्पादनाचं हब बनण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ज्यासाठी तंत्र, व्यापार संधी आणि भांडवल वाढवण्याचा मानस आहे.

आज अनेक देश अन्नासाठी इतर देशांवर अवलंबून आहेत. जागतिक उत्पादनाच्या भांडवलवादी शृंखलेमुळे, युद्ध, हवामान बदल किंवा जागतिक व्यापारातील अडथळे, यामुळे अन्नपुरवठा संकटाची स्थिती उद्भवू शकते. काही देश मुख्य अन्न घटकांना निर्यात करतात, तरीही ते संपूर्णपणे अन्नपुरवठा करू शकत नाहीत. कारण त्यांना काही आवश्यक अन्न तसेच धान्य हे आयात करावे लागते. विकसित देशही जे करू शकले नाही ते गयानाने करून दाखविले आहे.

गयानाची ही यशोगाथा दाखवते की, नैसर्गिक संसाधने, धोरणात्मक गुंतवणूक, सामाजिक सहभाग, तंत्रज्ञानाचा वापर या सा?याच्या जोरावर अन्न सुरक्षा आणि आत्मनिर्भरतेचा आदर्श मार्ग तयार होऊ शकतो.

जर उद्या जगाचा व्यापार काही कारणास्तव पूर्णपणे ठप्प झाला, तरी गयानाचे नागरिक उपाशी राहणार नाहीत. अन्न सुरक्षेच्या बाबतीत हा देश स्वावलंबी असण्याचे उत्तम उदाहरण आहे. वाढती लोकसंख्या आणि हवामान बदलाच्या संकटात जगातील इतर देशांसाठी गयानाचे हे मॉडेल एक दीपस्तंभ ठरू शकते. अशा प्रकारे, भारताची संस्कृती जपणारा हा छोटासा देश आज जागतिक स्तरावर 'अन्नदाता' म्हणून आपल्या स्वयंपूर्णतेचा झेंडा फडकवत आहे.